# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

# भारतीय राष्ट्रीय चळवळ

**(National Movement in India)**

(१९०५ ते १९४७)

(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून)

**एम. ए. भाग-१**

**इतिहास**

HIST-202 (Compulsory Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१८
एम. ए. भाग - १ करिता (भारतीय राष्ट्रीय चळवळ)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-938801-1-1

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### इतिहास समन्वय समिती

अध्यक्ष - **प्राचार्य ए. एल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. व्ही. आर. पाटील**
  आर्टस् कॉलेज, कोवाड,
  ता. चंदगड, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. नंदा पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**(भारतातील राष्ट्रीय चळवळ)**
**एम. ए. भाग–१ : इतिहास** HIST 202

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. डॉ. डी. पी. खराडे**<br>बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी | १ |
| **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**<br>चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे, कॉलेज, हुपरी, ता. हातकणंगले | २ |
| **प्राचार्य डॉ. ए. एल. बेलवटकर**<br>मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर | ३ |
| **प्रा. आप्पासाहेब नामदेव केंगार**<br>बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी | ४ |

**■ संपादक ■**

**प्राचार्य डॉ. ए. एल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय,
इस्लामपूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१७-१८ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-१ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''भारतीय राष्ट्रीय चळवळ'' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१८-१९ या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

भारतीय राष्ट्रीय चळवळ या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये तोंडओळख, जहालवादी कालखंड, महात्मा गांधींच्या चळवळीचे युग व स्वातंत्र्य चळवळीतील इतर प्रवाह इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्राचार्य डॉ. ए. एल. बेलवटकर**
मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय,
इस्लामपूर

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : इतिहास ■**

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अबंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | तोंडओळख | १ |
| २. | जहालवादी कालखंड | १४ |
| ३. | महात्मा गांधींच्या चळवळीचे युग | ३२ |
| ४. | स्वातंत्र्य चळवळीतील इतर प्रवाह | ६१ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक - १

# तोंडओळख (Introduction)

## (अ) राष्ट्रवाद - संकल्पना

## (ब) राष्ट्रवादाच्या आकलनाचे दृष्टीकोन : राष्ट्रवाद-केंब्रिज-सबाल्टर्न


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ 'राष्ट्रवाद' संकल्पना

१.२.२ राष्ट्रवादाच्या आकलनाचे (अभ्यासविषयक) दृष्टिकोन : राष्ट्रवादी-केंब्रिज-सबाल्टर्न

१.३ पारिभाषिक शब्द

१.४ स्वयं अध्ययन प्रश्न

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.६ सारांश

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


### १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- राष्ट्र-राज्य संकल्पना समजेल.
- राष्ट्र-निर्मितीचे आवश्यक घटक समजतील.
- राष्ट्रवादी दृष्टिकोन समजेल.
- केंब्रिज दृष्टिकोनातील अनेक मतप्रवाहांची मांडणी करता येईल.
- सबाल्टर्न दृष्टीकोन व त्याच्या उणिवा यांची माहिती घेता येईल.

## १.१ प्रस्तावना

भारतीय राष्ट्रीय चळवळी ही आधुनिक कालखंडातील एक महत्त्वपूर्ण घटना आहे. भारतीय राष्ट्रीय चळवळीचा सर्वांगाने अभ्यास करण्यात आला आहे. एकोणिसाव्या शतकामध्ये भारतीय भूमीवर राष्ट्रवादाची प्रथमच चाहूल दिसू लागली. भारतीय राष्ट्रवादाचा उदय-विकास-विस्तार कसा झाला ? भारतीय राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप नेमके कसे होते ? भारतीय राष्ट्रीय चळवळ सर्वसमावेशक होती का ? भारतामध्ये या काळात लोकांच्यामध्ये ''आपण सर्व एकच राष्ट्राचे नागरिक आहोत'' अशी भावना होती का ? यासारख्या भारतीय राष्ट्रवादासंदर्भात अनेक प्रश्नांच्या उत्तराचे आकलन करण्यासाठी अनेक इतिहासकारांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा विविध अंगानी अभ्यास करून विविध दृष्टीकोनातून अभ्यासून एक नवा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. साम्राज्यवादी दृष्टीकोन, राष्ट्रवादी दृष्टीकोन, सबाल्टर्न दृष्टीकोन, मार्क्सवादी दृष्टीकोन, स्त्रीवादी दृष्टीकोन यांसारख्या विचारसरणीच्या संशोधकांनी भारतीय राष्ट्रवादाला एक नवा अर्थ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ 'राष्ट्रवाद' संकल्पना

**प्रास्ताविक**

राष्ट्र, राष्ट्रीयत्व, राष्ट्रवाद या संकल्पना परस्परांशी संलग्न आहेत. विशिष्ट भू-प्रदेशात कायमस्वरुपी वस्ती करून राहणाऱ्या लोकांचा समुदाय जेव्हा सार्वभौम सरकार स्थापन करतो, तेव्हा त्यास राज्य म्हणतात. अशा राज्यातील लोकांना आपल्या प्रदेशाविषयी प्रेम, अभिमान वाटतो तेव्हा त्यास 'राष्ट्र' असे म्हणतात. राष्ट्राविषयी प्रेम, निष्ठा, अभिमान असणे यास राष्ट्रीयत्वाची भावना म्हणतात.

**राष्ट्र (Nation)**

राष्ट्र या संकल्पनेचा उदय युरोपमध्ये झाला. राष्ट्र या शब्दाला इंग्रजी भाषेत Nation हा शब्द आहे. Nation हा शब्द Natus (जन्म/वंश) या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. Natus किंवा Natio या अर्थ एकाच वंशात जन्मलेले लोक राष्ट्र निर्माण करू शकतात.

**व्याख्या**

'राष्ट्र' या संकल्पनेच्या विविध विचारवंतानी विविध व्याख्या केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

**१. प्रा गार्नर :**

राष्ट्र म्हणजे सांस्कृतिक एकता असलेला समूह होय. अशा समूहातील लोक आपल्या वैचारिक व मानसिक जीवनाची व आचारांची एकता टिकविण्याचा जागरूकतेने व चिकाटीने प्रयत्न करतात.

**२. बर्जेस :**

राष्ट्र म्हणजे भौगोलिक एकता असणाऱ्या लोकसमुदायाच्या राज्याला राष्ट्र म्हणतात.

**३. लिकॉक :**

वांशिक एकता असणाऱ्या लोकसमुदायाच्या राज्याला राष्ट्र असे म्हणतात.

**४. एम. हॅसर :**

समान भाषा किंवा समान वंश यामुळे नव्हे, तर लोकांच्या एकत्रित राहण्याच्या इच्छेतून राष्ट्र निर्माण होते.

**५. हॅन्स कोहोन :**

राष्ट्र म्हणजे निश्चित अशा भूप्रदेशावर वास्तव्य करणारा लोकसमुदाय की जो स्वतःस स्वतंत्र सार्वभौम सत्ताधारी राज्यात परावर्तित करण्याची इच्छा बाळगतो. स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत कार्य करतो आणि आपण सर्व एक आहोत अशी समान भावना बाळगतो.

## राष्ट्रीयत्वाचे मुख्य घटक

### १. भौगोलिक एकता

समान भूप्रदेश व भौगोलिक समिपता ही तेथे राहणाऱ्या लोकांमध्ये एकत्वाची भावना निर्माण करते. जगातील बहुतेक राष्ट्रे भौगोलिक एकतेतून निर्माण झाली आहेत.

### २. समान ऐतिहासिक पार्श्वभूमी

ज्या लोकांचा इतिहास स्फूर्तिदायी असतो, असा इतिहास तेथील लोकांत एकात्मतेची भावना जागृत करण्यास कारणीभूत ठरतो.

राष्ट्रीयत्वाचे मुख्य घटक :

- → भौगोलिक एकता
- → समान ऐतिहासिक पार्श्वभूमी
- → समान हितसंबंध
- → समान वंश
- → समान भाषा
- → समान धर्म
- → समान संस्कृती
- → समान राजकीय उद्दिष्टे
- → समान आदर्श
- → स्व-राज्य

**३. समान हितसंबंध**

लोकांचे आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक हितसंबंध समान असतील, तर असे लोक सहजपणे एक होऊ शकतात.

**४. समान वंश**

एकाच वंशाचे लोक नैसर्गिकदृष्ट्या फार लवकर एकत्र येतात व त्यांच्यात एकतेची भावना प्रबळ असते.

**५. समान भाषा**

विचारांचे, भावनांचे आदान-प्रदान होण्यासाठी भाषा हे प्रभावी साधन आहे. त्याचा वापर राष्ट्रभावनेसाठी केला जातो.

**६. समान धर्म**

धर्म ही मानवी जीवनाच्या जडणघडणीतील सर्वात प्रभावी घटक आहे. समान धर्मियांनी आपल्या स्वतंत्र राष्ट्रनिर्मितीसाठी युद्धे लढली. हौतात्म्य पत्करले.

**७. समान संस्कृती**

संस्कृती हा घटक लोकसमुदायाला एकत्र आणणारा फार मोठा आधार आहे. ही एकता कायम राखण्यासाठी संस्कृतीच्या ठेव्याचे जतन केले जाते.

**८. समान राजकीय उद्दिष्टे**

एकाच राजकीय उद्दिष्टातून राष्ट्रीयत्व निर्माण होते. जगाच्या इतिहासात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी या समान राजकीय उद्दिष्टासाठी विभिन्न लोकसमुदायात राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाल्याची अनेक उदाहरणे आहेत.

**९. समान आदर्श**

राष्ट्रीयत्वाची ज्योत सतत धगधगती राहण्यासाठी त्या त्या राष्ट्रातील थोर व्यक्तींची चरित्रे, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज ही प्रतिके राष्ट्रवाद निर्माण करण्यासाठी महत्त्वाची आहेत.

**१०. स्व-राज्य/स्वराज्याची भावना**

लोकांना एकत्र ठेवण्यास स्वराज्य उपयुक्त ठरते. पारतंत्र्यातून मुक्त होण्यासाठी झालेले संघर्ष राष्ट्रभवनेचे द्योतक असतात.

## भारतीय राष्ट्रवादी इतिहासलेखन

१९३० सालापर्यंत स्वदेशी व परकीय इतिहासकारांनी 'आधुनिक भारत' या विषयाकडे दुर्लक्ष केले. परंतु नंतर मात्र आधुनिक भारताविषयी विविध पैलू समोर येऊ लागले. प्रशासकीय अधिकारी, केंब्रिज व ऑक्सफर्ड विद्यापीठामधील संशोधक यांनी भारतीय इतिहासासंबंधी लिखाण करण्यास सुरुवात केली. भारतीय संस्कृती व भाषा यांची त्यांना पूर्ण कल्पना नसल्याने त्यांच्या लिखाणात काही चुका झाल्या. त्या चुका दुरुस्त करण्याचे काम

भारतीय इतिहासकारांनी केले. त्यामध्ये के. पी. जयस्वाल, आर. सी. मुजूमदार, एस. एन. सेन, ताराचंद यासारख्या अनेक इतिहासकारांचा समावेश होता.

१९व्या शतकात राष्ट्रवाद ही संकल्पना आशिया, आफ्रिका खंडात निर्माण झाली. साम्राज्यवाद वसाहतवादाच्या विरोधात जागृतीतून राष्ट्रवादाचा उदय झाला.

**राष्ट्रवादी इतिहासलेखन व भारत**

राष्ट्रवादी विचार, इतिहासलेखन राष्ट्रीय प्रगतीस पोषक असतो. या इतिहासलेखनातून धर्म, भाषा, संस्कृती, समाज, राष्ट्रनिष्ठा, समर्पण, त्याग, बलिदान इत्यादींची जपणूक केली जाऊ शकते.

**उद्दिष्टे**

१. भारतीय इतिहास व संस्कृतीवर परकियांनी केलेल्या दोषारोपणाचे खंडन करणे.

२. परकीय इतिहासकारांच्या लिखाणातून प्रस्तुत झालेले गैरसमज दूर करणे.

३. भारतीयांमध्ये निर्माण झालेला न्यूनगंड दूर करणे.

४. उपलब्ध साधनांचे पुनः परीक्षण व पुनर्मूल्यांकन करणे.

**साम्राज्यवाद्यांच्या विरोधी भूमिका**

राष्ट्रवादी इतिहासकारांनी प्रथम साम्राज्यवादी विचारसरणीला विधो केला. त्यांनी भारत कधीही राष्ट्र नाही तर जात, धर्म, पंथ, भाषा यांच्यात विभागलेला आहे. थोडक्यात, साम्राज्यवादाला पूरक इतिहासाचे लिखाण भारताच्या संदर्भात केले गेले. राष्ट्रवादी इतिहासलेखनाची दृष्टी ही साम्राज्यवादी इतिहासलेखनाच्या प्रतिविरोधी भावनेतून पुढे आली.

**राष्ट्रवादी इतिहासलेखन निर्मितीसाठी संस्था आणि संशोधन पत्रिकेची निर्मिती**

१९व्या शतकात अखेरीला राष्ट्रवादाला प्राधान्य देणाऱ्या इतिहासलेखनाच्या उद्देशाने काही संस्था आणि त्यांच्या द्वारा संशोधन पत्रिकांची सुरुवात करण्यात आली. उदा. बंकिमचंद्रकृत 'ऐतिहासिक चित्र-१८९९', के. एन. सेनकृत 'काव्येतिहास संग्रह-१८७८', पुणे येथे १९१० साली स्थापन करण्यात आलेले 'भारत इतिहास संशोधन मंडळ.'

**स्वातंत्र्य लढ्यास पूरक लिखाण**

१९व्या शतकाच्या अखेरीस राष्ट्रीय भावनांना संस्कृती, धर्म, समाज, यांना प्राधान्यक्रम देणारे इतिहासलेखन झाले. त्यांनी आपला गौरवमय इतिहास जनतेसमोर मांडून आपल्या पारतंत्र्याची जाणीव जनतेस करून दिली.

**आर्थिक-राष्ट्रीय प्रवाह**

ब्रिटीश भारताचे आर्थिक शोषण कसे करत आहेत यावर प्रथम दादाभाई नौरोजी यांनी 'Poverty and Un-British Rules in India' या ग्रंथातून आर्थिक निःसारणाचा सिद्धांत मांडून प्रकाश टाकला. यातून

आर्थिक राष्ट्रवादाचा उदय झाला. पुढे रजनी पामदत्त यांचा 'India Today' आणि एम. जी. रानडे यांचा 'Essays in Indian Economics' या ग्रंथांनाही आर्थिक राष्ट्रवादाच्या विकासास हातभार लावला.

**राष्ट्रवादी इतिहासलेखकांनी केलेली इतिहासाची पुनर्मांडणी**

**(अ) प्राचीन भारताचे अभ्यासक/इतिहासकार**

**१. काशी प्रसाद जयस्वाल**

यांचा जन्म १८८१ मध्ये उत्तर प्रदेशात झाला. त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातून कायद्याची पदवी घेऊन कलकत्ता उच्च न्यायालयात वकिली केली. त्यांन प्राचीन भारतीय इतिहासावर साम्राज्यवादी इतिहासकारांनी जे आरोप केले होते ते 'Hindu Polity' आणि 'History of India' या दोन ग्रंथातून खंडित केले.

**२. राधामुकुंद मुखर्जी**

त्यांनी Local Self-government in Ancient India, Ancient Indian Education, The Fundamental Unity of India, The Gupta Empire इत्यादी महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. यातून त्यांनी प्राचीन भारतीय लोक दैवी दृष्टीवर विश्वास ठेवणारे होते, त्यांनी कोणतीही भौतिक किंवा शास्त्रीय प्रगती केली नाही हे ब्रिटीश इतिहासकारांचे आरोप कसे चुकीचे आहेत हे दाखवून दिले.

**३. डॉ. रा. गो. भांडारकर**

भांडारकर यांनी संस्कृत, प्राकृत व इंग्रजी भाषा तसेच तत्त्वज्ञान व धर्मशास्त्राचा सखोल अभ्यास केला होता. The Early History of the Dekken & A peep into the early History of India हे दोन महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले.

**४. डॉ. ए. एस. आळतेकर**

आळतेकर हे प्राचीन भारतावर लिखाण करणारे अभ्यासक व प्राध्यापक होते. ते काशी प्रसाद जयस्वाल रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक झाले. त्यांन Education in Ancient India या ग्रंथाद्वारे शैक्षणिक क्षेत्रात पाश्चात्त्यांच्या तुलनेत प्राचीन भारत मागासलेला होता हा आरोप त्यांनी दूर केला.

**(ब) मध्ययुगीन भारताचे इतिहासकार**

**१. डॉ. महंमद हबीब**

वस्तुनिष्ठ व निधर्मी दृष्टीकोनातून भारतातील मुस्लीम शासनाचा अभ्यास करणारे इतिहासकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी संशोधनासाठी गझनीच्या महंमदाचा विषय निवडला. त्यांचे लिखाण हिंदू-मुस्लीम ऐक्याचा पुरस्कार करणारे होते.

**२. के. एम. अशरफ**

यांनी सुलतानशाहीचा राष्ट्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला. Life and Conditions of the People of Hindustan (1200-1500 AD) या ग्रंथातून त्यांनी हिंदू व मुस्लीम समाजात कोणताही संघर्ष झाला नाही. या दोन्ही समाजात सांस्कृतिक समन्वयाचे वातावरण निर्माण झाले होते हे स्पष्ट केले.

**३. सर जदुनाथ सरकार**

यांना इंग्रजी, संस्कृत, फारशी, फ्रेंच, पोर्तुगिज व मराठी भाषा अवगत होत्या. सत्याधिष्ठित, चिकित्सक, व वस्तुनिष्ठ इतिहासलेखनाच्या सैद्धांतिक भूमिकेवर संशोधनात्मक लेखन केले. त्यांच्या History of Aurangzeb आणि Shivaji and His Times, History of Shivaji या ग्रंथात राष्ट्रवादी दृष्टीकोन दिसून येतो.

**(क) ब्रिटिश काळातील इतिहासकार**

**१. दादाभाई नौरोजी**

सन १८७६ मध्ये दादाभाईनी Poverty of India हा ग्रंथ लिहून हिंदी दारिद्र्यविषयक माहिती दिली. तर १९०१ मध्ये Poverty and Un-British Rule in India या ग्रंथात Drain of Wealth हा सिद्धांत मांडून हिंदी दारिद्र्य सतत वाढत गेले तर इंग्रजी साम्राज्य नष्ट होईल असा इशारा त्यांनी दिला.

**२. रोमेशचंद्र दत्त**

हे राष्ट्रीय विचारसरणीचे अर्थतज्ञ होते. त्यांनी 'इंग्लंड व भारत' आणि 'भारताची अर्थव्यवस्था' हे ग्रंथ लिहून हिंदी जनतेची आर्थिक स्थिती स्पष्ट मांडली. त्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाची मूळे शोधून काढली.

**३. डॉ. रमेशचंद्र मुजूमदार**

प्राचीन भारतीय समाज, संस्कृती, भारतीय संस्कृतीचा देशाबाहेर झालेला प्रसार, ब्रिटिश सत्तेची स्थापना व विस्तार, भारतीय स्वातंत्र्यलढा इत्यादी विषयांवर राष्ट्रीय भूमिकेतून त्यांनी लिखाण केले.

**गुण-दोष**

**(अ) गुण**

१. राष्ट्रवादी इतिहासलेखनाने ब्रिटिश राजवटीचे साम्राज्यवादी स्वरूप उलगडून दाखवले.

२. राष्ट्रीय चळवळीतील वैचारिक आधार दिला.

३. या इतिहासकारांनी राजकीय इतिहासाबरोबरच इतर पैलूंवरही प्रकाश टाकला.

४. आपला इतिहास जाणून घेण्याच्या जिज्ञासेने मुलभूत संशोधन कार्याला गती दिली.

**(ब) दोष**

१. राष्ट्रवादी इतिहासकारांनी आपल्या मतांच्या समर्थनासाठी कधी-कधी अतिशयोक्तीपूर्ण विधाने केली आहेत.

२. काही वेळा त्यांनी पूर्वग्रहदूषित दृष्टीकोनातून लिखाण केले आहे.

३. अतिरेकी राष्ट्रवादी लेखकाने राष्ट्रवादाचे पोषण करताना मध्ययुगातील वीरपुरुषांच्या कार्याचा गौरव करताना नकळत जमातवादाची बीजे रोवली गेली.

## केंब्रीज दृष्टीकोन

### पार्श्वभूमी

केंब्रिज विचारप्रणालीचा उदय साम्राज्यवादी विचारप्रणालीच्या विचारधारेतून झाला आहे. या विचारप्रणालीवर साम्राज्यवादी तत्त्ववेत्यांचा फार मोठा प्रभाव होता. १९६८ नंतर या विचारणप्रणालीचा फार मोठ्या प्रमाणावर विकास झाला. या इतिहासकारांनी हिंदी राष्ट्रवााचे नवे विश्लेषण केले. त्यांनी भारतीय राष्ट्रवादाला एक नवा अन्वयार्थ लावून दिला. त्यांच्या मते भारतीय राष्ट्रवाद Learning Process आहे.

### केंब्रिज इतिहासकारांची भारतीय राष्ट्रवादासंदर्भातील मांडणी

१. प्रादेशिक-राष्ट्रवादाचा अन्वयार्थ

यांनी अखिल भारत हा एकच घटक न मानता, स्थानिक पातळीवर एखादा प्रदेश वा प्रांत असे स्वतंत्र घटक विचारात घेऊन त्यांनी हिंदी राष्ट्रवादाचा अन्वयार्थ लावला. भारतीय राजकारण प्रादेशिक संस्थांच्यामध्ये निर्माण झाले व त्यात प्रांतिक मर्यादा पडल्या होत्या. सामाजिक संस्था व राजकारण स्थानिक भागापुरते वा फारतर प्रांतापुरते मर्यादित त्यास अखिल भारतीय स्वरूप नव्हते.

### राष्ट्रवादाचे प्रांतिक व भाषिक स्वरूप

अनिल सील यांनी Emergence of Indian Nationalism (1968) या ग्रंथात भारतीय राष्ट्रवादाचे प्रांतिक व भाषिक स्वरूप स्पष्ट केले आहे ते असे म्हणतात, ''बंगाल, महाराष्ट्र, तामिळनाडू या भाषिक भागात ब्रिटिश राजवट प्रथमपासून स्थिर झाली होती व तेथे इंग्रजी शिक्षणाचा प्रसारदेखील व्यापक प्रमाणावर झाला होता. याच भाषिकात राष्ट्रवादी भावनांचा परिपोच झाला.

### राजकीय सत्ताप्राप्तीचा अन्वयार्थ

केंब्रिज विद्यापीठातील डेव्हिड वॉशब्रुक आणि आर. ई. फ्रायकेनबर्ग यंनी भारतीय राष्ट्रवादाचा विकास राजकीय सत्ताप्राप्ती करण्याच्या दिशेने झाला असल्याचा दावा केला आहे. त्यांच्या मते, राष्ट्रवाद ही सामाजिक वा आर्थिक परिस्थितीची प्रतिक्रिया नव्हती. वॉशब्रुक यांच्या मते, हिंदी राष्ट्रीय चळवळीतील नेत्यांना कोणत्याही बऱ्यावाईट मार्गाने राजकीय सत्ता हवी होती.

### हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्यकर्त्यांचा इतिहास म्हणजे त्यांनी केलेल्या चुकांची मालिकाच आहे

जर ब्रिटिशांनी चुका केल्या नसत्या तर ते आजतागायत भारतावर निर्वेधपणे राज्य करत राहिले असते, त्याचप्रमाणे हिंदी समाज व त्यातील जातिपातीचे बंध त्यांनी योग्य प्रकारे समजून घेतले असते, तर भारताची

फाळणीही झाली नसती. ब्रिटिशांच्या गैरसमजुती आणि चुकीचे निर्णय याचा परिणाम भारत व पाकिस्तान असे दोन राष्ट्रे निर्माण होण्यात झाला. अशी त्यांनी मांडणी केली.

**ब्रिटिशांनी भारतीयांना राजकीय सत्तेत सहभागी होण्याची संधी दिली**

सी. जे. बेकर लिहितात, १९२१-२२ या काळात तो राजकीय असंतोष उद्‌भवला, तो ब्रिटिशांनी 'माँटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा' कायदा हिंदी लोकांना बहाल केल्यामुळे उद्‌भवला. असहकार, सायमन कमिशन, सविनय कायदेभंग, चलेजाव चळवळ इत्यादी. राष्ट्रीय चळवळीतील घटना ब्रिटिशांनी भारतीय लोकांना राजकीय सत्तेत सहभागी होण्याची संधी दिल्यामुळेच घडल्या होत्या असे हे इतिहासकार मानतात.

**अभिजन वर्गाने आपले स्थान टिकविण्यासाठी चालवलेली धडपड**

अनिल सील म्हणतात, ''दुरून त्यांचा जो राजकीय लढा भासतो तो बारकाईने पाहिल्यास आपल्या सामाजिक गटाचे स्थान टिकविण्यासाठी किंवा ते सुधारण्यासाठी त्याने केलेले प्रयत्न आहेत. राजकीय लढा नव्हे, हे लक्षात येते.'' त्यांच्या मते, ''भारतीय राष्ट्रीय चळवळ म्हणजे फक्त अभिजन वर्गाने आपले स्थान टिकविण्यासाठी चालवलेली धडपड आहे.

केंब्रिज विचारप्रणाली राष्ट्रीय चळवळीमधून चारित्र्य, प्रामाणिकपणा आणि निःस्वार्थी बांधिलकी इत्यादी गोष्टी वजा केल्या आहेत. एवढेच काय या चळवळीची वैधता स्वीकारण्यास ते तयार नाहीत. अशा तऱ्हेने त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळी विषयी एका संशयास्पद आणि संकुचित दृष्टीकोनातून लिखाण मोठ्या प्रमाणात केले आणि अनिल सील हे भारतातील केंब्रिज विचारसरणीचे मुख्य प्रवर्तक होते.

## वंचितांचा इतिहास (सबाल्टर्न हिस्ट्री)

सबाल्टर्न संकल्पना व अर्थ

सबाल्टर्न या शब्दाचा अर्थ शब्दकोषात निम्न दर्जाचे लोक असा दिला आहे. त्यामुळे सबाल्टर्न म्हणजे समाजाने ज्यांना खालचा दर्जा दिला आहे, त्यांचा इतिहास ठरतो. मराठीत सबाल्टर्न इतिहासासाठी 'दुय्यम समूहांचा इतिहास', 'वंचितांचा इतिहास' यासारखे शब्द योजले गेले आहेत.

सबाल्टर्न ही संकल्पना इटालियन तत्त्ववेत्ता ॲन्टोनिओ ग्रामची याने मांडली.

भारतात रणजित गुहांनी सबाल्टर्न इतिहासलेखनास चालना दिली. त्यांनी Centre of South Asian Culture Studies' या संस्थेची स्थापना केली. त्यांनी सबाल्टर्न स्टडीज शीर्षकाखाली Writings on South Asian History and Society' या मालिकेत अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले.

**सबाल्टर्न इतिहास लेखकांची तात्त्विक बैठक**

या इतिहासकारांनी इतिहासाचे पुनर्लेखन केले. यामध्ये प्रामुख्याने डॉ. रणजित गुहा, शहीद अमीन, पार्थ चॅटर्जी, ग्यानेंद्र पांडे, दिवेश चक्रवर्ती, स्विपाक, डेव्हिड अर्नाल्ड इ. सबाल्टर्न इतिहास लेखनामागील

वैचारिक बैठक गुहा यांनी सबाल्टर्न स्टडीजच्या पहिल्या अंकात आठ पानी प्रस्तावनेत विशद केली आहे. आत्तापर्यंत लिहिला गेलेला इतिहास एकांगी, पक्षपाती व वास्तवाला सोडून दिलेला आहे. समाजातील खालच्या वर्गातील लोकांना त्यांच्या इतिहासातील वाजवी स्थापनापासून दुर्लक्षित ठेवले आहे. ही उणीव भरून काढणे हे सबाल्टर्न विचारप्रणालीचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. पार्थ चॅटर्जी म्हणतात, अभिजनवादी इतिहासास नकार दिल्यानंतर त्या रिकाम्या जागेवर सबाल्टर्न जाणिवेच्या इतिहासाची मांडणी करण्याची जबाबदारी सबाल्टर्न इतिहासकारांची आहे.

**सबाल्टर्न इतिहासकार**

**१. ॲन्टोनिओ ग्रामची** (१८९१-१९३७)

ग्रामची याने सबल्टर्न हा शब्दप्रयोग प्रथम वापरला. ग्रामचीने 'प्रिझन नोटस' ग्रंथ लिहिला. त्यामध्ये 'दि नोटस ऑन इटालियन हिस्ट्री' यामध्ये वंचितांचा इतिहासासंदर्भात आपली सबाल्टर्न इतिहासाची संकल्पना मांडली आहे.

सत्ताधारी वर्ग (Rulling Class) व वंचित वर्ग (Subaltern) यांचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा असतो. ग्रामचीच्या मते, 'सत्ताधारी वर्गाचे एकत्व (Historical Unity) ही राज्यसत्तेशी निगडित असते म्हणूनच सत्ताधाऱ्यांचा इतिहास राजसत्तेशी निगडित असतो.

ग्रामचीने वैचारिक प्रभुत्वाची किंवा अधिसत्तेची (Hegemony) संकल्पना मांडली. अभिजन वर्गाचे (Elite Class) वैचारिक प्रतिनिधी संकल्पनांचे सामाजिक संबंधांचे एक जाळे तयार करतात. याला ग्रामची अधिसत्ता धुरीणत्व अथवा वैचारिक प्रभुत्व मानतो.

**डॉ. रणजित गुहा**

रणजित गुहा यांचा जन्म १९२२ मध्ये झाला. ते मार्क्सवादी विचारसरणीचे विचारवंत होते. भारतात सबाल्टर्न स्टडीजची पायाभरणी करण्याचे श्रेय रणजित गुहा यांना दिले होते. त्यांनी सबाल्टर्न स्टडीजवर पुढील लिखाण केले -

1. A Rule of Property for Bengal

2. Elementary Aspects of peasane Insurgerey यासारखे अनेक ग्रंथातून त्यांनी वंचितांचा इतिहास पुढे आणला.

**डॉ. शहीद अमिन**

सबाल्टर्न स्टडीजचे एक संस्थापक आणि काही काळ संपादक असलेल्या दिल्ली विद्यापीठातील इतिहासाचे अध्यापक होते. त्यांनी असहकार चळवळीतील सहभागी झालेल्या शेतकऱ्यांचा अभ्यास केला होता. १९२२ सालच्या चौरा-चौरा प्रकरणाशी संबंधित वेगवेगळ्या समाज गटांची मनोभूमिका विशद करण्याचा प्रयत्न केला.

**प्रचलित इतिहासलेखन पद्धतविषयीचे सबाल्टर्न इतिहासकारांचे आक्षेप**

१. भारतातील राष्ट्रवादाविषयीचे इतिहासलेखन हे प्रायः वासाहतिक अभिजनवादी भूमिकेतून किंवा नूर्ज्वा राष्ट्रवादी भूमिकेतून झाले.

२. भारतीय राष्ट्राची जडणघडण आणि भारतीय राष्ट्रवादाचा विकास हा संपूर्णपणे येथील अभिजन वर्गाचीच कामगिरी होती.

३. वासाहतिक आणि नव-वासाहतिक इतिहासकार भारतीय राष्ट्रवादाकडे उत्तेजना आणि प्रतिसाद या साचेबद्ध पद्धतीने पाहतात.

४. भारतीय राष्ट्रवादाचे समग्र आकलन पुरविण्यातील अभिजनवादी इतिहासलेखनाच्या मुलभूत मर्यादांना गुहा या दृष्टिकोनाचे सर्वांत ठळक अपयश मानतात. भारताच्या राष्ट्रवादाच्या जडण-घडणीतील तळागाळातल्या आणि सर्वसामान्य भारतीय जनतेच्या योगदानाची अभिजनवादी इतिहासलेखन मुळीच दखल होत नाही.

५. सबाल्टर्न राजकारण आणि अभिजन राजकारण हे द्वैती स्वरूपात अस्तित्वात होते. याचा अर्थ ते एकमेकात हवापाणीही जाणार नाही अशा सीलबंद कप्प्यात बंदिस्त होते असे नाही.

**सबाल्टर्नचे मूल्यमापन**

सबाल्टर्न इतिहासाचे मूल्यमापन करीत असताना आपणास पुढील मुद्दे लक्षात घ्यावे लागतात.

१. आधुनिकतेपासून भारतीय संस्कृती वाचविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

२. वर्ग संकल्पनेला स्थान न देता Community, Post Modern, Post-structural पद्धतीचा वापर करून इतिहास लिहिला.

३. वर्चस्वाचा सांस्कृतिक अर्थ लावला.

४. वर्ग ऐवजी वंचित किंवा समूह हा शब्द घेऊन प्रश्न सुटले नाहीत.

५. सबाल्टर्न लिखाणात लहान परिप्रेक्ष्य, एतद्देशीय समूह व तुटलेपणा ही वैशिष्ट्ये आली.

६. सबाल्टर्न लिखाण पाश्चात्त्य सांस्कृतिक वर्चस्वाचा प्रश्न होऊ लागले.

७. सर्व लिखाण इंग्रजीमधून झाल्याने राष्ट्रीय, प्रदोशिक संवाद होऊ शकला नाही.

## १.३ पारिभाषिक शब्द : शब्दार्थ

**१. साम्राज्यवाद** : दुसऱ्या प्रदेशावर वर्चस्व स्थापन करण्याची वृत्ती

**२. वसाहत** : दुसऱ्या देशातील वर्चस्व निर्माण केलेला भूप्रदेश

**३. सबाल्टर्न** : वंचित, उपेक्षित

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्न

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. दादाभाई नौरोजी यांनी ............. सिद्धांत मांडला.

(अ) आर्थिक निःसारण (ब) समता (क) अतिरिक्य मूल्य (ड) विषमता

२. रमेशचंद्र दत्त हे ............. होते.

(अ) उद्योगपती (ब) अर्थतज्ञ (क) समाजसेवक (ड) राजकीय नेते

३. ............. यांनी केंब्रिज विचारप्रणाली मांडली.

(अ) अनिल सील (ब) रणजित गुहा (क) ग्रामची (ड) कार्ल मार्क्स

४. केंब्रिज विचारप्रणालीचा उदय ............ विचारप्रणालीच्या विचारधारेतून झाला आहे.

(अ) राष्ट्रवादी (ब) वसाहतवादी (क) साम्राज्यवादी (ड) मार्क्सवादी

५. सबाल्टर्न ही संज्ञा सर्वप्रथम ............ यांनी मांडली.

(अ) सुमित सरकार (ब) डी. डी. कोसंबी (क) इरफान हबीब (ड) ॲन्टानिओ ग्रामची

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. हेजिमतीचा सिद्धांत कोणी मांडला ?

२. कोणत्या भारतीय इतिहासकाराने केंब्रिल स्कूलचा विचार मांडला ?

३. हिंदु पॉलिटी हा ग्रंथ कोणी लिहिला ?

४. History of Aurangzeb हा ग्रंथ कोणी लिहिला ?

५. Life & Conditions of the people of Hindustan (1200-1500 AD) हा ग्रंथ कोणी लिहिला ?

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. आर्थिक निःसारण २. अर्थतज्ञ ३. अनील सील

४. साम्राज्यवादी ५. ॲन्टोनिओ ग्रामची

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. ॲन्टोनिओ ग्रामची २. अनिल सील ३. के. पी. जयस्वाल

४. सर जदुनाथ सरकार ५. के. एम. अशरफ

## १.६ सारांश

भारतीय राष्ट्रवादाच्या आकलनाचे विविध दृष्टीकोन आहेत. त्यामध्ये साम्राज्यवादी दृष्टीकोन, राष्ट्रवादी दृष्टीकोन, मार्क्सवादी दृष्टीकोन, केंब्रिज दृष्टीकोन, सबाल्टर्न दृष्टीकोन यांचा समावेश होतो. यांनी आपआपल्या विचारसरणीनुसार भारतीय राष्ट्रवादाला एक नवा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. या सर्व दृष्टीकोनाचा उपयोग भारतीय राष्ट्रवादाचा सर्व अंगांनी अभ्यास करण्यास उपयोग होतो. भारतीय राष्ट्रवादाचा उदय, विकास व परिणीती ही सर्व प्रक्रिया इतकी गुंतागुंतीची व समजण्यास दुष्कर आहे की, त्यामुळे राष्ट्रवादाचा कोणताही एक दृष्टीकोन अंतिम किंवा निर्णायक आहे असे मानता येत नाही.

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) दीर्घोत्तरी प्रश**

१. राष्ट्रवादी दृष्टीकोनाची माहिती द्या.

२. केंब्रिज विचारप्रणालीची थोडक्यात माहिती द्या.

३. सबाल्टर्न स्टडीज हा दृष्टीकोन स्पष्ट करा.

**(ब) टीपा लिहा.**

१. राष्ट्रीय दृष्टीकोन

२. राष्ट्रवाद संकल्पना

३. सबाल्टर्न दृष्टकोन

४. केंब्रिज दृष्टीकोन

## १.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


- जास्वंदी वांबूरकर (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे २०१४.
- य. ना. कदम, आधुनिक भारत, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.
- राजीव भार्गव व अशोक आचार्य (संपा.) राजकीय सिद्धांत परिचय, पियरसन प्रकाशन, २००८.
- अभय प्रसाद सिंह (संपा.) भारत में राष्ट्रवाद, ओरिएंट ब्लैकस्वान, नई दिल्ली, २००४.

# घटक – २

# जहालवादी कालखंड

## (Eretremist Phase)


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ जहालवादी विचारसरणी

२.२.२ बंगालची फाळणी / वंगभंग आंदोलन

२.२.३ स्वदेशी चळवळ

२.२.४ होमरूल चळवळ

२.३ पारिभाषिक शब्द

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

२.८ संदर्भग्रंथ सूची


### २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

- जहालवाद म्हणजे काय हे सांगता येईल.
- जहालवादाचा उदय कसा झाला हे सांगता येईल.
- स्वदेशी संकल्पना व चळवळ लोकमान्य टिळकांची चतुःसूत्री संकल्पना काय होती हे सांगता येईल.

- वंगभंग आंदोलन आणि आंदोलनाचे परिणाम याबद्दल सांगता येईल.
- होमरूल लीगची स्थापना, लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंट यांचे होमरूल चळवळीतील योगदान याबद्दल सांगता येईल.
- होमरूल चळवळीच्या परिणामाबद्दल सांगता येईल.

## २.१ प्रस्तावना

आधुनिक भारताच्या इतिहासातील महत्त्वाची घटना म्हणून भारतीय राष्ट्रसभेच्या (Indian National Congress) स्थापनेचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात विकसित झालेल्या भारतीय राष्ट्रवादाचा हा आविष्कार होता. याच राष्ट्रसभा किंवा काँग्रेसने भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मुख्य भूमिका बजावली. संपूर्ण भारताचे राजकीय प्रतिनिधित्व करणारी संघटना म्हणून काँग्रेसकडे बघितले जाऊ लागले. अभ्यासकांनी राष्ट्रसभेच्या विकासाचे विविध कालखंड मानले आहेत. स्थापनेपासून म्हणजेच १८८५ ते १९०५ हा मवाळवादी कालखंड, १९०५ ते १९२० हा जहालवादी कालखंड तर १९२० ते १९४७ हा कालखंड गांधीयुग म्हणून ओळखला जातो. जहाल-मवाळ या संज्ञा काँग्रेसने स्वीकारलेल्या राजकीय भूमिकांच्या संदर्भात वापरल्या जातात.

१८८५ ते १९०५ या कालखंडात काँग्रेसवर दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, सर दिनशॉ वाच्छा, व्योमेशचंद्र बॅनर्जी इ. मवाळवादी नेत्यांचा प्रभाव होता. काँग्रेसने या कालखंडात ब्रिटिश सरकारकडे विविध मागण्या सादर करताना अर्ज-विनंत्यांचा सनदशीर मार्ग अवलंबला. कुठलाही आक्रमक मार्ग स्वीकारला नाही. ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर या नेत्यांचा पूर्ण विश्वास होता. ब्रिटिशांची खपा मर्जी होऊ नये याची पुरेपूर काळजी घेतली जात होती. उदारमतवादी ब्रिटिश सरकार आपल्या सर्व मागण्या पूर्ण करेल असा मवाळवादी नेत्यांचा पक्का समज होता.

काँग्रेसची लोकप्रियता या काळात वाढत गेली. अनेक सुशिक्षित तरुण काँग्रेसचे सदस्य बनलेच शिवाय नियमितपणे काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनास हजर राहू लागले. ब्रिटिश सरकार काँग्रेसने केलेल्या अनेक अर्जविनंत्यांची दखल घेत नाही किंवा पूर्ण दुर्लक्ष करते याची जाणीव सर्वांनाच होऊ लागली. १८९५ पासून काँग्रेसचे राजकारण वळण घेऊ लागले. आक्रमक विचारसरणीचा उदय होऊ लागला. अल्पावधीतच काँग्रेसने दुसऱ्या कालखंडात प्रवेश केला. जो इतिहास जहालवादी कालखंड म्हणून ओळखला जातो.

### जहालवादी विचारसरणी

१९०५ ते १९२० हा जहालविचारसरणीचा कालखंड मानला जातो. या विचारसरणीची सुरुवात १८९५ पासूनच झालेली दिसते. काँग्रेसशी जोडल्या गेलेल्या अनेक तरुणांनी भारतीयांच्या मागण्यांकडे ब्रिटिशांच्या दुर्लक्ष करण्याच्या प्रवृत्तीचे त्याचप्रमाणे मवाळवाद्यांच्या ब्रिटिशांचा अनुनय करण्याच्या प्रवृत्तीचा निषेध करायला सुरुवात केली. याला खऱ्या अर्थाने तीव्रता लाभली ते टिळकांच्या लिखाणाने व वक्तृत्वाने. आपल्या हक्कांसाठी ब्रिटिशांच्या समोर रडून किंवा भीक मागून काही उपयोग होणार नाही आपण त्यासाठी लढलेच पाहिजे आणि शक्य असेल तेथे सरकारला अडवले पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. टिळकांचा राष्ट्रवाद हा आक्रमक राष्ट्रवाद होता. काँग्रेसमधील

मवाळ नेत्यांना हा मार्ग पटणारा नव्हता. दोन्ही गटातील तात्त्विक मतभेद वाढत गेले. १९०५ नंतर काँग्रेसवरील जहालवाद्यांचा प्रभाव वाढत गेला. ज्याचे रूपांतर पुढे काँग्रेस दुभंगण्यात झाले. बंगालच्या फाळणीनंतर जहालवादी विचारसरणी खूपच लोकप्रिय झाली.

**जहालवादी विचारसरणीच्या उदयामागची कारणे**

भारतीय राजकारणाची दिशा बदलून टाकणारी जहालवादी विचारसरणी ही अचानक उदयास आली नव्हती. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर घडलेल्या अनेक गोष्टी यासाठी कारणीभूत होत्या. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील-

**१. ब्रिटिशांनी भारतीयांच्या मागण्यांकडे केलेल्या दुर्लक्ष :** ब्रिटिशांच्या पुढाकारामुळे काँग्रेसची स्थापना झाली होती. सुरुवातीच्या काळात काँग्रेसच्या मवाळ नेत्यांनी ब्रिटिशांना न दुखवता राजकीय-सामाजिक सुधारणांच्या अनेक मागण्या त्यांच्याकडे केल्या. अर्थात हा मार्ग अर्ज-विनंत्यांचा होता. ब्रिटिशांनी याकडे बहुतांशी दुर्लक्षच केले. अनेक न्याय मागण्यांचा ते विचारही करत नव्हते. याची जाणीव काँग्रेसमधल्या अनेक नेत्यांना तीव्रतेने होऊ लागली. यामुळे हा मवाळ मार्ग सोडून आपल्या हक्कांसाठी भांडले पाहिजे हा विचार वाढत गेला जो पुढे जहालवादात रूपांतरीत झाला.

**२. आर्थिक शोषण :** ब्रिटिशांचा भारतातील साम्राज्यवाद हा आर्थिक साम्राज्यवाद होता. स्वतःच्या आर्थिक फायद्यांसाठी ब्रिटिशांनी विविध मार्गांचा वापर करत भारताचे प्रचंड आर्थिक शोषण केले. भारताची कोट्यवधी रुपयांची संपत्ती विविध मार्गांनी ब्रिटनमध्ये नेली गेली. ब्रिटनच्या उद्योगांना संरक्षण मिळावे यासाठी भारतीय मालावर अधिक कराची आकारणी तर आयात ब्रिटिश मालावर जकात कर माफी, भारतीय शेतकऱ्यांवर कर या निर्णयातून ब्रिटिशांची निती स्पष्ट होत होती. न्यायमूर्ती रानडे, दादाभाई नौरोजी, सर दिनशॉ वाच्छा इ. नेत्यांनी त्यांच्या लिखाणातून ब्रिटिशांचे हे आर्थिक शोषणाचे धोरण समोर आणले. भारतीयांच्या दारिद्र्यास ब्रिटिश कारणीभूत आहेत हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले. विशेषतः दादाभाई नौरोजींना मांडलेली 'ड्रेन थेअरी' म्हणजेच संपत्ती निस्सारणाचा सिद्धांत महत्त्वाचा ठरला. या आर्थिक शोषणाविरुद्ध नवशिक्षित तरुणांच्या मनातील चीड वाढत गेली. यातूनच स्वदेशी मालाचा वापर परदेशी मालावर बहिष्कार या जहालवादी संकल्पना विकसित होत गेल्या.

**३. १८९२ चा कायदा :** ब्रिटिशांनी १८९२ चा कॉन्सिल कायदा (Council Act, 1892) आणला. ज्यान्वये केंद्रिय व प्रांतिक कायदेमंडळात भारतीय सदस्यांची संख्या वाढवली. मात्र कामकाजात सहभागी होण्यासाठी नवे नियम लागू केले म्हणजेच भारतीय प्रतिनिधींचा निर्णय प्रक्रियेत फारसा सहभाग असणार नाही याची काळजी ब्रिटिशांनी घेतली. काँग्रेस नेत्यांना बसलेला हा मोठा धक्का होता. विशेषतः ब्रिटिशांवर विश्वास असलेल्या मवाळवादी नेत्यांवर जहालवादी गटाकडून टीका झाली. आपले हक्क मिळवण्यासाठी ब्रिटिशांवर दबाव आणला पाहिजे हे लोकमान्य टिळकांचे विचार अधिक लोकप्रिय झाले.

**४. आंतरराष्ट्रीय घडामोडी :** युरोपियन वसाहतवादाला अनेक आफ्रिकी-आशियाई राष्ट्रे बळी पडली होती. या वसाहतवादाविरोधात जगभरात चळवळी सुरू होत्या. त्या चळवळीही भारतीयांना प्रेरणा देणाऱ्या ठरल्या.

पाश्चात्त्यांविरोधात चीनमध्ये झालेले बॉक्सर बंड, इजिप्तमधील चळवळ, आयर्लंडमधील ब्रिटिशांविरोधातील चळवळ. याचबरोबर १९०५ मध्ये चिमुकल्या जपानने बलाढ्य रशियाचा केलेला पराभव हा युरोपियन लोकांच्या अजिंक्यत्वाच्या भावनेस तडाखा देणारा ठरला. भारतीय तरुणांना यातून चळवळीची प्रेरणा मिळाली.

**५. नैसर्गिक आपत्तीवेळचे ब्रिटिशांचे धोरण**: १९ व्या शतकाच्या अंतिम कालखंडात भारताला अनेक नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागले. भारताचे प्रशासक असलेल्या ब्रिटिशांनी या काळात आपले कर्तव्य पार पाडले नाही. १८९६-९७ चा दुष्काळ खूपच भीषण होता. हजारो लोक दुष्काळामुळे व नंतरच्या रोगराईमुळे मारले गेले. ब्रिटिशांनी यासाठी आवश्यक शेतसारा वसुली केली. ब्रिटिशांची धोरणे यातून स्पष्टपणे दिसत होती. यामुळे भारतीयांच्यात प्रचंड रोष निर्माण झाला. ब्रिटिशांच्या विरोधात जहाल मते व्यक्त होऊ लागली ज्याला लोकांचा पाठिंबा मिळाला.

**६. लॉर्ड कर्झनचे धोरण** : १८९९ ते १९०५ या कालखंडात लॉर्ड कर्झन भारताचा गव्हर्नर जनरल होता. साम्राज्यवादी ब्रिटिशांचे त्याने प्रतिनिधित्व केले. भारताकडे आणि भारतीयांकडे अत्यंत हिनत्वाने पाहणाऱ्या लॉर्ड कर्झनने दडपशाहीचे धोरण अवलंबले. त्याच्या काळात झालेले कायदे हे भारतीयांचे दमन करणारे होते. कलकत्ता कार्पोरेशन ॲक्ट (१८९९), सरकारी गुप्ततेचा कायदा आणि भारतीय विद्यापीठ कायदा (१९०४) याद्वारे त्याने भारतीयांचे अधिकार संकुचित केले. त्याच्या साम्राज्यशाहीचा कळस म्हणजे १९०५ मध्ये त्याने केलेली बंगाल प्रांताची फाळणी होती. कर्झनच्या 'फोडा आणि राज्य करा' या तंत्राची जाणीव या फाळणीमुळे सगळ्यांनाच झाली. त्याच्या या एकतंत्री कारभारामुळे प्रचंड असंतोष निर्माण झाला. जहालवादाच्या प्रसारास अनुकूल वातावरण निर्माण झाले.

**७. जहाल विचारांचे नेतृत्व** – ब्रिटिशांना अर्जविनंत्या करून काहीही मिळणार नाही. आपल्याला आपले हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करावाच लागणार हे म्हणणारा जहालवादी गट काँग्रेसमध्ये प्रभावीपणे कार्य करू लागला. विशेषतः लोकमान्य टिळक, लाला लजपतराय व बिपिनचंद्र पाल या तिघांचे नेतृत्व खूप महत्त्वाचे ठरले. 'लाल-बाल-पाल' या नावाने हे त्रयी प्रसिद्ध झाले. भारतीयांच्यात ब्रिटिशांविरोधात असंतोष जागृत करण्याचे कार्य या तिघांनी केले. भाषणांबरोबर लेखणीचाही त्यांनी वापर केला. लोकमान्य टिळकांनी केसरी व मराठा या वृत्तपत्रांतून, बिपिनचंद्र पाल यांनी 'न्यू इंडिया' तर लाला लजपतराय यांनी 'ट्रिब्यून' या वृत्तपत्राच्या माध्यमातून ब्रिटिशांवर कडक टीका केलीच, त्याचबरोबर लोकांच्यातही जागृती निर्माण केली.

**८. बंगाल प्रांताची फाळणी** : बंगाल प्रांताची फाळणी ही लॉर्ड कर्झनच्या साम्राज्यवादीवृत्तीचा कळस होता. बिहार-ओरीसा-छोटा नागपूर इ. प्रदेशाचाही समावेश होता. या प्रदेशाचे प्रशासन करणे सोयीचे व्हावे म्हणून या प्रांताची फाळणी केली जात आहे असे कारण लॉर्ड कर्झनने सांगितले. प्रत्यक्षात फाळणी करताना मात्र मुस्लिम बहुसंख्याक प्रदेश बाजूला काढला. हिंदू-मुस्लिमांच्यात फूट पाडायची हे त्याचे धोरण स्पष्टपणे दिसत होते. या फाळणीस भारतीयांनी कडाडून विरोध केला. त्याच्यावर खूप टीका झाली. मात्र कर्झनने आपल्या निर्णयात कुठलाच बदल केला नाही. यातूनच 'वंग-भंग आंदोलन' हे फाळणीविरोधातील आंदोलन सुरू झाले. जहालमतवादाच्या प्रसाराचे बंगाल प्रांताची फाळणी हे खूप मोठे कारण ठरले.

**बंगालची फाळणी** (१९०५) : भारतात जहालवादी विचार लोकप्रिय बनण्यामागचे एक महत्त्वाचे कारण म्हणून बंगालच्या फाळणीचा उल्लेख करावा लागतो. भारतीयांच्यात वाढत चाललेली राजकीय जागृती. ब्रिटिश धोरणांना होत असलेला विरोध हे बघून लॉर्ड कर्झनने 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा वापर केला. हिंदू आणि मुस्लिम या दोन प्रमुख समाजात फूट पाडण्यासाठी विस्तृत बंगालची फाळणी घडवून आणली.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील बंगाल प्रांताची भौगोलिक परिस्थिती** : भारतातील एक समृद्ध प्रांत म्हणजे बंगाल ! ब्रिटिशांनी सर्वात अगोदर हाच प्रांत आपल्या ताब्यात घेतला आणि कलकत्त्यास आपली राजधानी बनवली होते. ब्रिटिश अमलाखालील सर्वात मोठा प्रांत असलेल्या तत्कालीन बंगाल प्रांतात बंगाल, बिहार, ओरीसा व आसाम या प्रदेशाचाही समावेश होता. १८७४ मध्ये आसाम प्रांत स्वतंत्र करण्यात आला. या प्रदेशाचे क्षेत्रफळ सुमारे एक लक्ष चौरस मैल तर लोकसंख्या सात कोठी आठ लाख लोकसंख्या होती. पूर्व भागाच्या तुलनेत पश्चिम भागाची अधिक प्रगती झाली होती. तर दळणवळण, पोलीस व्यवस्था व शैक्षणिक व्यवस्थांबाबत पूर्व भाग मागासलेला राहीला. कर्झनच्या प्रतिगामी धोरणांमुळे परिस्थिती आणखीनच बिघडत गेली.

**लॉर्ड कर्झनचा कालखंड** (१८९९ ते १९०५)

१८९९ मध्ये लॉर्ड कर्झन भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्त झाला. ज्याचे स्वागत राष्ट्रसभेकडूनही झाले. भारताची वाटचाल प्रगतीपथावर होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. पण थोड्याच दिवसात कर्झनचा साम्राज्यवादी चेहरा समोर आला. ब्रिटनच्या हिताचे निर्णयच तो घेत असे. भारतीयांकडे बघण्याचा त्याचा दृष्टीकोण तुच्छतेचा होता. त्याच्या एकूण धोरणांमुळे भारतीय नेत्यांकडून कडाडून टीका होऊ लागली. बंगाल प्रांतातला वाढता राष्ट्रवाद त्याला धोकादायक वाटत होता.

**प्रत्यक्ष फाळणी** : या सर्व पार्श्वभूमीवर कर्झनने बंगालची फाळणी अमलात आणली. प्रशासनाच्या सोयीसाठी फाळणी करत आहोत हे त्याने जाहीर केले. त्याच्या योजनेनुसार पूर्व बंगालमधील टिप्पेरा, राजशाही, चितगाव, ढाका आणि संपूर्ण आसाम मिळून पूर्व बंगाल हा प्रांत निर्माण होणार होता. त्याचे क्षेत्रफळ १,१९,५४० चौरस मैल इतके होते तर एकतीस दशलक्ष एवढी लोकसंख्यापैकी अठरा दशलक्ष मुस्लीम तर बारा दशलक्ष हिंदू होते. ढाक्का या शहरास नव्या प्रांताची राजधानी करण्यात आले. पश्चिम बंगाल या प्रांतात पश्चिम बंगाल भागाबरोबर बिहार, ओरीसा हे भाग असणार होते. या प्रांताचे क्षेत्रफळ १,४१,५८० चौरस तर लोकसंख्या पाच कोटी चाळीस लाख इतकी होती. पैकी चार कोटी वीस लाख हिंदू तर नव्वद लाख मुसलमान होते. कलकत्ता हेच या भागाचे राजधानीचे शहर राहणार होते. जरी प्रशासनाच्या सोयीसाठी पुनर्रचना असल्याचे सांगण्यात आले असले तरी हिंदू आणि मुस्लिमांच्यात जातीय तेढ निर्माण करणे हाच कर्झनचा प्रमुख उद्देश आहे हे सर्वांच्याच लक्षात आले. कर्झनच्या या निर्णयाविरोधात ऐतिहासिक 'वंगभंग आंदोलन' सुरू झाले.

**वंगभंग आंदोलन** : बंगाल फाळणीचा सर्वप्रथम ठराव ३ डिसेंबर, १९०३ मध्ये करण्यात आला. तर प्रत्यक्ष फाळणीची घोषणा कर्झनने जुलै १९०५ मध्ये केली. तेव्हापासूनच फाळणी विरोधात सभा-मोर्चे-आंदोलनास सुरुवात झाली. जनमत पूर्णपणे या आंदोलनाच्या विरोधात होते. प्रत्यक्ष फाळणीची अधिकृत घोषणा १६ ऑक्टोबर, १९०५ रोजी करण्यात आली. तोपर्यंत जळवजवळ दोन हजार निषेध सभा घेण्यात आल्या होत्या. १६ ऑक्टोबर

बंगालमध्ये राष्ट्रीय शोकदिन म्हणून पाळण्यात आला. या दिवशी बंगाली जनता गंगा नदीकाठी जमा झाली. सर्वांनी एकमेकांना राख्या बांधल्या व एकतेचे दर्शन घडविले. वंगभंग आंदोलन तीव्र होत गेले.

आंदोलनाचे नेतृत्व सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्याबरोबरच मोतीलाल घोष, गुरूदास बॅनर्जी, रविंद्रनाथ टागोर, आनंदमोहन बोस, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष इ. नेत्यांनी केले. देशपातळीवर लोकमान्य टिळकांनी हे आंदोलन उचलून धरले. बंगालमधील जमीनदारांपासून स्त्रियांपर्यंत अनेकांनी या चळवळीला पाठिंबा दिला. विशेषतः टिळकांची चतुःसूत्री – स्वराज्य, स्वदेशी बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण याचा पुरेपूर अवलंब बंगाली जनतेने केला. फाळणी रद्द करण्याबाबतचे अर्ज त्याचप्रमाणे निषेधाचे ठराव सरकारकडे पाठविले जाऊ लागले. स्वदेशी चळवळीमुळे परकीय मालाची बंगालमध्ये होणारी विक्री खूप कमी झाली. ज्याचा आर्थिक फटका ब्रिटिश कारखानदारांना बसला. ते ही फाळणी रद्द करावी यासाठी ब्रिटीश सरकारवर दडपण आणू लागले. लंडनमधील डेली न्यूज, गार्डियन या वृत्तपत्रांनीही फाळणी रद्द करण्याची मागणी केली. लॉर्ड रिपनसारख्या उदारमतवादी नेत्यांनी कर्झनच्या धोरणांचा जोरदार निषेध केला. अहंकारी कर्झनने दडपशाहीचा पुरेपूर वापर केला. सभा–मोर्चांवर बंदी, भाषणावर बंदी घातली. आंदोलनात सहभागी झालेल्या शाळकरी मुलांवरही लाठीमार केला. नोव्हेंबर, १९०५ मध्ये लॉर्ड कर्झन मायदेशी परतला.

कर्झनच्या जागी गव्हर्नर जनरल म्हणून लॉर्ड मिंटोची नियुक्ती झाली. मात्र त्यानेही फाळणी रद्द करण्यास नकार दिला. त्याच्यानंतर १९११ मध्ये लॉर्ड हार्डिंग्ज हा गव्हर्नर जनरल बनला. या कालखंडात युरोपमध्ये युद्धाचे वातावरण निर्माण होऊ लागले होते. भविष्यात युद्ध झालेच तर भारताच्या मदतीची ब्रिटिशांना खूप आवश्यकता वाटत होती. ब्रिटिश कारखानदारांचे दडपणही वाढले होते. अखेरीस ब्रिटिश युवराजाच्या वाढदिवसाचे निमित्त साधून दिल्ली येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या वेळी बंगालची फाळणी रद्द केल्याचे जाहीर करण्यात आले. वंगभंग आंदोलनाच्या या प्रदीर्घ लढ्याला यश प्राप्त झाले.

**परिणाम** : बंगाल प्रांताची फाळणी, त्यानंतर झालेले वंगभंग आंदोलन आणि १९११ मध्ये ब्रिटिशांनी रद्द केलेली फाळणी या सर्व घटना भारतीय राजकारणावर प्रदीर्घ परिणाम करणाऱ्या ठरल्या. भारतात विशेषतः बंगाल प्रांतात वाढत चाललेल्या राष्ट्रवादी विचारांना कर्झन थोपवायचे होते. हिंदू–मुस्लीम समाजातील फूट हा त्यावरचा एक महत्त्वाचा उपाय होता. कर्झन हा काही प्रमाणात त्यात यशस्वीही झाला. अनेक मुस्लिमांना ब्रिटिशांनी पटवून दिले की फाळणीमध्ये त्यांचा फायदा आहे. पुढे फाळणी रद्द झाली. मात्र या दोन समाजातील तेढ वाढत गेली.

फाळणीविरोधी आंदोलनाने भारतीयांना स्वतःतील शक्तीची जाणीव झाली. विशेषतः स्वदेशी व बहिष्कार आंदोलनाचा व्यापक परिणाम झाल. राष्ट्रीय आंदोलनाची ती महत्त्वाची शस्त्रे बनली. परदेशातून येणारा माल उदा. कापड, मीठ, साखर, तंबाखू इ. वस्तू लोकांनी घ्यायच्या बंद केल्या. त्याचा फटका ब्रिटिश कारखानदारांना बसला. फाळणी ही ब्रिटिशांची मोठी चूक होती हे काही ब्रिटिश मुत्सद्यांनी कबूल केले.

ब्रिटिश सरकारचा अनुनय करणाऱ्या काँग्रेसमधील मवाळवाद्यांचा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवरील विश्वास कमी झाला. काँग्रेसवरची त्यांची पकड कमी झाली. यानंतरच्या काळात जहालवाद्यांचा प्रभाव वाढत गेला. १९०७ मध्ये दोन्ही गटातले मतभेद वाढून काँग्रेसमध्ये फूट पडली.

वंग–भंग आंदोलनाने भारताच्या भविष्यातील चळवळींना मार्गदर्शन करण्याचे काम केले हे निश्चित.

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ड्रेन थेअरी (निस्सारणाचा सिद्धांत) ............. मांडला.

(अ) सुरेंद्रनाथ बॅनर्जी (ब) दादाभाई नौरोजी

(क) लोकमान्य टिळक (ड) दिनशॉ वाच्छा

२. ............. या राष्ट्राने १९०५ मध्ये बलाढ्य रशियाचा पराभव केला.

(अ) इंडोनेशिया (ब) भारत

(क) जपान (ड) फ्रान्स

३. बंगाल प्रांताची फाळणी ............. या सालात करण्यात आली.

(अ) १८८५ (ब) १९०५

(क) १९३० (ड) १९४७

४. बंगालमध्ये ............. हा दिवस राष्ट्रीय शोकदिन म्हणून पाळण्यात आला.

(अ) १६ ऑक्टोबर १९०५ (ब) १ जानेवारी १९०६

(क) १५ जुलै १९११ (ड) २७ डिसेंबर १९०५

५. बंगालची फाळणी ............. या व्हाईसरॉयच्या कालखंडात रद्द झाली.

(अ) लॉर्ड हार्डिंग्ज (ब) लॉर्ड कर्झन

(क) लॉर्ड रिपन (ड) लॉर्ड मिंटो

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. भारताच्या इतिहासातील कोणता कालखंड जहालवादी कालखंड म्हणून ओळखला जातो ?

२. कोणत्या कायद्यान्वये ब्रिटिशांनी केंद्रिय-प्रांतिक मंडळात भारतीयांची संख्या वाढविली ?

३. लाला लजपतराय यांनी जहालवादाच्या प्रसारासाठी कोणत्या वृत्तपत्रातून लिखाण केले ?

४. बंगालची फाळणी कोणत्या गव्हर्नर जनरलच्या काळात झाली ?

५. बंगालची फाळणी कोणत्या साली रद्द झाली ?

## स्वदेशी चळवळ

### प्रस्तावना

जहालवादाचा उदय हा राष्ट्रीय काँग्रेसच्या विकासातील पुढचा टप्पा ठरला. जहालवादी नेत्यांनी काँग्रेसला अधिक कृतिशील बनविले. मरगळलेल्या जनतेला राजकीयदृष्ट्या जागृत करण्याचे विशेष प्रयत्न केले गेले. स्वतःच्या राजकीय हक्कांसाठी प्रसंगी सरकारविरोधात संघर्ष हा मूलमंत्र या काळात दिला गेला. या कालखंडात काँग्रेस आणि भारतीय राजकारणाची सूत्रे सांभाळली ती लोकमान्य टिळक आणि त्यांच्या जहालवादी सहकाऱ्यांनी ! 'स्वराज्य' हे एक अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट त्यांनी जनतेसमोर ठेवले. जनतेला जागृत करण्यासाठी, तिच्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा प्रसार करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब टिळकांनी केला. त्यापैकी एक महत्त्वाचा मार्ग होता चतुःसूत्रीचा अवलंब – स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य ! जहालवाद्यांचा हा जणू मूलमंत्र ठरला. स्वहक्क मिळविण्यासाठी या चार मार्गांचा वापर नेत्यांनी आणि जनतेनेही केला. जनतेत जागृती आणण्यासाठी हा कार्यक्रम खूप उपयुक्त ठरला. पुढे महात्मा गांधीनीही स्वदेशी आणि बहिष्कार या दोन तत्त्वांचा वापर आपल्या आंदोलनात केला.

**चतुःसूत्री** : राष्ट्रीय आंदोलन ज्यामुळे अधिक धारदार बनले ती चतुःसूत्रीची संकल्पना पुढील प्रमाणे –

**१. स्वराज्य** : टिळकांनी स्वराज्याची खूप व्यापक संकल्पना केली होती. स्वराज्य म्हणजे आपले राज्य– आपले शासन. व्यक्तीला राजकीय, आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्य मिळाले तरच त्याची आणि पर्यायाने समाजाची प्रगती होते आणि त्यासाठीच स्वराज्य हे आवश्यक आहे असे टिळकांचे मत होते. स्वराज्यप्राप्तीसाठी सर्व काही करण्याची त्यांची तयारी होती. स्वराज्य मिळविणे हा ते जन्मसिद्ध हक्क मानत होते. अरविंद घोषांनी संपूर्ण स्वराज्याची संकल्पना मांडली. चतुःसूत्रीतील इतर तीन तत्त्वे स्वराज्य या साध्यासाठीची साधने बनली.

**२. स्वदेशी** : स्वतःच्या देशात तयार झालेला माल जसा असेल तसा वापरणे आणि परकीयांचा माल नाकारणे. याचा खूप परिणामकारक वापर टिळकांनी केला.

**३. बहिष्कार** : स्वदेशीला पूरक असणारे आंदोलन, कोणतीही विदेशी वस्तू वापरायची नाही. या माध्यमातून ब्रिटिशांची अर्थव्यवस्थळा खिळखिळी करायची. यातून ब्रिटिशांच्या आर्थिक साम्राज्यवादाचा कणा मोडून काढायचा. परदेशी मालाच्या बहिष्कारातूनच देशी मालाच्या वापराला चालना मिळणार होती. ब्रिटिश सरकारपर्यंत आपला निषेध पोहोचविण्यासाठी ठिकठिकाणी परदेशी कपड्यांची होळी करण्यात आली.

**४. राष्ट्रीय शिक्षण** : ब्रिटिशांनी निर्माण केलेली शिक्षणपद्धती ही पाश्चात्यधार्जिणी, कारकून निर्माण करणारी शिक्षण पद्धती आहे. ज्यातून राष्ट्र उभारणीचे संस्कार होत नाहीत. जेव्हा राष्ट्राभिमान वाढेल, स्वावलंबी तरुण निर्माण होईल, भारतीय संस्कृती, देशप्रेमाचे संस्कार होतील अशा शिक्षण देणाऱ्या शाळा, महाविद्यालये सुरू करण्याची योजना टिळकांनी मांडली. त्या दृष्टीने त्यांनी स्वतःही प्रयत्न केले. पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटी हे त्याचेच प्रतीक होते.

ही चतुःसूत्री राष्ट्रीय आंदोलनास व्यापक बनविणारी, पुढे नेणारी ठरली. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादाला जोरदार धक्का देण्याचे काम यामुळे झाले.

**स्वदेशी संकल्पना :** टिळकांच्या अगोदर ही संकल्पना पत्रकार, समाजसुधारक व इतिहासलेखक गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी मांडली होती. भाऊ महाजन यांनी सुरू केलेल्या 'प्रभाकर' या साप्ताहिकातून त्यांनी १८४८ पासून लिखाण करायला सुरुवात केली. समाजसुधारणांबद्दलचे हे त्यांचे लिखाण 'शतपत्रे' या नावाने प्रसिद्ध झाले. भारताच्या आर्थिक दुरव्यवस्थेचे वर्णन करताना त्यांनी 'स्वदेशी' या संकल्पनेचा वापर केला. ब्रिटिश लोक त्यांचा माल इकडे खपवतात आणि त्यावर श्रीमंत बनतात. भारतीयांनी गरजेच्या वस्तू स्वतःच बनवायला शिकावे. विलायती सामान घेऊ नये असे लोकहितवादींचे मत होते. थोडक्यात ब्रिटिशांचा आर्थिक साम्राज्यवाद मोडून काढण्यासाठी भारतीयांनी काय केले पाहिजे हे त्यांनी खूप पूर्वी सांगितले होते.

स्वदेशी संकल्पनेला मूर्त रूप देणारे दुसरे समाजसुधारक म्हणून आपल्याला गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांचे नाव घ्यावे लागते. १८७२ मध्ये त्यांनी 'स्वदेशी चळवळ' सुरू केले. ते स्वतः खादीशिवाय दुसरे वस्त्र वापरत नसत. अखेरपर्यंत त्यांनी केवळ खादीचाच वापर केला. त्यांनी 'देशी व्यापारोत्तेजक मंडळ' स्थापन करून शाई, मेणबत्त्या, छत्र्या, साबण इ. केवळ स्वदेशी वस्तुउत्पादनास प्रोत्साहन दिले. त्यासाठी त्यांनी स्वतः आर्थिक भारही सोसला. ठिकठिकाणी जाऊन व्याख्याने दिली. त्यांच्या प्रयत्नामुळे आग्रा येथे 'कॉटन मिल' सुरू करण्यात आली.

या दोघांप्रमाणेच न्यायमूर्ती रानडे, दादाभाई नौरोजी यांनीही ब्रिटिशांचा आर्थिक साम्राज्यवाद उघडा पाडत स्वदेशीचे महत्त्व समाजाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. मात्र या संकल्पनेला जोरदार चालना मिळाली ती टिळकयुगाला.

**लोकमान्य टिळक आणि स्वदेशी**

लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय विचारांचा एक महत्त्वाचा भाग म्हणून स्वदेशी चळवळीचा उल्लेख करावा लागतो. केसरी या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी स्वदेशीची संकल्पना रुजविण्याचा प्रयत्न सुरू केला. स्वदेशप्रेमाची भावना जनमाणसात निर्माण करण्याचा मार्ग 'स्वदेशी' आहे असे त्यांचे मत होते. त्यांच्या नेतृत्वाखालील सार्वजनिक सभेने हाच कार्यक्रम हाती घेतला होता. स्वदेशीच्या माध्यमांतून ब्रिटिशांच्या अर्थव्यवस्थेला धक्का देण्याचा त्यांचा उद्देश होता. यासाठीच 'स्वदेशी' चळवळ ही राष्ट्रीय आंदोलनाचा एक भाग बनली आणि या माध्यमातून सामान्य जनतेलाही यात सहभागी करून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. देशातील जनतेच्या गरजेच्या वस्तू देशातच निर्माण व्हाव्यात आणि त्यसाठीचे भांडवलही आपणच उभा करायचे त्यासाठी पैसाफंड योजना त्यांनी राबविली. स्वदेशी माल तुलनेने थोडा महाग असला तरी जनतेने तोच घ्यावा कारण त्यासाठी दिला जाणारा पैसा हा आपल्या देशातच राहतो तर परकीय माल स्वस्त असला तरी त्यातून जाणारा पैसा परदेशी जातो हे त्यांनी जनतेला सांगितले. स्वदेशीमुळे भारतीयांना उद्योगधंदे मिळावेत व जे आहेत ते भरभराटीस यावेत, अंतकरण स्वदेशी आहे ते ओळखावे असेही त्यांनी सांगितले.

लोकमान्यांच्या स्वदेशी चळवळीला विरोध करणारे अनेकजण होते. विशेषतः स्वदेशी वस्तू पाश्चात्य वस्तूंच्या तुलनेत महाग आहेत हा त्यांचा आक्षेप होता. मवाळवादी काँग्रेसनेते सर दिनशॉ वाच्छा यांनी सर्व भारतीयांना पुरेल एवढे स्वदेशी कापड भारतात तयार होत नाही असा प्रश्न उपस्थित केला तेव्हा टिळकांनी ताबडतोब केसरी वृत्तपत्रातून

प्रत्युत्तर दिले की, मालाचा खप वाढला की उत्पादनही वाढते हा अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे. स्वदेशी वापरायला सुरुवात केली की असेच होत जाईल.

स्वदेशी माल तयार करण्यासाठी तज्ज्ञ कारागिर लागतील त्यासाटी आपले विद्यार्थी परदेशी पाठवून त्यांना तज्ज्ञ करून आणले पाहिजे ही भूमिकाही त्यांनी मांडली. ती अतिशय महत्त्वाची होती.

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या स्वदेशी चळवळीला चांगला प्रतिसाद मिळू लागला. लोकांनी स्वदेशी कापडाची-वस्तूंच्या वापराबरोबर परकीय कपड्यांची होळी केली. परदेशी साखरेवर बहिष्कार टाकला. परदेशी काचेपासून तयार केल्या जाणाऱ्या बांगड्या वापरणे अनेक स्त्रियांनी बंद केले. याशिवाय परदेशी कागद, रसायने, सिगारेट, भांडी, साबण, टोप्या, काचसामान इ. वस्तू घेणेही लोकांनी बंद केले. विशेषतः वंगभंग आंदोलनात स्वदेशी एक अत्यंत महत्त्वाचे हत्यार बनले. भारतीय उद्योग-व्यवसायांना चालना मिळाली. भारतात अनेक ठिकाणी देशी कापड गिरण्या निघाल्या. आचार्य प्रफुल्लचंद्र रे यांनी 'बंगाल रासायनिक स्वदेशी वस्तू भांडार' स्थापन केले तर टिळकांनी मुंबईल स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स उघडले. अगदी वकिलांनीही परदेशी मालाचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांचे खटले चालविणे नाकारले. अनेक व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानात केवळ स्वदेशी मालच विक्रीला ठेवला.

**स्वदेशी व बहिष्कार चळवळीचे परिणाम :** केवळ स्वदेशी मालाचा वापर आणि परकीय मालावर बहिष्कार याला भारताच्या विविध भागात चांगलाच प्रतिसाद मिळाला. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनास एक महत्त्वाचा आर्थिक संदर्भ यामुळे प्राप्त झाला. स्वदेशी मालाची मागणी - खप यानंतर वाढला. विशेषतः भारतीय कपड्यास असणारी मागणी वाढली आणि त्यामुळे गिरण्यांची संख्याही वाढली. एकट्या अहमदाबादेत १९०५ मध्ये ३२ गिरण्या होत्या. १९१० मध्ये ही संख्या ५२ वर गेली. स्वदेशी वस्तू भांडाराची निर्मिती झाली. अवजड उद्योग सुरू करण्याचे धाडस भारतीय उद्योजकांनी केले. उदा. मद्रास प्रांतातील तुतिकोरीन येथे चिदंबरम पिल्लई यांनी स्वदेशी जहाज वाहतूक कंपनी सुरू केली. वंग-भंग आंदोलन या दोन सुत्रामुळे खूप परिणामकारक बनले. परदेशी मालाचा वापर खूप कमी झाला. परिणामी ब्रिटिश भांडवलदारांना याचा जोरदार फटका बसला. काही ब्रिटिश उद्योग बंद पडले. काँग्रेसवर वर्चस्व असलेल्या मवाळवाद्यांना या चळवळीची दखल घ्यावी लागली. १९०७ मध्ये सुरत अधिवेशनाच्या वेळी काँग्रेस दुभंगली त्यानंतर जहालवाद्यांचा प्रभाव वाढून 'चतुःसूत्री' हा काँग्रेसचा कार्यक्रम बनला. ब्रिटिशांच्या आर्थिक साम्राज्यवादाला आव्हान देण्याचे कार्य या चळवळीने केले. भारतातील राजकीय बदलांचा हा एक अतिशय महत्त्वाचा टप्पा ठरला.

### स्वयं अध्ययन प्रश्न २

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............. यांनी सर्वप्रथम स्वदेशी संकल्पना मांडली.

(अ) लोकमान्य टिळक (ब) लोकहितवादी

(क) दादाभाई नौरोजी (ड) रमेश दत्त

२. ............. या नेत्यांनी स्वदेशी चळवळीवर आक्षेप घेतला.

(अ) न्यायमूर्ती रानडे (ब) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

(क) दिनशॉ वाच्छा (ड) फिरोजशहा मेहता

३. देशी व्यापारोत्तेजक मंडळ ............. यांनी स्थापन केले.

(अ) सार्वजनिक काका (ब) लाला लजपतराय

(क) अय्यर (ड) न्या. रानडे

४. बंगाल रासायनिक स्वदेशी वस्तू भांडार ............. यांनी सुरू केले.

(अ) लोकमान्य टिळक (ब) रमेश दत्त

(क) आचार्य प्रफुल्लचंद्र रे (ड) बाबू घोष

५. ............. या वर्षी झालेल्या सुरत अधिवेशनाच्या वेळी काँग्रेस दुभंगली.

(अ) १९०१ (ब) १९०७

(क) १९१० (ड) १९१७

## होमरूल चळवळ

### प्रस्तावना

'होमरूल' ही मूळची पाश्चात्य संकल्पना. स्वतःच्या देशाचा कारभार स्वतः करण्याचा अधिकार प्राप्त करून घेण्यासाठी होमरूल ही चळवळ प्रथम आयर्लंडमध्ये सुरू झाली. भारतामध्येही अशाचप्रकारची चळवळ सुरू करावी असा विचार आयरिश विदुषी डॉ. ॲनी बेझंट यांनी मांडला. भारतीय भाषेत होमरूलचा अर्थ 'स्वराज्य' असा केला गेला. भारतातल्या होमरूल चळवळीची पायाभरणी लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंट यांनी केली. ज्याला जनतेकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. अल्पावधीतच या चळवळीची लोकप्रियता वाढली. संपूर्ण भारताबरोबरच भारताबाहेरही या चळवळीच्या माध्यमातून भारताची होमरूलची किंवा स्वशासनाची मागणी पोहोचवली गेली. लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंट यांनी स्वतंत्रपणे होमरूल लीगची स्थापना केली असली तर परस्पर सहकार्याने त्यांनी पुढची वाटचाल केली.

### लोकमान्य टिळक आणि होमरूल लीग

मंडालेच्या तुरुंगातून मायदेशी परतल्यावर लोकमान्य टिळक पुन्हा जोमाने देशकार्याच्या कामास लागले. डिसेंबर, १९१५ मध्ये पुणे येथे टिळकांनी जहालवादी नेत्यांची बैठक बोलावली. यावेळी टिळकांनी 'होमरूल लीग' ची संकल्पना मांडली. ज्यावर बराच विचारविनिमय झाला. पुढे २८ एप्रिल, १९१६ रोजी बेळगाव येथे झालेल्या परिषदेत 'होमरूल लीग' च्या स्थापनेची औपचारिक घोषणा करण्यात आली. जोसेफ बॉप्टिस्टा हे लीगचे अध्यक्ष असणार होते तर न. चि. केळकर हे सचिवपदी नियुक्त केले गेले. लीगचे मुख्य कार्यालय पुणे हे असणार होते. या

कार्यात दादासाहेब खापर्डे, शि. ल. करंदीकर, डॉ. मुंजे यांनीही लोकमान्य टिळकांना साथ दिली. होमरूल लीग ही राष्ट्रसभेच्या कार्यास पूरक म्हणून कार्य करेल असे टिळकांनी जाहीर केले. टिळकांनी वाणी आणि लेखणीचा वापर करून होमरूलचा जोरदार प्रचार केला. टिळकांची लोकप्रियता या काळात खूप वाढली. त्यांच्या प्रचारामुळे एप्रिल १९१७ पर्यंत चौदा हजार लोकांनी लीगचे सदस्यत्व पत्करले.

**डॉ. ॲनी बेझंट आणि होमरूल लीग**

ॲनी बेझंटना आयर्लंडमधली होमरूल चळवळीची पूर्ण माहिती होती. थिऑसॉफिकल सोसायटीच्या माध्यमातून १८९३ पासून त्या भारतात धार्मिक-शैक्षणिक कार्य करत होत्या. प्राचीन भारतीय धर्मग्रंथातील ज्ञान आणि तत्त्वज्ञान याबद्दल त्यांना खूप आदर होता. भारत हीच त्यांची कर्मभूमी बनली होती. प्राचीन धर्मग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी बनारस येथे 'सेंट्रल हिंदू स्कूल' व कॉलेज स्थापन केले. याचेच रूपांतर पुढे 'बनारस हिंदू विद्यापीठात' झाले. प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याचे कार्य त्यांनी केले. १९१४ मध्ये त्यांनी राजकीय क्षेत्रात पदार्पण केले. केवळ धार्मिक-शैक्षणिकच नव्हे तर राजकीय सुधारणा मिळाल्या तरच भारताची उन्नती होऊ शकेल असे त्यांना वाटू लागले. विशेषतः स्वशासनाची भारताला गरज आहे असे त्यांचे मत बनले. १९१४ मध्ये त्यांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. याच वर्षी त्यांनी 'कॉमनवील' नावाचे साप्ताहिक व 'न्यू इंडिया' हे वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी भारताला साम्राज्यांतर्गत स्वशासन मिळवून देण्याचा हेतू त्यांनी घोषित केला. पहिल्या महायुद्धात भारताकडून जी मदत घेतली जात आहे त्या बदल्यात ब्रिटिशांनी भारतीयांना राजकीय अधिकार द्यावेत असे त्यांचे मत होते. १९१५ मध्ये काँग्रेस अधिवेशनात होमरूलचा ठरावही त्यांनी मांडला. काँग्रेसच्या अंतर्गत 'होमरूल गट' स्थापन करण्याची त्यांची इच्छा होती. परंतु या काळात काँग्रेसवर वर्चस्व असलेल्या मवाळवाद्यांनी याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. ॲनी बेझंट यांनी काही काळ वाट बघून २५ सप्टेंबर, १९१६ मध्ये मद्रासमध्ये होमरूल लीगची स्थापना केली. ॲनी बेझंट 'कॉमनवील' व 'न्यू इंडिया'तून आपले विचार मांडत होत्याच शिवाय विविध भागांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांनी होमरूलचा प्रचार केला. ब्रिटीश पार्लमेंटमध्ये भारताविषयी सहानुभूती असणारा जो गट होता त्याच्या माध्यमातून आपले म्हणणे तेथे पोहोचविण्याचा प्रयत्नही त्यांनी केला.

याच कालखंडात लोकमान्य टिळकांनी स्थापन केलेली होमरूल लीगही कार्यरत झाली होती. दोन्ही नेत्यात अनौपचारिक समझोता होऊन टिळक महाराष्ट्र व मध्यप्रांतात तर भारतात ॲनी बेझंट या होमरूलचा प्रसार करतील असे ठरले. त्यांच्या परस्पर सहकार्याने होमरूल चळवळीचा वेगाने प्रसार झाला.

**होमरूलची उद्दिष्टे –** होमरूल चळवळीची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील –

१. भारतीय जनतेत राजकीय हक्कांबद्दल जागृती निर्माण करणे आणि त्या माध्यमातून लोकांना संघटीत करणे.

२. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळविणे.

३. स्वराज्य मिळेपर्यंत चळवळ अधिक गतिशील करणे.

### होमरूल चळवळीचा प्रसार व ब्रिटिशांची दडपशाही

ॲनी बेझंट व टिळक या दोघांनीही होमरूलच्या प्रसारासाठी स्वतःला वाटून घेतले. भारतात विविध ठिकाणी होमरूल लीगच्या शाखा स्थापन झाल्या. दोघांनीही आपल्या प्रभावी वक्तृत्वाच्या माध्यमातून भारतीयांपर्यंत होमरूलची संकल्पना पोहोचविण्याचे कार्य केले. या दोघांमुळे होमरूल लीगची लोकप्रियता काँग्रेसपेक्षाही अधिक वाढली. या काळातल्या राष्ट्रीय आंदोलनाचे नेतृत्व आपोआपच या दोन नेत्यांच्या हातात आले. टिळकांनी स्थापन केलेल्या लीगची सभासद संख्या १९१७ मध्ये ३३,००० च्या वरती गेली. १९१७ ला लीगचे अधिवेशन नाशिक येथे आयोजित करण्यात आले होते. यात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी होमरूलचा जोरदार प्रचार आणि प्रसार केला. ॲनी बेझंट त्या वर्षीच्या कलकत्ता काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्ष बनल्या. एखाद्या महिलेला प्रथमच हा मान मिळाला होता. अध्यक्षीय भाषणात त्यांनी 'होमरूल'चे जोरदार समर्थन केले.

होमरूल लीगची किर्ती परदेशातही पोहोचली. अमेरिका त्याचप्रमाणे ब्रिटन येथील वृत्तपत्रांनीही या चळवळीची दखल घेतली. भारतातील या चळवळीबद्दल त्यांनी अनुकूल लेखन केले. कॅनडासारखेच भारतालाही वसाहतीचे स्वराज्य मिळावे अशी मागणी केली जाऊ लागली. मद्रास होमरूल लीगचे अध्यक्ष सर सुब्रह्मण्यम अय्यर यांनी तर १९१७ मध्ये थेट तत्कालीन अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सनला पत्र लिहून चळवळीला पाठिंबा देण्याची विनंती केली. ब्रिटनवर टीका होऊ लागली. या अनुकूल वातावरणाचा फायदा घेण्यासाठी टिळकांनी लाला लजपतराय, एस. एस. हर्डीकर इ. ना अमेरिकेत पाठविले. या नेत्यांनी अमेरिकेत होमरूल चळवळीचे विचार पोहोचविले. न्यूयॉर्क व सॅनफ्रान्सिस्को येथे होमरूल लीगच्या शाखा सुरू करण्यात आल्या. तेथे 'यंग इंडिया' हे वृत्तपत्र सुरू करून त्या माध्यमातूनही लीगच्या विचारांचा प्रसार करण्यात आला.

लंडनमध्येही लीगची शाखा स्थापन झाली. होमरूल चळवळीच्या माध्यमातून भारताचा प्रश्न जागतिक स्तरावर पोहोचला.

होमरूल लीगची देशातील व परदेशातील वाढती लोकप्रियता ब्रिटिशांच्या दृष्टीने मोठी डोकेदुखी हेती. ही चळवळ दाबण्यासाठी दडपशाहीचा मार्ग त्यांनी स्वीकारला. विशेषतः मद्रास सरकारने कडक धोरण स्वीकारले. विद्यार्थ्यांना राजकीय परिषदांमध्ये सहभागी होण्यास बंदी घालण्यात आली. ॲनी बेझंटवर खटला दाखल करून त्यांनी मुंबईत प्रवेश करण्यास बंदी घातली. तर बिपिनचंद्र पाल यांना पंजाब व दिल्ली येथे येण्यास मज्जाव केला. १९१७ मध्ये ॲनी बेझंट, जॉर्ज अरूंडेल, वी. पी. वाडीयांना अटक करण्यात आली. ज्याचा देशभरातून निषेध झाला. लोकमान्य टिळकांवर मुंबई सरकारने खटला दाखल केला होता ज्यातून ते निर्दोष सुटले. ॲनी बेझंट यांच्या सुटकेसाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. मद्रास सरकारने जामीनाची रक्कम म्हणून वीस हजार रुपये भरायला सांगितली. अखेरीस ॲनी बेझंटना आपले मुद्रणालय विकावे लागले. इकडे टिळकांनी या अटकेविरोधात सत्याग्रहाची तयारी सुरू केली. हे कळल्यावर ब्रिटिशांनी ॲनी बेझंट यांची सुटका केली. सरकारची दडपशाही वाढेल तेवढाच चळवळीस जोर चढत गेला.

अखेरीस मॉन्टेग्यू याने २० ऑगस्ट १९१७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये भारताला जबाबदार शासनपद्धती

देण्याचा ब्रिटिशांचा विचार असून यासाठी चर्चा करण्यासाठी ते लवकरच भारतात येतील असे जाहीर केले. होमरूल चळवळीचे हे यश होते.

**होमरूल चळवळीचे परिणाम**

१. लोकमान्य टिळकांच्या अटकेनंतर काँग्रेसवर मवाळवाद्यांचे वर्चस्व निर्माण झाले होते. या चळवळीनंतर पुन्हा एकदा जहालवाद्यांचा काँग्रेसमधील प्रभाव वाढला.

२. भारतातील मरगळलेल्या जनतेत स्वातंत्र्यलढ्याचे चैतन्य पुन्हा एकदा भरण्याचे कार्य या चळवळीने केले.

३. होमरूल चळवळीमुळे भारताच्या स्वराज्याचा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला. ब्रिटिशांवरचा नैतिक दबाब त्यामुळे वाढीस लागला.

४. होमरूल चळवळ भारताच्या अनेक भागात पोहोचली ज्यामुळे हे भागही स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाले. भविष्यातील लढाऊ स्वातंत्र्य आंदोलनाचा पाया त्यावेळी घातला गेला.

५. बॅरिस्टर जिनांनीही या चळवळीला पाठींबा दिला. मुस्लिम लीग-काँग्रेस यामुळे एकत्र आले. जिनांनी मतभेद बाजूला ठेवले. याचा सकारात्मक परिणाम झाला. ब्रिटिशांवरचा दबाब यामुळे वाढला.

६. या आंदोलनात देशातली तरुण पिढी उतरली. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्त्रियाही सहभागी झाल्या. ॲनी बेझंट यांच्यामुळे कलकत्ता काँग्रेस अधिवेशनात अनेक स्त्रिया सहभागी झाल्या.

७. या चळवळीची दखल अखेरीस ब्रिटिशांना घ्यावी लागली. भारतमंत्री मॉन्टेग्यूला यासाठी जबाबदार शासनपद्धतीचा विचार करण्यात येईल अशी घोषणा करावी लागली. या चळवळीचा हा विजय होता.

ब्रिटिशांच्या विरोधात भारतीय जनतेत असंतोष निर्माण करण्याचे आणि 'स्वराज्य' संकल्पना रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या चळवळीने केले. जनआंदोलनाची दखल सरकारला घ्यावी लागते हा आत्मविश्वासही यातून निर्माण झाला.

**होमरूल चळवळीचा ऱ्हास** : भारतात लोकप्रियतेच्या शिखराला पोहोचलेली होमरूल चळवळ १९१८ नंतर मात्र हळूहळू ऱ्हास पावत गेली. ब्रिटिश सरकारकडून सुधारणांचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलनात एकदम शिथिलता आली. मॉन्फर्ड अहवालावरून लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंट यांच्यात मतभेद निर्माण झाले. वसाहतीच्या स्वराज्याची मागणी जहालवादी तरुणांना नको होती त्यांना स्वयंनिर्णय व संपूर्ण जबाबदारीचे राज्य हवे होते. मतभेद अगदी विकोपाला गेले. ॲनी बेझंट होमरूल लीग मधून बाहेर पडल्या. लोकमान्य टिळकांचा मृत्यू हेही या चळवळीच्या ऱ्हासाचे महत्त्वाचे कारण ठरले. १९२० मध्ये अखिल भारतीय होमरूल लीगने महात्मा गांधीना आपले अध्यक्ष बनविले. यानंतरच्या काळात सत्य-अहिंसेवर आधारीत गांधींच्या आंदोलनाला सुरुवात झाली. होमरूल लीगचे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये विलिनीकरण झाले. होमरूल लीगला आपले स्वतंत्र अस्तित्व ठेवता आले नाही तरीही भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील तिचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. होमरूल चळवळ सर्वप्रथम ............. या राष्ट्रात सुरू झाली.

(अ) इंग्लंड (ब) आयर्लंड

(क) ऑस्ट्रिया (ड) फ्रान्स

२. भारतात होमरूल चळवळ सुरू करावी असा विचार आयरिश विदुषी ............. यांनी मांडला.

(अ) मागरिट नोबेल (ब) नॅन्सी कझिन्स

(क) ॲनी बेझंट (ड) थॅचर

३. लो. टिळक प्रणित होमरूल लीगचे अध्यक्षपद ............. यांनी सांभाळले.

(अ) जोसेफ बॅप्टिस्टा (ब) बिपीनचंद्र पाल

(क) ॲनी बेझंट (ड) अय्यर

४. कॉमनवील हे साप्ताहिक ............. यांनी सुरू केले.

(अ) लोकमान्य टिळक (ब) दादाभाई नौरोजी

(क) सार्वजनिक काका (ड) ॲनी बेझंट

५. अखिल भारतीय होमरूल लीगचे १९२० मध्ये ............. यांना अध्यक्ष बनविले.

(अ) महात्मा गांधी (ब) जवाहरलाल नेहरू

(क) सुभाषचंद्र बोस (ड) ॲनी बेझंट

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. होमरूल लीगच्या अमेरिकेतील कुठल्या शहरातून शाखा स्थापन झाल्या ?

२. १९१७ च्या काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष कोण होते ?

३. अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सनना कोणी पत्र लिहिले ?

४. ‘यंग इंडिया’ हे वृत्तपत्र कोठे सुरू करण्यात आले ?

५. बॅरिस्टर जिनांनी कोणत्या चळवळीला पाठिंबा दिला ?

## २.४ पारिभाषिक शब्द

**मवाळ कालखंड** : (१८५५ ते १९०५) राष्ट्रीय काँग्रेसचा प्रारंभिक कालखंड ज्यात ब्रिटिशांकडे मागण्या मागताना अर्ज, विनंत्या, निवेदने या मार्गांचा वापर केला जात होता.

**चतु:सूत्री** : स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चार सुत्रांचा समावेश असलेला राष्ट्रीय कार्यक्रम, ज्या माध्यमातून ब्रिटिश सरकारला विरोध केला जाणार होता.

**ड्रेन थेअरी** : संपत्ती निस्सारणाचा सिद्धांत ज्याद्वारे दादाभाई नौरोजींनी ब्रिटिश विविध मार्गांनी भारताची कशी लूट करत आहेत आणि भारताचा पैसा ब्रिटनमध्ये कसा जातो आहे हे दाखवून दिले.

**मॉन्फर्ड अहवाल** : १९१९ चा मॉन्टेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा अहवाल.

## २.४ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

### स्वयंअध्ययन प्रश्न १

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. दादाभाई नौरोजी २. जपान ३. १९०५

४. १६ ऑक्टोबर, १९०५ ५. लॉर्ड हार्डिंग्ज

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. १९०५ ते १९२० २. १८९२ चा कौन्सिल कायदा (Council Act 1892)

३. ट्रिब्यून ४. लॉर्ड कर्झन ५. १९११

### स्वयंअध्ययन प्रश्न २

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. लोकहितवादी २. दिनशॉ वाच्छा ३. सार्वजनिक काका

४. आचार्य प्रफुल्लचंद्र रे ५. १९०७

### स्वयंअध्ययन प्रश्न ३

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. आयर्लंड २. ॲनी बेझंट ३. जोसेफ बॅप्टिस्टा

४. ॲनी बेझंट ५. महात्मा गांधी

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. न्यूयॉर्क आणि सॅन फ्रॅन्सिस्को  २. ॲनी बेझंट

३. सर सुब्रह्मण्यम अय्यर  ४. अमेरिकेत  ५. होमरूल चळवळीला

## २.६ सारांश

१९०५ ते १९२० हा भारताच्या इतिहासातील जहालवादी कालखंड म्हणून ओळखला जातो. राष्ट्रसभेचा मवाळवादी कालखंडातून जहालवादी कालखंडात झालेला प्रवेश नव्या राजकारणाला जन्म देणारा ठरला. राष्ट्रसभा कृतिशील बनली. ब्रिटिशांना भारताच्या शक्तीची जाणीव करून देण्याचे कार्य यामुळे झाले. स्वतःच्या हक्कासाठी संघर्ष केला पाहिजा हा मूलमंत्र टिळकांनी जनतेला दिला. ब्रिटिशांच्या अन्याय धोरणांना जहालवादी नेत्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून विरोध केला. ब्रिटिशांकडून दडपशाहीही मोठ्या प्रमाणावर झाली. मात्र विरोध वाढतच गेला. भारतातले पहिले जन-आंदोलन म्हणून वंगभंग आंदोलनाचे नाव घ्यावे लागते. या आंदोलनामुळे बंगालमधील सामान्य स्त्री-पुरुष ब्रिटिशांविरोधात एकवटले. अखेरीस १९११ मध्ये ब्रिटिशांना ही फाळणी रद्द करावी लागली. जन आंदोलनाच्या शक्तीची जाणीव यातून झाली. स्वराज्य-स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण चतुःसूत्रीच्या माध्यमातून ब्रिटिशांच्या आर्थिक साम्राज्यवादाला धक्का दिला गेला. राष्ट्रीय स्तरावरची भारतातील पहिली चळवळ म्हणजे होमरूल चळवळ. तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर इकडे आकृष्ट झाला. या आंदोलनामुळे स्वराज्य-स्वतःचे राज्य, स्वशासन या संकल्पना भारतीयांपर्यंत पोहोचल्या. या चळवळीनंतर मवाळांच्या अर्ज-विनंत्यांच्या मार्गांचा कायमचा त्याग केला गेला. भारतीय स्वराज्याचा प्रश्न युरोप-अमेरिकेपर्यंत पोहोचला. ब्रिटिशांवरचे दडपण ज्यामुळे वाढले. त्यांना भारताला १९१९ च्या कायद्यान्वये सुधारणा द्याव्या लागल्या. जहालवादी कालखंडात झालेल्या या विविध चळवळींमुळे निर्माण झालेली ऊर्जा राष्ट्रवादास पोषक ठरली. १९२० नंतर सुरू झालेल्या गांधीयुगाचा मार्ग प्रशस्त झाला. या चळवळीतील तत्त्वांचा वापर महात्मा गांधींनीही केला. त्यानंतर वेगाने स्वातंत्र्याच्या दिशेने आपली वाटचाल सुरू झाली.

## २.७ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) विस्तृत उत्तरे लिहा.**

१. जहालवादाच्या उदयाची विविध कारणे स्पष्ट करा.

२. बंगालच्या फाळणीचा घटनाक्रम स्पष्ट करा.

३. वंगभंग आंदोलनाचे वर्णन करून त्याचे परिणाम स्पष्ट करा.

४. लोकमान्य टिळकांची चतुःसूत्री स्पष्ट करून स्वदेशी चळवळीची माहिती द्या.

५. होमरूल चळवळीचे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील योगदान स्पष्ट करा.

**(ब) टीपा लिहा.**

१. जहालवादी विचारसरणी

२. लॉर्ड कर्झन व बंगालची फाळणी

३. होमरूल चळवळीचे परिणाम

४. डॉ. ॲनी बेझंट

५. लोकमान्य टिळक आणि स्वदेशी

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. कोठेकर शांता, वैद्य सुमन, आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०००.

२. पवार जयसिंगराव, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास, निराली प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, २००१.

३. ग्रोव्हर बी. एल., आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी, नवी दिल्ली, २००३.

४. आचार्य धनंजय, आधुनिक भारत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११.

५. सरदेसाई बी. एन., आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००४.

६. गाठाळ एस. एच., आधुनिक भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०००.

## घटक – ३

# महात्मा गांधींच्या चळवळीचे युग

## (Age of Gandhian Movements)

३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ विषय विवेचन
    ३.२.१ हिंद-स्वराज्य – गांधीजींचा दृष्टीकोन
    ३.२.२ खिलाफत आणि असहकार चळवळ
    ३.२.३ सविनय कायदेभंगाची चळवळ
    ४.२.४ चलेजाव चळवळ
३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
३.४ स्वयं अध्ययन प्रश्न
३.५ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे
३.६ सारांश
३.७ सरावासाठी स्वाध्याय
३.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

### ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

- महात्मा गांधींचा हिन्द-स्वराज्याचा अर्थ, दृष्टीकोन व संकल्पना स्पष्ट होईल.
- म. गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य लढ्यास लोकलढ्याचे स्वरूप कसे प्राप्त झाले याची माहिती होईल.

- म. गांधींच्या तीन मोठ्या चळवळींची पार्श्वभूमी, स्वरूप, परिणाम याची जाणीव होईल.
- महात्मा गांधींच्या हिंद-स्वराज्याचा परिचय होईल, शिवाय असहकार, सविनय कायदेभग, चलेजाव, या चळवळींचा परिचय होईल.

## ३.१ प्रस्तावना

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी टॉलस्टॉय, थोरो, रस्किन, प्लेटो आदी विचारवंतांच्या ग्रंथांचा परामर्श घेऊन, सखोल चिंतन केले व १९०८ साली 'हिंद-स्वराज्य' ही पुस्तिका लिहिली. जागतिक साम्राज्यवादाला व हिंसावादी संप्रदायाला व त्याच विचारांच्या दक्षिण आफ्रिकेतील वर्गाला उत्तर म्हणून महात्मा गांधींजीनी या पुस्तकाची निर्मिती केली. या पुस्तकातील 'हिंद-स्वराज्य' संकल्पनेनुसार ब्रिटिशांपासून केवळ भारताला स्वातंत्र्य मिळविणे हा हेतू नसून इंग्रजी संस्कृतीपासून हिंदी संस्कृती वाचविणे, आधुनिक सभ्यतेचा त्याग करणे, द्वेषाऐवजी प्रेमाची शिकवण देणे, पाशवी बळाचा अहिंसक पद्धतीने सामना करण्यासाठी 'आत्मबळ' उभे करणे आणि भारतीय लोकांच्या इच्छेनुसार संसदीय स्वराज्याची स्थापना करणे हा आहे. आधुनिक सभ्यतेचा त्याग करून अहिंसात्मक प्रतिसभ्यता निर्माण करण्यासाठी त्याचे स्वरूप मार्ग ठरविण्याचा गांधीजींचा हा कृतिशील प्रयोगात्मक मार्ग आहे.

पहिल्या महायुद्धानंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात एक नवे पर्व सुरू झाले. भारतीय राजकारणातील टिळक युगाचा अस्त होऊन गांधी युगाचा उदय झाला. महात्मा गांधीजीनी कमीत कमी धोक्याचा पण जास्तीत जास्तम लोकांना सहभागी होता येईल असा अहिंसात्मक, शांततामय सत्याग्रहाचा मार्ग जनतेला दाखविला. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सामान्य जनता मोठ्या प्रमाणात सहभागी झाली. भारतीय राजकारणात गांधीजींनी विधायक कार्यक्रमाची जोड दिली.

भारतीय स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधीजीनी एकूण तीन चळवळी उभारल्या. १९२० ते २२ या काळात असहकाराची चळवळ सुरू करून व त्याचवेळी खिलाफत चळवळीला पाठिंबा देऊन हिंदू-मुस्लीम ऐक्य घडवून आणले. तथापी, अहिंसक आणि शांततेच्या मार्गाने चाललेली ही चळवळ मोडून काढण्यासाठी सरकारने दडपशाहीचा वापर केला. त्यामुळे चळवळ स्थगीत करावी वागली.

१९३० साली सविनय कायदेभंगाची चळवळ उभारून गांधीजीनी भारतीय स्वातंत्र्याची चळवळ अधिक तीव्र केली. सरकारचे जुलमी कायदे मोडून ब्रिटिश राजवट नष्ट करणे हा उद्देश होता. त्याचे विवेचन संबंधीत घटकात घेतले आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १९४२ मध्ये गांधीजीनी 'चले जाव' (छोडो भारत) चळवळीचा नारा दिला आणि एका अभूतपूर्वक क्रांतिकारी चळवळीला सुरुवात केली. त्याची पार्श्वभूमी, कारणे, वाटचाल, यशापयश इ. विवेचन त्या घटकात घेतले आहे.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ हिंद स्वराज्य - गांधीजींचा दृष्टीकोन

**(अ) प्रस्तावना**

राष्ट्रपिता महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून ट्रान्सवाल शिष्टमंडळासोबत इंग्लंडला गेले असता तेथील अनेक भारतीय व इंग्रज लोकांशी भेटून स्वराज्य, भारतीय स्वातंत्र्य आणि संस्कृती (सभ्यता) या विषयावर विचार-विनिमय केला. थोरो, टॉलस्टॉय, रस्किन व प्लेटो आदी विचारवंतांच्या ग्रंथांचा परामर्श घेऊन सखोल चिंतन केले. इ.स. १९०८ साली इंग्लंडमधून दक्षिण आफ्रिकेत परतताना बोटीत गुजराथी भाषेत नायक-संपादक संवाद स्वरूपात 'हिंद-स्वराज्य' ही पुस्तिका लिहिली. दक्षिण आफ्रिकेतील 'इंडियन ओपिनियन' या साप्ताहिकात लेखमाला स्वरूपात ती प्रसिद्ध केली. भारतातील हिंसावादी संप्रदायाला ब्रिटिश साम्राज्यवादाला व त्याच विचारांच्या दक्षिण आफ्रिकेतील वर्गाला उत्तर म्हणून या पुस्तकाची निर्मिती गांधीजींनी केली आहे.

हिंद स्वराज्य या पुस्तकामध्ये २० प्रकरणांचा समावेश असून सॉक्रेटिस मेथडचा अवलंब करून वाचक-संपादक यांच्यातला दीर्घ संवाद गांधीजीनी साधून हिंद-स्वराज्याचा अर्थ काय असावा याचे चित्र अतिशय साध्या, सरळ, ओघवत्या भाषेत केले आहे. त्यातील हिंद-स्वराज्याचा त्यांचा दृष्टिकोन, अर्थ, स्वरूप व संकल्पना समजावून घेऊ.

**(ब) हिंद-स्वराज्य गांधीजींचा दृष्टीकोन**

हिंद-स्वराज्य या पुस्तकाचा हेतू केवळ इंग्रजांपासून भारताला स्वातंत्र्य मिळविणे हा नसून इंग्रजी संस्कृतीपासून, पाश्चात्य संस्कृतीपासून हिंदी संस्कृती वाचविणे, आधुनिक सभ्यतेचा त्याग करणे, द्वेषाऐवजी प्रेमाची शिकवण देणे, पाशवी बळाचा अहिंसक पद्धतीने सामना करण्यासाठी 'आत्मबळ' उभे करणे आणि भारतातील लोकांच्या इच्छेनुसार संसदीय स्वराज्याची स्थापना करणे हा आहे. हिंद-स्वराज्य संकल्पनेत जरी हिंद हा शब्द आला असला तरी ती धर्म-प्रदेश वाचक बंदिस्त संकल्पना नसून स्वतःवर स्वतः राज्य करणे, राज्यसंस्थेची अशावेळी गरज नसणे असा दर्शवितो. आखिल मानव जातीचे विश्वकल्याण साधणारा हा रचनात्मक कार्यक्रम आहे. गांधी विचारांचा हा जाहीरनामाच आहे. आधुनिक सभ्यतेचा तीव्र धिक्कार करून प्रतिसृष्टी निर्माण करण्यासाठी त्याचे स्वरूप, मार्ग व पद्धती ठरविण्याचा गांधीजींचा हा कृतिशील प्रयोगात्मक मार्ग आहे. आधुनिक इंग्रजी व पाश्चात्य भोगवादी, हिंसक व विनाशकारी सभ्यतेला ते कडाडून विरोध करतात.

**(क) हिंद स्वराज्य म्हणजे काय ?**

हिंद स्वराज्य या पुस्तकाच्या शेवटच्या 'सुटका' या प्रकरणात गांधीजीनी स्वराज्य म्हणजे काय ? ते खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

''स्वराज्य म्हणजे स्वतःवरचे राज्य. त्याची किल्ली सत्याग्रह, आत्मबळ किंवा दयाबळ हे आहे. ते बळ वापरण्याकरिता सवार्थाने स्वदेशी व्रताचे पालन करण्याची जरूरी असते.''

म. गांधीजींना जे स्वराज्य अपेक्षित होते ते निव्वळ राजकीय स्वरूपाचे न्हवते तर ते आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक स्वरूपाचेही अपेक्षित होते. ते स्पष्ट करतात ''आपल्याला इंग्रजी राज्य पाहिजे, पण इंग्रज नकोत. तुम्हाला वाघाचा स्वभाव पाहिजे पण वाघ नको. म्हणजे तुम्ही हिंदुस्थानाला इंग्रजी बनवून इच्छिता. पण जेव्हा हिंदुस्थान इंग्रजी होईल तेव्हा त्याला हिंदुस्थान म्हटले जाणार नाही तर 'इंग्लिशस्थान' म्हटले जाईल.'' गांधीजींना असले स्वराज्य नको होते. गोऱ्या इंग्रजांची जुलूम किंवा दडपशाही जाऊन काळ्या भारतीयांची जुलूम, दडपशाही यावी हे अपेक्षित नाही. स्वराज्य संकल्पना त्याच्याही पलिकडे आहे.

''इंग्रजांशी माझे वैर नाही, त्यांच्या सभ्यतेशी आहे'' असे ते म्हणतात. हिंद-स्वराज्य म्हणजे केवळ हिंदू धर्मियांचे राज्य नाही तर प्रादेशिक एत्तदेशीय अर्थाने स्वकीयांचे सुराज्य होय. याचे पुढील काळात विवेचन करताना म. गांधीजी म्हणतात, ''जे जे कोणी येथे जन्मले आणि वाढले आणि त्यांची दृष्टी दुसऱ्या कोणत्याही देशाकडे नाही, अशा सर्व लोकांचा हा भारत देश आहे. म्हणून ते जितका हिंदूंचा तितकाच पारश्यांचा आहे, इस्रायलींचा आहे, हिंदी ख्रिश्चनांचा आहे, मुसलमानांचा आहे आणि अन्य सर्व अहिंदूंचा आहे. स्वतंत्र भारताचे राज्य हे 'हिंदू राज्य' होणार नाही तर ते भारतीय राज्य होईल. ते कोण्या एका धर्मपंथाचे किंवा जाती-जमातीच्या बहुमताचे असणार नाही तर कोणताही धर्मभेद न मानता अखिल भारतीय नागरिकांच्या प्रतिनिधींचे ते राज्य असेल.'' धर्म ही प्रत्येकाची खाजगी बाब असून शासनाला स्वतःला धर्म असू नये. शासनाने धार्मिक बाबतीत तटस्थ राहणेच समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे असे विचार गांधीजीनी वेळावेळी प्रकट केले आहेत.

म. गांधी म्हणतात, ''आपल्यावर आपले राज्य चालवणे म्हणजे स्वराज्य होय. आणि ते आपल्या हातात आहे. प्रत्येकाने हे स्वराज्य चालवावयाचे आहे. बुडणारा दुसऱ्याला वाचविणार नाही, तारणारा वाचवील. आपण स्वतः गुलाम असू आणि दुसऱ्यांना सोडविण्याच्या गप्पा मारू तर ते घडण्यासारखे नाही''.

### (ड) स्वराज्य-गांधीजींची आदर्श राज्यपद्धती

दक्षिण आफ्रिकेतील लढ्यामध्ये म. गांधींच्या धर्म, संस्कृती व राज्यविषयक कल्पना दृढ होत होत्या. भगवद्गीता, रामायण, बौद्ध वाङ्मय, जैन वाङ्मय, बायमलमधील येशू ख्रिस्ताची वचने, रस्किन यांचे Unto this last हे पुस्तक, थोरोचा Duty of Civil Disobedience हा निबंध, टॉलस्टॉयचा The Kingdom of God is within you व What to do हा ग्रंथ तसेच लाओत्से व कन्फ्युशियस या विचारवंतांची छाप गांधीजींच्यावर पडलेली होती. हिंद स्वराज्य, अराज्यवाद, सत्य, अहिंसा, सविनय कायदेभंग, धार्मिक मानवतावाद, राजकारणातील आध्यात्मवाद, असहकार, उपोषण, ग्रामराज्य, नैतिक व आध्यात्मिक विचार इ. संकल्पना वरील प्रभावातून व आत्मचिंतनातून आलेल्या आहेत. इंग्रज मित्र व भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील नेते - क्रांतिकारकांच्या चर्चेतून गांधीजींच्या विचारांना दिशा मिळत गेल्या.

लॉर्ड कर्झनच्या बंगाल फाळणीनंतर भारतीय असंतोषात भर पडली. युरोपियनांचा आक्रमक साम्राज्यवाद, भोगवादी संस्कृती, उपयुक्ततावाद, सिग्मंड फ्राईडच्या वासना सिद्धांताचा युरोपियन समाजावरील प्रभाव, औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेली गुलामगिरी, युरोपियन संस्कृत्यांचा झालेला ऱ्हास अशा पार्श्वभूमीवर गांधीजींची हिंद स्वराज्यविषयक संकल्पना साकारली.

स्वदेशी, स्वराज्य (ग्रामराज्य) आत्मानुशासन आणि स्वदेशी याखेरीज अहिंसक समाजाची निर्मिती असंभव आहे याची पक्की खात्री म. गांधीजींना झाली होती. भारताला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्य हवे असेल तर हिंसेशिवाय पर्याय नाही अशा प्रकारचा 'इंडियन स्कूल ऑफ व्हायोलन्स' विचारप्रवाह भारतामध्ये व इंग्लंडमध्ये जोरदार वाहत होता. इटालियन क्रांतिकारक गॅरिबाल्डीचा भारतीय सशस्त्र क्रांतिकारकांच्यावर मोठा प्रभाव होता. त्यातून ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खून पडत होते.

अशा परिस्थितीत म. गांधीजींनी या स्कूलचे खंडन करण्यासाठी हिंद स्वराज्याची व्यापक संस्कृती बदलाची संकल्पना भारताला दिली. त्यांना इंग्रजांपासून देशाला स्वातंत्र्य नको होते तर इंग्रजी संस्कृतीपासून स्वातंत्र्य हवे होते.

### (इ) भारतीय राजकीय परिस्थितीचे वर्णन

हिंद स्वराज्य या पुस्तकाच्या प्रकरण १ ते ३ मध्ये गांधीजींनी भारतातील तत्कालिन राजकीय परिस्थितीचे अत्यंत चिकित्सक पद्धतीने वर्णन केले आहे. काँग्रेस आणि तिचे पुढारी, बंगालची फाळणी, अस्वस्थता आणि असंतोष या तीन प्रकरणातून जहाल गट, मवाळ गट, काँग्रेसचे पुढारी, बंगालच्या फाळणीमुळे निर्माण झालेला असंतोष याचे वर्णन प्रश्न-उत्तर स्वरूपात केले आहे. दादाभाई नौरोजी आणि गोपाळकृष्ण गोखले यांच्या संदर्भात आपले मतभेद असू शकतात मात्र त्याची देशभक्ती आणि समर्पण वृत्ती नाकारू शकत नाही असे ते म्हणतात. काँग्रेस पक्ष अधिकाधिक सक्षम व झुंजार व्हायल हवा. देशातील जनतेत स्वातंत्र्याकांक्षा आणि राष्ट्रप्रेम निर्माण करण्याच्या कामी काँग्रेसचे योगदान मोठे आहे याची आवर्जून नोंद घेतली आहे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही निखळ राजकीय चळवळ नसून ती मुळात एक नैतिक चळवळ आहे अशी गांधीजींची भूमिका आहे. प्रदीर्घ काळाची आत्मग्लानी संपून आत्मबोधाच्या दिशेने चाललेली वाटचाल आहे. या समाजाला आत्मज्ञानापासून कुणी वंचित ठेवू शकणार नाही अशा प्रकारचे आध्यात्मिक अधिष्ठान त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याला दिले. बंगालच्या फाळणीनंतर भारतीय समाज आत्मबोधाच्या उंबरठ्यावर उभा आहे. इंग्रजांचा भारतावरील अंमल हे एक सांस्कृतिक आक्रमण आहे असे त्यांचे मत होते.

### (ई) विकृत पाश्चात्य संस्कृती

विकृत आणि आत्मविनाशी सभ्यतेचे प्रतिनिधित्व इंग्लंडसारखा देश करतो. भारताचे स्वातंत्र्य कशामुळे गमावले या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणतात, ''हिंदुस्थान हे इंग्रजांनी घेतले नाही आपण ते त्यांना दिले. हिंदुस्थानात ते स्वतःच्या बळावर टिकलेले नाहीत, आपण त्याना ठेवून घेतले आहे''. भारताने आपले स्वातंत्र्य गमावले ते भारतीयांच्या स्वाभिमान्यशून्य, लाचार आणि करंटेपणाच्या मनोवृत्तीमुळे गमावले. गांधीजी पुढे म्हणतात भारतातील उदयोन्मुख व्यापारी वर्ग, उद्योजक, डॉक्टर, वकील तसेच खोऱ्याने पैसा मिळविणाऱ्या सुशिक्षित मध्यम वर्ग यांची मानसिकता, भूमिका आणि व्यवहार इंग्रजांनी सत्ता बळकट करणाराच होता. गांधीजींच्या या विचारातच स्वदेशी, असहकार, स्वराज्याची बिजे दडलेली आहेत. जे राज्य भारतीयांच्या सहकार्यावर उभे आहे ते सहकार्य बंद होताच ते राज्य कोसळणार हे गांधीजींनी पुरते ओळखूनच पुढील काळात असहकार, सविनय कायदेभंग आंदोलन केले.

आधुनिक सभ्यतेचे आकर्षण असणारा उच्चभ्रू व मध्यम वर्ग स्वातंत्र्याची खरी लढाई पुरुषार्थाने लढूच शकणार नाहीत कारण त्यांच्यात तेजच नाही. तेव्हा आधुनिक सभ्यतेपासून दूर असलेला खेड्यापाड्यातील अस्सल, खराखुरा, खेडूत, शेतकरी वर्गच स्वातंत्र्याची लढाई लढेल हे जाणून गांधीजींनी या वर्गाला सामावून घेण्यासाठी खेड्याकडे चला असा ग्रामराज्याचा कृती कार्यक्रम भारताला दिला. तेव्हाच भारताचे स्वातंत्र्य दृष्टीपथात आले.

हिंद स्वराज्यामध्ये धर्माधिष्ठित वा सांप्रदायिक राष्ट्रवाद गांधीजीनी कटाक्षाने आणि कठोरपणे नाकारला आहे. एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेसाठी धर्मही एकच असला पाहिजे हे त्यांना मान्य नाही. धर्म ही व्यक्तिधिष्ठित बाब असल्याने जितक्या व्यक्ती तितके धर्म होय. 'राष्ट्र' हे मुळातच एक काल्पनिक समूहजीवन आहे आणि एकत्र राहण्याचा सामुहिक संकल्प हाच राष्ट्रीयत्वाचा खास आहे. हिंदू-मुस्लिमांमधील खरी समस्या परस्परावरील विश्वासाच्या अभासाची आहे हा विश्वास निर्माण झाला तर कोणतीही बाह्य शक्ती त्यांच्यात फूट पाडून त्यांचा लाभ उठवू शकणार नाही.

'गाय' या प्राणी प्रश्नाकडे गांधीजी धार्मिक दृष्टीकोनातून न पाहता भारताच्या शेतीप्रधान संस्कृतीचा कणा 'गाय' मानतात. हिंदू-मुस्लीम परस्पर समजूतदार सहकार्यानेच गाय वाचू शकेल. गायीसाठी कोणत्याही परिस्थितीत माणूस मारला जाता कामा नये अशी त्यांची भूमिका होती.

संस्कृती ऱ्हासाचे कारण समाज मुळातच हिंसेवर उभे असतो हा सिद्धांत गांधीजी प्रतिपादन करतात. त्यामुळेच ग्रीस, रोम, इजिप्तची धूळदाण झाली असे ते मानतात. आधुनिक सभ्यतेला गांधीजीनी 'क्युरेबल डिसीज - चांडाळीण सभ्यता' असे म्हटले आहे. भारतातील खेडी या सभ्यतेला अजून बळी पडलेली नाहीत असे त्यांचे मत होते. खऱ्या स्वराज्याचा उपभोग खेड्यातील लोक घेत असतात म्हणून गांधीजीनी ग्रामराज्याची कल्पना भारताला दिली.

शेवटी सभ्यता म्हणजे काय याचे उत्तर देताना गांधीजी म्हणतात, ''सभ्यता म्हणजे मनुष्याला कर्तव्याचा मार्ग दाखविणारी वागणुकीची पद्धती. कर्तव्य बजावणे म्हणजे नितीचे पालन करणे. नितीचे पालन म्हणजे आपल्या मनइंद्रियांना ताब्यात ठेवणे असे केल्याने आपण स्वतःला ओळखतो हीच सभ्यता किंवा सुधारणा, त्याविरुद्ध ती कुधारणा !'' भारताची सुटका इंग्रजांच्या येथे राहण्यावर अथवा येथून जाण्यावर अवलंबून नाही तर इंग्रजांच्या सभ्यतेचा इन्कारातच आपली सुटका आहे असे त्यांचे मत होते. ते म्हणतात जगाची रचना शस्त्रबळावर आधारलेली नसून सत्य, दया किंवा आत्मबळ यावर ती अधिष्ठित आहे... याचा अर्थ लढाईच्या बळापेक्षा दुसरे बळ (प्रेमभावना) हा जगाचा आधार आहे.

विरतेची नवी परिभाषा गांधीजींनी जगाला दिली. अनन्वीत छळ व पराकोटीच्या शारीरिक यातना भोगाव्या लागत असतानाही शांत, अक्षुब्ध आणि वैरमुक्त अशा चित्ताने आपल्या ईश्वर निष्ठेपासून तसूभरही विचलित न होणारा खरा वीर असतो. इतरांचे प्राण घेतो, आक्रमक असतो, धाडसी असतो, मांसाहार करतो तो वीरपुरुष नव्हे. प्राण घेण्याच्या नव्हे तर प्राणत्यागाची सिद्धता हे वीरतेचे प्राणतत्व आहे. शस्त्रसज्जता व वीरवृत्ती या भिन्न-भिन्न गोष्टी आहेत.

हिंद स्वराज्याच्या १८ व्या प्रकरणात गांधीजींनी शिक्षणाविषयीही प्रगल्भ चिकित्सक विचार मांडले आहेत. ''करोडो माणसांना इंग्रजी शिक्षण द्यायचे म्हणजे त्यांना गुलामगिरीत टाकण्यासारखे आहे. मेकॉलेने ज्या शिक्षणाचा पाया घातला तो खरे म्हणजे गुलामगिरीचा पाया होता.... इंग्रजी शिक्षणाने दंभ, द्वेष, जुलूम इ. वाढले. इंग्रजी शिकलेल्यांनी लोकांना फसवण्यात, त्रास देण्यात काही कसर ठेवली नाही. सभ्यतेच्या रोगाने आपण इतके ग्रासलेले आहोत की, इंग्रजी शिक्षण घेतल्यावाचून आपले चालेल असे आपल्याला वाटतच नाही. इंग्रजी शिक्षणाने समाजातील शिक्षित वर्गात द्वेष आणि दंभ पसरविण्याचे काम केले असे गांधीजींचे मत आजच्या काळात तंतोतंत लागू पडते. शिक्षणाने अक्षरज्ञान आले, परंतु सूज्ञपणा व अहिंसक सभ्यता निर्माण झाली नाही याकडे गांधीजींचा रोख होता. शिक्षणाने मनुष्यत्व आले पाहिजे, नसेल तर ते शिक्षण निरुपयोगी म्हटले पाहिजे असे त्यांचे मत होते.

स्वराज्य मिळविण्यासाठी कोणत्या कृती योजना करता येतील (आत्मबळ) याची यादीच त्यांनी हिंद स्वराज्य पुस्तकाच्या शेवटी दिली आहे. शेवटी महात्मा गांधीजी म्हणतात.

''इंग्रजांशी माझे वैर नाही, त्यांच्या सभ्यतेशी आहे.... स्वराज्य मिळविण्यासाठी माझे जीवन समर्पित आहे अशी माझ्या अंतरात्म्याची साक्ष आहे.''

**(ड) मूल्यमापन**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची हिंद-स्वराज्य संकल्पना ही एक आदर्श राज्यपद्धती आहे. अहिंसा, सत्यप्रिय, नितिमान, आत्मसंयमन, स्वनियंत्रित अशा समाजाची रचना त्यानी कल्पिली आहे. पाश्चात्य चांडाळ व भोगवादी संस्कृतीला नाकारून ग्रामीण खेडीप्रधान भारतीय संस्कृती त्यांनी केंद्रस्थानी ठेवली आहे. प्रतिष्ठापूर्ण व शांततामय सहजीवन त्याना अपेक्षित आहे. अहिंसात्मक सभ्यतेकडे पाहण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे गतकालीन ग्रामीण गणराज्यांचाच आहे. म्हणून मूठभर शहरांपेक्षा सात लाख खेड्यांचे 'ग्रामराज्य' त्यांना आदर्शवत होते. भारताच्या राजकीय स्वातंत्र्याबरोबरच आत्यंतिक महत्त्व ते भारताच्या प्राचीन सभ्यतेला देतात. भारतावरील ब्रिटिशांच्या आक्रमणाला ते सांस्कृतिक आक्रमण म्हणून पाहतात. 'हिंद-स्वराज्य' म्हणजे गांधीजींच्या मनामध्ये ज्वालामुखीप्रमाण वर्षानुवर्षे असलेली खदखद होती.

### स्वयं अध्ययन प्रश्न १

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. हिंद स्वराज्य ही पुस्तिका ............. साली म. गांधीजींनी लिहिली.

(अ) १९०८ (ब) १९०९ (क) १९१५ (ड) १८९३

२. हिंद स्वराज्य पुस्तिकेत ............. हे प्रकरण शेवटचे आहे.

(अ) बंदी (ब) सुटका (क) सभ्यता (ड) स्वराज्य

३. Unto this last हे पुस्तक ............. यांचे आहे.

(अ) म. गांधी (ब) लो. टिळक (क) रस्किन (ड) थोरो

४. म. गांधीजींनी ............ या प्राण्याकडे धार्मिक दृष्टीकोनातून पाहत नाहीत.

(अ) बैल (ब) म्हैस (क) घोडा (ड) गाय

५. मूठभर शहरांपेक्षा सात लाख खेड्यांचे ............ गांधीजींना आदर्शवत होते.

(अ) ग्रामराज्य (ब) सुराज्य (क) स्वराज्य (ड) प्रजाराज

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. महात्मा गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत कोणत्या साप्ताहिकात लेखमाला प्रसिद्ध केली ?

२. म. गांधींनुसार स्वराज्य म्हणजे काय ?

३. ''इंग्रजांशी माझे वैर नाही त्यांच्या सभ्यतेशी आहे असे कोणी म्हटले आहे ?''

४. बंगालची फाळणी कोणत्या गव्हर्नर जनरलने केली ?

५. विरतेची नवी परिभाषा जगास कोणी दिली ?

## ३.२.२ खिलाफत आणि असहकार चळवळ

### (अ) प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या तिसऱ्या पर्यायाने अंतीम पर्वाला १९१९ मध्ये खिलाफत आणि असहकार चळवळीने सुरुवात झाली. ही लोकप्रिय जनआंदोलनाच्या युगाची सुरुवात होती. कदाचित जगाच्या इतिहासातील सर्वात मोठ्या जन आंदोलनाची ही सुरुवात होती. जिने शेवटी भारतीय राष्ट्रीय आंदोलनास यश मिळवून दिले.

पहिल्या महायुद्धाच्या काळात भारतात नवीन राजकीय ध्रुवीकरणाला सुरुवात झाली होती. राष्ट्रवादाला जोर चढला होता. युद्धोत्तर मोठ्या राजकीय लाभाकडे राष्ट्रवाद्यांचे लक्ष लागून राहिले होते. तथापि, युद्धोत्तर भाववाढ व आर्थिक महामंदीने भारतीय अर्थव्यवस्था कोलमडून गेली. देशी उद्योगधंदे बंद पडू लागले. परदेशी भांडवल वाढू लागले. बेरोजगारी, भाववाढीमुळे कामगार, कारागीर भारतीय राष्ट्रवादाकडे आकृष्ट होऊ लागले.

अशा साऱ्या पार्श्वभूमीवर भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या राजकीय क्षितीजावर महात्मा गांधींचा उदय झाला आणि गांधी युगाला - एका नव्या पर्वाला सुरुवात झाली. महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळीस जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त होऊ लागले. संभाव्य चळवळीस व्यापक स्वरूप देण्यासाठी महात्मा गांधीजीनी अलिबंधूच्या खिलाफत चळवळीसही पाठिंबा दिला. खिलाफत आणि असहकार या दोन्ही चळवळींनी ब्रिटिशांना विरोध करण्यासाठी एकच समान कार्यक्रम उपयोगात आणला तो म्हणजे असहकार. या दोन्ही चळवळींमुळे हिंदू-मुस्लीम ऐक्य बळकट होण्यासही मदत झाली.

## (ब) कारणे

### १. रौलेट कायदे (१९१९)

पहिल्या महायुद्धाच्या काळात भारतातील क्रांती कार्याला आळा घालण्यासाठी ब्रिटिश सरकारने 'भारत सुरक्षा कायदा' (Defence of India Act) संमत केला. महायुद्ध समाप्तीबरोबरच हा कायदा संपुष्टात येहणार होता. मात्र भारतातील क्रांतिकारकांच्या कारवाया तसेच राष्ट्रीय आंदोलन दडपून टाकण्यासाठी भारत सुरक्षा कायद्याची मुदत वाढविण्यासाठी किंवा अशा प्रकारचा नवा कायदा निर्माण करण्यासाठी सरकारने मि. सिडने रौलट या न्यायाधिशाच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. त्या समितीच्या अहवालानुसार सरकारने दोन कायदे पास केले. त्यांना रौलट कायदे म्हणतात. या कायद्यानुसार राजद्रोहाविरुद्ध खटला चालविण्यासाठी तीन न्यायाधिशांचे एक न्यायपीठ स्थापन करणेत येणार होते. कोणत्याही व्यक्तीला केवळ संशयावरून अटक करण्याचा अधिकार, गुन्हेगाराला अपील करता येणार नव्हते. कोणत्याही स्थानांची सरकार झडती घेऊ शकत होते. या कायद्याने भारतीयांचे व्यक्तिस्वातंत्र्य संपुष्टात येणार होते. त्यामुळे देशभर सर्वत्र या कायद्यास विरोध होऊ लागला. सर्वत्र या कायद्यांचा निषेध होऊ लागला. भारतीयांच्या व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या या कायद्यास सत्याग्रहाच्या मार्गाने विरोध करण्याचे आवाहन महात्मा गांधीजीनी केले.

### २. जालियनवाला बाग हत्याकांड

रौलट कायद्याविरुद्ध देशभर असंतोष निर्माण झाला. पंजाबात या कायद्याविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण झाला. सरकारने तेथील असंतोष दडपून टाकण्यासाठी पंजाबचे नेते डॉ. किचलू व डॉ. सत्यपाल यांना अटक केली होती. त्यांच्या सुटकेसाठी काढलेल्या मोर्चावर सरकारने गोळीबार केला. त्यात दहा लोक मृत्यूमुखी पडले. परिणामी पंजाबमधील असंतोष अधिक तीव्र होऊन अनेक सरकारी कार्यालयाना आगी लावण्यात आल्या. फोनच्या तारा तोडल्या. अनेक इंग्रजांना ठार केले. त्यामुळे सरकारने अमृतसरमध्ये लष्करी कायदा पुकारून मोर्चे, सभांना बंदी घातली. सरकारच्या या जुलमी कृत्याचा निषेध करण्यासाठी बैसाखीच्या सणादिवशी दि. १३ एप्रिल, १९१९ रोजी अमृतसर येथे जालियनवाला बाग येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. चारी बाजूनी बंदिस्त असलेल्या व केवळ एकच प्रवेशद्वार असलेल्या या बागेत जवळपास ९ ते १० हजार लोक जमा झाले होते. बंदी आदेश मोडून जाहीर सभा घेतल्यामुळे ब्रिटिश लष्करी अधिकारी जनरल डायरने एकमेव असलेले प्रवेशद्वार रोखून जालियनवाला बागेतील शांततेत चाललेल्या सभेवर कोणतीही पूर्वसूचना न देता आपल्या लष्काराला तुफान गोळीबार करण्याचा आदेश दिला. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. लष्कराने केलेल्या गोळीबारात जवळपास एक हजारहून अधिक लोक ठार झाले. बाराशे पेक्षा अधिक लोक जखमी झाले. निरपराध लोकांवर केलेल्या या गोळीबारामुळे जमाव संतप्त झाला व त्याने दंगल, जाळपोळ व लुटालुटीला सुरुवात केली. जालियनवाला हत्याकांडाविरुद्ध सर्व देशभर प्रतिक्रिया उमटल्या. या घटनेने सबंध भारत हादरून गेला. या अमानुष कृत्याविरुद्ध महात्मा गांधीजींनी आपली शक्ती पणाला लावण्याचे ठरविले.

### ३. हंटर कमिशन

जालियनवाला बाग हत्याकांडाच्या चौकशीची मागणी काँग्रेसने व जनतेने केली. यासंबंधी सरकारचे दुर्लक्ष दिसून येताच रविंद्रनाथ टागोर यांनी सरकारने दिलेल्या 'सर' या पदवीचा त्याग केला. परिणामी जनतेच्या वाढत्या दबावामुळे सरकारने जालियनवाला हत्याकांडाच्या चौकशीसाठी लॉर्ड हंटर कमिशनची स्थापना केली. हंटर कमिशन झालेल्या अन्यायाची दाद घेईल व अपराध्यांना शिक्षा होईल अशी जनतेची अपेक्षा होती. पण झाले उलटेच. हंटर कमिशनने पंजाबाबतीत घटनांबाबत सारवासारव करून पंजाब ले. गव्हर्नर ओडवायर, जनरल डायर आणि सरकार आदींना निर्दोष ठरवण्यात आले. जनरल डायरला फक्त कामावरून दूर करण्यात आले. हंटर कमिशनच्या अहवालाचा सर्व देशभर निषेध करण्यात आला. महात्मा गांधीजींना ब्रिटिश सरकारचे खरे स्वरूप समजून चुकले. ब्रिटिश सरकारशी सहकार्यापेक्षा असहकार्याचे धोरण राबविण्याचे त्यांनी ठरविले.

## ३.२ (ब) खिलाफत आणि असहकार चळवळ

### १. खिलाफत चळवळ

खिलाफत चळवळीच्या रूपाने राष्ट्रवादी चळवळीत एक नवा प्रवाह सामील झाला. नवसुशिक्षित मुस्लीम तरुण वर्ग अधिकाधिक जहाल व राष्ट्रवादी विचारांचा झाला होता. त्यातच लखनौ कराराने हिंदू-मुस्लीम ऐक्याचे वातावरण तयार केले होते. त्यामुळेच रौलट कायद्याच्या विरोधात हिंदू-मुस्लीम एकीला बळ आले होते. त्यामुळेच कधी नव्हते तेवढे हिंदू-मुस्लीम ऐक्य भारतीय राजकीय पटलावर दिसून येत होते. हिंदू-मुस्लीमांतील ऐक्य दर्शविण्यासाठी कट्टर आर्यसमाजवादी स्वामी श्रद्धानंद यांना दिल्लीच्या जामा मशिदीत जाऊन उपदेश करण्यास सांगण्यात आले. तर मुस्लीम धर्मीय डॉ. सैफुद्दीन यांना अमृतसरमधील शिखांच्या सुवर्ण मंदिराच्या चाव्या देण्यात आल्या. अशा प्रकारे सरकारी दडपशाहीच्या विरुद्ध हिंदू-मुस्लीमांचे ऐक्य प्रथमतःच दिसून आले. परस्परांना द्वेषाने बघणारे हिंदू-मुस्लीम तरुण एकमेकांच्या हातात हात घालून एकत्र आले. एरवी एकमेकांचा स्पर्श टाळणारे एकत्र पाणी पिऊ लागले. अशा वातावरणात मुस्लिमांतील राष्ट्रवादी विचार प्रवाहाने खिलाफत संघर्षाचे मूळ धरले.

तुर्कस्थानचा सुलतान हा जगभरातील मुस्लिमांचा धर्मप्रमुख म्हणजे खलिफा होता. पहिल्या महायुद्धांत तुर्कस्थान ब्रिटिशांच्या विरोधात जर्मनीच्या बाजूने लढत होते. तथापि युद्धाची अखेर काहीही झाली तरीही खलिफाच्या तुर्की साम्राज्याचे विभाजन करणार नाही. खलिफाला पदच्युत करणार नाही असे आश्वासन ब्रिटिशांनी भारतीय मुस्लिमांना दिले होते. त्यामुळेच पहिल्या महायुद्धात मुस्लिमांनी ब्रिटिशांना मदत केली होती. मात्र युद्ध समाप्तीनंतर पॅरिस शांतता परिषदेत इंग्लंड व फ्रान्सच्या मुत्सद्यांनी तुर्की साम्राज्याचे तुकडे पाडून आपापसात वाटून घेतले. खलिफाची सत्ता नष्ट केली. मुस्लिमांना दिलेल्या आश्वासनाचा ब्रिटिश पंतप्रधान लॉईड जॉर्ज यांनी भंग केला. परिणामी भारतातील मुसलमान संतप्त झाले. अलिबंधू मौलाना मोहम्मद अली व शौकत अली सहित मौलाना आझाद, हकिम अजमल खान, हसरत मोहानी इ. नेतृत्वाखाली खिलाफत कमिटीची स्थापना करून संपूर्ण देशभर निदर्शने करून खिलाफत चळवळ सुरू केली.

नोव्हेंबर, १९१९ मध्ये दिल्ली येथे अखिल भारतीय खिलाफत परिषदेचे अधिवेशन भरवून सरकारने आपल्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर सरकारला असलेले मुस्लिमांचे सहकार्य मागे घेण्याचे घोषित करण्यात आले. खलिफाची सत्ता त्याला पूर्ववत मिळावी म्हणून देशभर खिलाफत चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व मौलाना मोहम्मद अली व शौकत अली या बंधूनी केले. खिलाफत चळवळीतील मुसलमानांचा असंतोष ही हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी सुवर्णसंधी आहे हे काँग्रेस नेत्यांनी ओळखून विशेषतः महात्मा गांधी, लोकमान्य टिळक यांनी मुस्लिमांना राष्ट्रीय चळवळीत आणण्यासाठी खिलाफत चळवळीला पाठिंबा दिला. १९२० च्या प्रारंभीच महात्मा गांधीजीनी जाहीर केले की घटनात्मक सुधारणा, पंजाबबाबतचे धोरण आणि तुर्कस्थानच्या बाबतीत भारतीय मुस्लिमांचे समाधान झाले नाहीतर ते स्वतः असहकार चळवळीचे नेतृत्व करतील. महात्मा गांधीजींच्या या भूमिकेमुळे पुढे असहकार चळवळीच्या काळात देशात हिंदू-मुस्लिमांच्यात अभूतपूर्व असे ऐक्य घडून आले. यातूनच पुढे खिलाफत-असहकार चळवळ सुरू झाली. त्याचे नेतृत्व महात्मा गांधीनी केले. खिलाफत कमिटीने ३१ ऑगस्ट १९२० रोजी असहकार चळवळीला सुरुवात केली.

## २. असहकार चळवळ

सरकारने रौलट कायदे मागे घेण्यास, पंजाबमधील लष्करी कायदे मागे घेण्यास नकार दिला. काँग्रेसच्या स्वराज्याच्या मागणीकडेही दुर्लक्ष करण्यात आले. अशा पार्श्वभूमीवर सप्टेंबर १९२० मध्ये कलकत्ता येथे काँग्रेसचे विशेष अधिवेशन भरले. १ ऑगस्ट, १९२० रोजी लो. टिळकांचे निधन झाल्यामुळे स्वाभाविकच असहकार चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधीजींच्याकडे आले. कलकत्ता अधिवेशनात गांधीजींच्या असहकाराच्या योजनेस मान्यता देण्यात आली. डिसेंबर, १९२० च्या काँग्रेसच्या अधिवेशनात नागपूर येथे असहकाराचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

### १. असहकार चळवळीचा कार्यक्रम

पंजाबातील अत्याचार थांबविणे, खलिफावरील अन्याय दूर करण्यात सरकार अपयशी ठरले होते. इथून पुढे असे अन्याय, अत्याचार होऊ नयेत म्हणून भारतीय जनतेपुढे 'स्वराज्य' हाच एकमेव मार्ग आहे. स्वराज्याच्या हक्कांसाठी सरकारशी असहकाराच्या चळवळीने संघर्षाशिवाय पर्याय नाही असे सूचीत करून महात्मा गांधीजींनी पुढीलप्रमाणे असहकाराचा कार्यक्रम दिला.

१. हिंदी लोकांनी सरकारी नोकऱ्यांचा त्याग करावा.

२. हिंदी लोकांनी सरकारने दिलेल्या पदव्यांचा व स्थानिक संस्थातील जागांचा त्याग करावा.

३. सरकारी शाळा, महाविद्यालयांवर बहिष्कार टाकावा, राष्ट्रीय शाळा महाविद्यालये स्थापन कराव्यात.

४. वकिलांनी, जनतेने सरकारी न्यायालयीन, कामकाजावर बहिष्कार घालावा व लवाद नेमून आपले तंटे सोडवावेत.

५. कायदेमंडळाच्या निवडणुकांवर बहिष्कार टाकावा. कोणीही मतदान करू नये.

६. ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकावा. खादीचा प्रचार-प्रसार करावा.

७. १ कोटी रु. टिळक स्वराज्य फंड गोळा करावा.

डिसेंबर १९२० मध्ये नागपूर येथे भरलेले राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात असहकार चळवळीचा ठराव मंजूर झाला. 'स्वराज्य' हे राष्ट्रीय चळवळीचे ध्येय ठरविण्यात आले. त्यासाठी अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग अवलंबीला गेला.

**२. असहकार चळवळीची वाटचाल**

वरील सर्व परिस्थिती लक्षात घेऊन गांधीजींनी १ ऑगस्ट, १९२० ला गव्हर्नर जनरलला एक पत्र लिहून काही मागण्या केल्या. पण गव्हर्नर जनरले त्या पत्राकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे ठरल्याप्रमाणे गांधीजींनी आपल्या असहकार चळवळीस प्रारंभ केला. असहकार चळवळीच्या काळात अनुसरलेले मार्ग खालीलप्रमाणे :

**(१) शाळा–महाविद्यालयांवर बहिष्कार** : हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सरकारी शाळा, महाविद्यालयांवर बहिष्कार घातला. अनेक राष्ट्रीय शाळा–महाविद्यालये सुरू करण्यात आली. जामिया, मिलिमया इस्लामिया, विद्यापीठ अलिगड, बिहार विद्यापीठ, काशी विद्यापीठ, गुजराथ विद्यापीठ अशी अनेक राष्ट्रीय विद्यापीठांची स्थापना याच काळात करण्यात आली. आचार्य नरेंद्रदेव, डॉ. झाकीर हुसेन, लाला लजपतराय यांसारख्या मान्यवरांनी राष्ट्रीय महाविद्यालयात शिकवण्यास सुरुवात केली. राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या अनेक शाळा–महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली.

**(२) न्यायालयांवर बहिष्कार** : अनेक वकिलांनी न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकला. चित्तरंजन दास (देशबंधू), मोतीलाल नेहरू, राजेंद्र प्रसाद, सैफुद्दीन किचलू, सि. राजगोपालाचारी, सरदार पटेल. टी. प्रकाशम, असफ अली इ. प्रख्यात कायदेपंडितांनी आपल्या वकिलीचा त्याग केला. अनेक ठिकाणी लोकन्यायालये सुरू करण्यात आली.

**(३) टिळक स्वराज्य फंड–स्त्रियांचा सहभाग** : असहकार चळवळीला वित्तपुरवठा करण्यासाठी टिळक स्वराज्य फंड सुरू करण्यात आला. केवळ सहा महिन्याच्या आतच एक कोटी रु. पेक्षा अधिक निधी या फंडात जमा झाला. स्त्रियांनीही आपला उत्स्फूर्त प्रतिसाद या चळवळीत दिला. अनेक ठिकाणी मुक्तपणे स्त्रियांनी आपले दाग–दागिने या चळवळीसाठी दिले.

**(४) परदेशी कपड्यांची होळी–खादीचा प्रसार, प्रचार** : अनेक ठिकाणी परदेशी कापडांच्या होळ्या करण्यात आल्या. परदेशी कापडांवर बहिष्कार ही लोक चळवळ बनली. परदेशी मालावरही बहिष्कार घालण्यात आला. खादीचा प्रचार, प्रसार मोठ्या प्रमाणात करण्यात आला. खादी हे स्वराज्याचे प्रतिक बनले.

**(५) सरकारी पदव्या व मानचिन्हांचा त्याग** : अनेक भारतीय नागरिकांनी सरकारकडून मिळालेल्या पदव्या व अधिकारांचा त्याग केला. महात्मा गांधीनी कैसर–ए–हिंद पदक सरकारला परत केले. रविंद्रनाथ टागोरांनी 'सर' या किताबाचा त्याग केला. सुभाषचंद्र बोस यांनी आय.सी.एस. पदवीचा त्याग केला. अनेकांनी सरकारी नोकरीचा त्याग करून असहकार चळवळीत भाग घेतला.

**(६) प्रिन्स ऑफ वेल्सवर बहिष्कार** : भारतातील राजकीय असंतोष कमी करण्यासाठी इंग्लंडचे राजपुत्र प्रिन्स ऑफ वेल्स १७ नोव्हेंबर, १९२१ रोजी भारत भेटीवर आले होते. त्यांच्या या भेटीवर राष्ट्रीय सभेने बहिष्कार टाकला. मुंबईत त्याच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. भारतीयांनी त्यांचे हरताळ पाळून स्वागत केले.

**(७) जनतेचा प्रतिसाद** : देशातील जनतेने मोठ्या प्रमाणात असहकाराच्या चळवळीस पाठिंबा दिला. खादीचा प्रचार, प्रसार, सूतकताई, परदेशी मालावर, कपड्यांवर बहिष्कार, दारू दुकानांवर निदर्शने, स्वदेशीचा प्रचार, पंचायती, लोकन्यायालयांची स्थापना, राष्ट्रीय शाळांची स्थापना, राष्ट्रीय शिक्षण आदी कार्यक्रम हाती घेतले.

### ३. सरकारची दडपशाही

गांधीजींच्या आदेशाने असहकार चळवळ संपूर्ण देशभर उत्स्फूर्तपणे सुरू होती. सरकारने मात्र ही चळवळी मोडून काढण्यासाठी दडपशाही सुरू केली. सरकारने जनतेवर लाठीमार, गोळीबार, नेत्यांची धडपकड सुरू केली. अनेक नेत्यांवर भाषणबंदी, प्रवेश मनाई करण्यात आली. हजारो स्वयंसेवकांना पकडण्यात आले. शांततामय चळवळीला हिंसात्मक स्वरूप येऊ लागले. ५ फेब्रुवारी, १९२२ रोजी उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील चळवळीला हिंसक वळण लागले. शांततेने चाललेल्या एका मिरवणुकीवर पोलिसांनी गोळीबार केला. त्यामुळे संतप्त जमावाने पोलीस कचेरी पेटवून दिली. त्यात २१ पोलीस व १ फौजदार मरण पावले. गांधीजी या हिंसक घटनेने व्यथित झाले.

### ४. असहकार चळवळीस स्थगिती

चौरीचौरा येथील हिंसक घटनेने गांधीजी व्यथित झाले. अहिंसेच्या तत्वालाच धोका निर्माण झाला. सरकार अधिक हिंसात्मक रितीने ही चळवळ दडपून टाकेल. सरकारी दडपणाला तोंड देण्याइतपत मनोबल व सामर्थ्य अद्याप लोकांमध्ये निर्माण झालेले नाही म्हणून गांधीजींनी असहकार आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला व १८ फेब्रुवारी १९२२ रोजी असहकार चळवळ स्थगित झाल्याची घोषणा केली.

### ५. असहकार चळवळीचे मूल्यमापन

एका वर्षात 'स्वराज्य' असा निर्धार करून महात्मा गांधीजीनी असहकार चळवळीची सुरुवात केली होती. तथापि, १९२२ पर्यंत काहीच साध्य झाले नाही. त्यातच गांधीजीनी अचानक चळवळ तहकूब केल्याने जनतेचा भ्रमनिरास झाला. राष्ट्रीय सभेच्या मोतीलाल नेहरू, देशबंधू चित्तरंजन दास, मौलाना आझाद, सुभाषचंद्र बोस, लाला लजपतराय आदी नेत्यांना गांधीजींचा निर्णय आवडला नाही. त्यामुळे राष्ट्रीय सभेअंतर्गतच १९२३ मध्ये सी. आर. दास, मोतीलाल नेहरू यांनी 'स्वराज्य' पक्षाची स्थापना केली. असहकार चळवळ पूर्णपणे यशस्वी होऊ शकली नाही.

तरीही या चळवळीने राष्ट्रीय आंदोलनाला जन आंदोलनाचे स्वरूप प्राप्त करून दिले. सनदशीर चळवळ मागे पडून एका नव्या लोक लढ्याला सुरुवात झाली. सुशिक्षित, उच्च वर्ग व शहरापुरती मर्यादित असणारी भारतीय स्वातंत्र्याची चळवळ खेडोपाडी आणि सामान्य जनतेपर्यंत पोहोचली. जनतेत स्वातंत्र्याविषयी जागृती झाली. स्त्रियांचा, शाळकरी मुलांचा सहभाग लक्षणीय होता. राष्ट्रीय चळवळीस एक नवे नेतृत्व मिळाले. स्वदेशी चळवळीमुळे देशातील

उद्योगधंद्याची वाढ झाली. भारतीय राष्ट्रवादात वाढ झाली. महात्मा गांधींच्या अहिंसक सत्याग्रहाच्या अभिनव मार्गामुळे हजारो सामान्य स्त्री-पुरुषांना भारतीय भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होता आले. काही विशिष्ट वर्गापुरतीच मर्यादीत असणारी स्वातंत्र्याची चळवळ असहकाराच्या चळवळीपासून पुढे लोकचळवळ बनली.

### स्वयं अध्ययन प्रश्न २

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............. च्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळीस जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले.
(अ) म. गांधी (ब) रविंद्रनाथ टागोर (क) लो. टिळक (ड) मोतीलाल नेहरू

२. रविंद्रनाथ टागोर यांनी ............. पदवीचा त्याग केला.
(अ) कैसर-ए-हिंद (ब) सर (क) आय.सी.एस. (ड) रावबहादूर

३. १९१९ मध्ये अखिल भारतीय खिलाफत परिषदेचे अधिवेशन ............. येथे भरले.
(अ) आग्रा (ब) कलकत्ता (क) मुंबई (ड) दिल्ली

४. १ ऑगस्ट १९२० रोजी ............. यांचे निधन झाले.
(अ) लो. टिळक (ब) म. गांधी (क) सरदार पटेल (ड) मोतीलाल नेहरू

५. टिळक स्वराज्य फंडाचे उद्दिष्ट ............. रुपयांचे होते.
(अ) १ कोटी (ब) २ कोटी (क) ३ कोटी (ड) ५ कोटी

६. पहिल्या महायुद्धात तुर्कस्थान ............. च्या बाजूने होता.
(अ) इंग्लंड (ब) जर्मनी (क) अमेरिका (ड) भारत

७. १९२० च्या काँग्रेसच्या अधिवेशनात ........... हे असहकार चळवळीचे ध्येय ठरविण्यात आले.
(अ) स्वातंत्र्य (ब) गणतंत्र (क) स्वराज्य (ड) लोकशाही

८. आय.सी.एस. या पदवीचा त्याग ............. यांनी केला.
(अ) म. गांधी (ब) पं. नेहरू (क) लो. टिळक (ड) सुभाषचंद्र बोस

९. चौरीचौरा हे ठिकाण उत्तरप्रदेशात ............. जिल्ह्यात आहे.
(अ) गोरखपूर (ब) गुरुदासपूर (क) फत्तेपूर (ड) रामपूर

१०. सी. आर. दास, मोतीलाल नेहरू यांनी ............. पक्षाची स्थापना केली ?
(अ) काँग्रेस (ब) स्वराज्य (क) मुस्लिम लीग (ड) फॉरवर्ड ब्लॉक

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. जालियनवाला बाग हत्याकांडाच्या चौकशीसाठी सरकारने कोणते कमिशन नेमले ?

२. महायुद्धाच्या काळात राजद्रोह्यांना आळा घालण्यासाठी कोणता कायदा केला ?

३. जालियनवाला बाग हत्याकांड कोणत्या शहरात घडले ?

४. तुर्कस्थानच्या सुलतानाला काय म्हणत ?

५. खिलाफत चळवळीचे नेतृत्व कोणी केले ?

६. पंजाबात लष्करी कायदा केव्हा जाहीर करण्यात आला ?

७. असहकार चळवळीचे नेतृत्व कोणी केले ?

८. टिळक स्वराज्य फंडाला स्त्रियांनी काय दिले ?

९. महात्मा गांधीने कोणते पदक सरकारला परत केले ?

१०. भारत भेटीवर आलेले इंग्लंडचे राजपूत्र कोण होते ?

## ३.२.३ सविनय कायदेभंगाची चळवळ

### (अ) प्रास्ताविक

असहकार आंदोलन आकस्मित स्थगित केल्याने महात्मा गांधीजीनाही अटक होऊन ६ वर्षांची शिक्षा झाली. राष्ट्रीय सभेत 'फेरवादी', 'नाफेरवादी' असे दोन गट पडले. सी. आर. दास, मोतीलाल नेहरूंच्या स्वराज्य पक्षाने कौन्सीलच्या निवडणुका लढवून कायदेमंडळात सरकारविरोधी धोरण अवलंबिले. पण त्याही फारसे यश आले नाही. दरम्यानच्या काळात भारताच्या राजकीय वातावरण सायमन कमिशन, सायमन कमिशनला विरोध, नेहरू रिपोर्ट, लाहोर अधिवेशन व संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव अशा महत्त्वाच्या घडामोडी होऊन जनजागृती झाली. प्रकृती अस्वास्थ्यस्तव व गांधीजींचीही तुरुंगातून सुटका झाल्यामुळे तेही भारतीय राजकारणात पुन्हा एकदा सक्रीय झाले. परिणामी, चौरीचौरा घटनमुळे स्थगित झालेली गांधीजींची बार्डोली साराबंदीच्या रूपाने सुरू होणाऱ्या कायदेभंगाच्या चळवळीस पुन्हा एकदा सकारात्मक वातावरण तयार झाले.

नेहरू रिपोर्टमधील स्वराज्याच्या मागणीची एका वर्षाच्या आत सरकारने दखल न घेतल्याने २८ डिसेंबर, १९२९ रोजी भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या लाहोर येथे भरलेल्या ऐतिहासिक अधिवेशनात पं. जवाहरलाल यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पारीत झाला. २६ जानेवारी, १९३० रोजी संपूर्ण देशभर स्वातंत्र्य दिवस म्हणून साजरा करण्यात आला. तरीही सरकारने राष्ट्रीय सभेच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घेतली नाही. उलट दडपशाहीच सुरू केली. गांधीजींच्या मागण्याकडेही व्हाईसरॉयने दुर्लक्ष केल्याने शेवटी १९ फेब्रुवारी १९३० रोजी काँग्रेस कार्यकारिणीने महात्मा गांधीजींना कायदेभंग चळवळ करण्याचे सर्वाधिकार दिले. गांधीजींनी १२ मार्च, १९३० रोजी दांडी यात्रेला सुरुवात करून कायदेभंगाचे दुसरे जनआंदोलन सुरू केले.

## (ब) सविनय कायदेभंग चळवळीची उद्दिष्टे

### १. मिठाचा सत्याग्रह

ब्रिटिशांनी केलेले अन्यायी व जुलमी कायदे मोडून सत्याग्रह करणे ही कायदेभंगामागची भूमिका होती. त्यासाठी गांधीजीनी मिठाचा कायदा मोडून सत्याग्रह करण्याचे ठरविले. कारण भारत तिन्ही बाजूनी समुद्राने वेढलेला असतानाही ब्रिटिशांनी भारतीयांना मीठ तयार करण्यावर बंदी घातली होती. मीठ ही अशी एक जीवनावश्यक गोष्ट आहे की जी सर्वच लोकांच्या जीवनात महत्त्वाची असते. शिवाय गांधीजींनी मिठाचा नैतिकतेशी संबंध जोडला होता. त्यामुळेच मिठाच्या सत्याग्रहाचा त्यांनी लढा चालू केला.

गांधीजीनी आपल्या मागण्यांचे पाठविलेले पत्र व्हाईसरॉयनी बेदखल केल्यामुळे १२ मार्च १९३० रोजी आपल्या ७८ सहकाऱ्यांसह दांडी पदयात्रेला साबरमती आश्रमातून सुरुवात केली. वाटेत अनेक ठिकाणी हजारो लोक त्यांच्या पदयात्रेत सामील झाले. दांडी यात्रेने संपूर्ण देशभर उत्साहाचे वातावरण तयार केले. जवळपास २४० मैलांचा प्रवास करून दि. ६ एप्रिल, १९३० रोजी गांधीजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी दांडीच्या समुद्रकिनाऱ्यावर जाऊन मिठाचा सत्याग्रह सुरू केला. अनेक ठिकाणी मीठ तयार करून त्याचा जाहीर लिलाव होत असे. चोरून मीठ विक्री होत असे. गांधीजीनी सुरत जिल्ह्यातील धारासणा येथील मिठागरावर कायदेभंग करण्याचा निर्णय घेतला. पण तत्पूर्वीच ४ मे १९३० रोजी त्यांना अटक झाली. तरीही त्यांचे सहकारी सरोजिनी नायडू, मणिलाल गांधी यांनी धारासणा सत्याग्रहास मार्गदर्शन केले. हजारो लोकांनी पोलिसी अत्याचाराला भीक न घालता निर्भयपणे कायदेभंग केला. रत्नागिरी जिल्ह्यातील शिरोडा येथे व मुंबईत वडाळा येथे मोठ्या प्रमाणात मीठाचा सत्याग्रह झाला. दोन्ही ठिकाणी पोलिसांच्या लाठीमाराला, तुरुंगवासाला न जुमानता हजारो स्वयंसेवकांनी सत्याग्रह केला व आम्ही ब्रिटिशांचे कायदे मानणार नाही हेच सिद्ध केले.

### २. जंगल सत्याग्रह

भौगोलिक परिस्थितीमुळे ज्या लोकांना मिठाच्या सत्याग्रहात सहभागी होता आले नाही अशांनी व खेड्यातील हजारो लोकांनी ब्रिटिशांनी केलेले जंगलाचे कायदे मोडून सत्याग्रह केला. सरकारी कर न भरता जंगलातील गवत कापून आणणे, लाकूडफाटा तोडून आणणे, गाई-गुरे चराईसाठी जंगलात सोडून देणे इत्यादी ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाने आपला उत्स्फूर्त सहभाग या सत्याग्रहात दाखवून दिला. महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यातील बिळाशी, रायगड जिल्ह्यात चिरनेर, अहमदनगर जिल्ह्यातील मांगी, तुंगी, नाशिक जिल्ह्यातील बागलाण येथील जंगल सत्याग्रह अभूतपूर्व झाले. कर्नाटकात शिरशी, कारवार, बैलहोंगल येथेही जंगल सत्याग्रह झाले. जंगल सत्याग्रहात ग्रामीण भागातील आदिवासी, डोंगरी भागातील अशिक्षित लोकांचा सहभाग अधिक होता. महिलाही जंगल सत्याग्रहात अग्रेसर होत्या.

### ३. खुदा-इ-खिदमतगार

वायव्य सरहद्द प्रांतात खान अब्दुल गफार खान तथा 'सरहद्द गांधी' यांच्या खुदा-इ-खिदमतगार (अल्लाचे सेवक) या संघटनेने सविनय कायदेभंगाचे आंदोलन मोठ्या प्रमाणात केले. खान अब्दुल गफार खान यांनी तेथील

पठाणी लोकांना भारतीय स्वातंत्र्यासाठी शांततेच्या मार्गाने लढण्याची शिकवण दिली होती. दि. २२ एप्रिल १९३० रोजी पेशावर येथे कायदेभंगाच्या चळवळीला मिरवणुकीने सुरुवात झाली. मिरवणुकीतील प्रमुख नेत्यांना सरकारने अटक केली. खान अब्दुल गफार खान यांच्या अटकेची बातमी दुसऱ्या दिवशी समजताच हजारो स्वयंसेवकांनी पोलीस चौकीवर मोर्चा काढला. सरकारला पेशावर सोडावे लागले. मात्र पुढे त्यांनी परत ते जिंकून घेतले.

### ४. सोलापूर मार्शल लॉ

महात्मा गांधी यांच्या अटकेच्या निषेधात ६ मे १९३० रोजी सोलापुरात हरताळ आणि गिरणी कामगारांनी संप पुकारला. सुमारे दहा हजार स्वयंसेवकांनी दारूची दुकाने पेटवून दिली. ताडीची झाडे तोडण्यास सुरुवात केली. जमावाची पोलिसांशी चमक झाली. पोलिसांनी गोळीबार केला. संतप्त जमावाने पोलीस ठाणे पेटवून दिले. सर्वत्र हिंसक कारवाया सुरू झाल्या. परिस्थिती आवाक्याबाहेर जाताच सरकारने सोलापूर शहरात 'मार्शल लॉ' लष्करी कायदा पुकारून शहर लष्कराच्या ताब्यात दिले. या घटनेच्या निषेधात संपूर्ण महाराष्ट्रभर हरताळ व निदर्शने झाली.

### ५. साराबंदी, बहिष्कार, निरोधने

पावसाळा सुरू झाल्यावर मिठाच्या सत्याग्रहाचे स्वरूप बदलले. परदेशी मालावर विशेषतः परदेशी कपड्यांवर बहिष्कार, दारू, दुकानांसमोर निरोधने, करबंदी इ. कार्यक्रम सुरू झाले. कर्नाटक, गुजराथ मधील शेतकऱ्यांनी शेतसारा भरायला नकार देवून करबंदीची चळवळ उभारली. मुंबईत शेकडो दारू दुकानासमोर स्वयंसेवकांनी निदर्शने करून ती बंद करायला भाग पाडले. मुंबई बाबू गेणू या तरुण कामगाराने विदेशी कापडाने भरलेला ट्रक अडविण्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान केले. बाबू गेणूच्या हौतात्म्याने देशातील तरुणांना प्रेरित केले. स्त्रियांनीही मोठ्या प्रमाणात या चळवळीला प्रतिसाद दिला. सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, उषा मेहता अशा अनेक महिलांनी चळवळीचे नेतृत्व केले. मिठाच्या सत्याग्रहात व जंगल सत्याग्रहात महिलांनी मोठ्या प्रमाणात योगदान दिले.

### (ड) सरकारची दडपशाही

कायदेभंगाच्या चळवळीला मिळत असलेले यश पाहून सरकारला हादरा बसला. अल्पावधीत तळागाळापर्यंत फोफावलेली ही चळवळ दडपून टाकण्याचा निश्चय केला. हजारो सत्याग्रहीची धरपकड करून त्यांना तुरुंगात टाकले. अनेक ठिकाणी गोळीबार, लाठीमार सारख्या अत्याचारी मार्गाचा अवलंब केला. पेशावर, कराची, मद्रास येथे विनाकारण गोळीबार करण्यात आला. बंगाल, बिहार, ओरिसा येथे पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अत्याचार केले. हातात घेतलेले मीठ तसेच हातात घेतलेला ध्वज टाकून देण्यासाठी हातावर दंडुक्यांचा प्रहार यासारखे पाशवी जुलूम केले. अनेकांच्यावर खटले लादून फाशी देण्यात आली. महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, खान अब्दुल गफारखान आदी नेत्यांसह जवळपास ९०,००० हून अधिकांना तुरुंगात डांबण्यात आले. १६००० हून अधिक स्त्रियांनी तुरुंगवास पत्करला. १०० हून अधिक लोक गोळीबारात मृत्यूमुखी पडले. तरीही लोकांनी ही चळवळ नेटाने चालविली. काँग्रेस संघटनेला बेकायदेशीर ठरविले. राष्ट्रवादी मुखपत्रांवर निर्बंध लादले.

### (इ) गोलमेज परिषदा – गांधी–आयर्विन करार

कायदेभंग चळवळ चालू असतानाच सायमन कमिशनचा अहवाल जाहीर होताच त्यावर विचार करण्यासाठी सरकारने नोव्हेंबर १९३० मध्ये पहिली गोलमेज परिषद लंडन येथे आयोजित केली. काँग्रेसने या परिषदेवर बहिष्कार टाकला. मात्र मुस्लीम लिग, हिंदू महासभा काही संस्थानिक या परिषदेत सहभागी झाले. तथापी काँग्रेसच्या बहिष्कारामुळे या परिषदेतून काहीही निष्पन्न झाले नाही. शेवटी सरकारने काँग्रेस परिषदेत सहभागी व्हावे म्हणून प्रयत्न केले. त्यातून गांधी–आयर्विन करार झाला.

मार्च १९३१ मध्ये व्हॉईसरॉय लॉर्ड आयर्विन व गांधीजी यांच्यात एक करार झाला तोच 'गांधी–आयर्विन करार' होय. या करारानुसार गांधीजीनी सविनय कायदेभंग चळवळ मागे घ्यावी, सरकारने राजकीय कैद्यांची मुक्तता करावी, सरकारने मीठ तयार करण्यास परवानगी द्यावी, दारू व अन्य नशिल्या पदार्थांच्या दुकानांवर शांततेने निदर्शने करण्यास परवानगी द्यावी, दुसऱ्या गोलमेज परिषदेत काँग्रेसने सहभागी व्हावे अशा प्रमुख मागण्या मान्य करण्यात आल्या.

गांधी–आयर्विन करारात ठरल्याप्रमाणे गांधीजीनी कायदेभंगाची चळवळ स्थगित केली. सप्टेंबर, १९३० मधे लॅडन येथे भरलेल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत गांधीजी हजर राहिले. तथापि या परिषदेत गांधीजींची भारतासाठी संपूर्ण जबाबदार शासनपद्धतीची मागणी अमान्य झाल्यामुळे भारतीय स्वातंत्र्याच्या दृष्टीने काहीच प्रगती झाली नाही. त्यामुळे डिसेंबर १९३१ मध्ये गांधी भारतात परत आले. त्यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेतला. मात्र लॉर्ड आयर्विनच्या जागी आलेल्या लॉर्ड विलिंग्डन यांनी ही चळवळ दडपून टाकण्यासाठी देशभर महत्त्वाच्या नेत्यांना अटक केली. अन्य हजारो स्वयंसेवकांनाही तुरुंगात डांबण्यात आले. काँग्रेस संघटना बेकायदेशीर घोषीत करण्यात आली. सरकारने विशेष वटहुकूम काढून राज्यकारभार चालविण्याचा प्रयत्न केला. हजारो नागरिकांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या. राष्ट्रवादी साहित्य आणि वृत्तपत्रांवर निर्बंध लादले. अशा परिस्थितीत ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी 'जातीय निवाडा' १६ ऑगस्ट १९३२ रोजी जाहीर केला व अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघाची घोषणा केली. या निवाड्याविरुद्ध गांधीजीनी आमरण उपोषण सुरू केले. काँग्रेसचे चळवळीकडे दुर्लक्ष झाले. शेवटी बाबासाहेब आंबेडकर यांचे मन वळवून म. गांधी व डॉ. आंबेडकर यांच्यात २५ सप्टेंबर १९३२ रोजी 'पुणे करार' झाला.

### (ई) सविनय कायदेभंग चळवळीचा शेवट

जातीय निवाड्यामुळे झालेल्या पुणे करारानंतर गांधीजीनी अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास वाहून घेतले. त्यासाठी 'हरिजन सेवक संघा'ची स्थापना केली. अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा जोर कमी होऊ लागला. त्यातच आत्मशुद्धीसाठी गांधीजीनी २१ दिवसांच्या उपोषणाला सुरुवात केली. परिणामी कायदेभंगाची चळवळ तहकूब करण्यात आली. पुढे वैयक्तिक कायदेभंगाच्या स्वरूपात चळवळ चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. वैयक्तिक कायदेभंगाची सरुवात गांधीजीनी स्वतःपासून

केली. त्यांना परत अटक झाली. आपल्या अटकेनंतर गांधीजी विनोबा भावे यांना वैयक्तिक सत्याग्रहासाठी परवानगी दिली. तथापी दीर्घकाळ चाललेल्या या चळवळीत महत्त्वाचे राजकीय नेते व लाखो लोकांना कैद झाल्यामुळे चळवळीला काहीशी मरगळ आली होती. शेवटी मे १९३४ मध्ये पाटणा येथे झालेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत कायदेभंगाची चळवळ रद्द केल्याची घोषणा करण्यात आली.

**(ड) सविनय कायदेभंग चळवळीचे महत्त्व, परिणाम व मूल्यमापन**

सविनय कायदेभंगाची चळवळ स्वातंत्र्याचे ध्येय प्राप्त करू शकली नाही तरीही स्वातंत्र्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल होते. या चळवळीमुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीला लोकलढ्याचे स्वरूप प्राप्त झाले. स्वातंत्र्याची चळवळ खेड्या-पाड्यात, शेतकरी, गोर गरिबांच्या घरा-झोपडीपर्यंत पोहोचली. सर्वसामान्य माणसे, शेतकरी, स्त्रिया तरुण, शाळकरी मुले, कामगार, आदिवासी यांच्या सहभागामुळे स्वातंत्र्याची चळवळ व्यापक बनली. तिला जनाधार मिळाला. महात्मा गांधींच्या अहिंसक सत्याग्रहाच्या कल्पनेमुळे जनता निर्भय बनली. लाठीकाठी, तुरुंगवासाचे भय त्यांना राहिले नाही. धारासणा, वडाळा, शिरोडा सारख्या सत्याग्रहातून गांधीजींच्या निशस्त्र प्रतिकाराचे सामर्थ्य संपूर्ण जगाला कळाले. ग्रामीण जनता, शेतकरी, स्त्रिया, कामगार हा वर्ग राजकीयदृष्ट्या या चळवळीमुळे जागृत झाला. मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, परदेशी मालावर बहिष्कार, स्वदेशीचा वापर यासारख्या कार्यक्रमामुळे चळवळीने राष्ट्रव्यापी स्वरूप धारण केले. चळवळीची तीव्रता कमी करण्यासाठीच सरकारला गांधी-आयर्विन करार व पुढे गोलमेज परिषदांचे आयोजन करावे लागले. या चळवळीच्या तीव्रतेमुळेच सरकारला सुधारणांचा हप्ता १९३५ च्या कायद्याने देणे गरजेचे वाटू लागले. राष्ट्रीय काँग्रेस, यूथ लिग, किसान सभा, राष्ट्रीय विद्यालये, चरखा संघ, खुदा-ए-खिदमतगार अशा अनेक संघटना सरकारने बेकायदेशीर ठरवून अनेकांच्या मालमत्ता जप्त केल्या. लाखो लोकांना कैद झाली. तुरुंगाची भीती लोकांना राहिली नाही. जरी ही चळवळ स्वातंत्र्य मिळवू शकली नाही तरी पुढील राजकारणाच्या दृष्टीने जनमानसात स्वातंत्र्याची बिजे खोलवर रोवली.

## स्वयं अध्ययन प्रश्न ३

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. गांधीजीनी ............. रोजी दांडी यात्रेला सुरुवात केली.

(अ) १२ मार्च १९३० (ब) ६ एप्रिल १९३०

(क) १९ फेब्रुवारी १९३० (ड) ६ मार्च १९३०

२. महात्मा गांधीनी ............. कायदा मोडून सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.

(अ) जंगलाचा (ब) करबंदीचा (क) मिठाचा (ड) साराबंदीचा

३. खान अब्दुल गफार खान यांनी............. संघटना स्थापन केली.

(अ) खुदा-ए-खिदमतगार (ब) मुस्लिम लीग

(क) काँग्रेस (ड) हिंदू महासभा

४. ............. शहरत मार्शल लॉ हा लष्करी कायदा जारी केला होता.

(अ) सोलापूर (ब) मुंबई (क) पेशावर (ड) लाहोर

५. कर्नाटक, गुजराथ मधील शेतकऱ्यांनी शेतसारा भरण्यास नकार देवून ............. चळवळ उभारली.

(अ) दारूबंदी (ब) करबंदी (क) मिठबंदी (ड) जंगलबंदी

६. ............. मध्ये गांधी-आयर्विन करार झाला.

(अ) १९३० (ब) १९३१ (क) १९३२ (ड) १९३४

७. लॉर्ड आयर्विन नंतर ............. हे भारतात व्हाईसरॉय म्हणून आले.

(अ) लॉर्ड विलिंग्डन (ब) लॉर्ड कर्झन (क) लॉर्ड डफरिन (ड) लॉर्ड मायो

८. ............. रोजी जातीय निवाडा जाहीर झाला.

(अ) १६ ऑगस्ट, १९३२ (ब) २५ सप्टेंबर, १९३२

(क) ६ मार्च, १९३१ (ड) २० सप्टेंबर, १९३२

९. 'हरिजन सेवक संघा'ची स्थापना ............. यांनी केली.

(अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (ब) महात्मा गांधी

(क) जवाहरलाल नेहरू (ड) विनोबा भावे

१०. ............. येथे झालेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत कायदेभंगाची चळवळ रद्द करण्याची घोषणा करण्यात आली.

(अ) मुंबई (ब) पुणे (क) बिहार (ड) पाटणा

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. फेरवादी-नाफेरवादी असे गट कोणत्या संघटनेत पडले ?

२. १९२९ मध्ये काँग्रेसचे अधिवेशन कोठे झाले ?

३. महात्मा गांधींच्या प्रसिद्ध दांडीयात्रेस कुठून सुरुवात झाली ?

४. शिरोडा हे ठिकाण कोणत्या जिल्ह्यात येते ?

५. अब्दुल गफार खान याना कोणत्या नावाने ओळखले जात असे ?

६. सोलापुरात पुकारलेल्या लष्करी कायद्याला काय म्हणतात ?

७. मुंबईत विदेशी कापडाचा ट्रक अडविण्यासाठी कोणी बलिदान दिले ?

८. पहिली गोलमेज परिषद कोठे भरली होती ?

९. जातीय निवाडा कोणी जाहीर केला ?

### ३.२.४ **१९४२ ची चले जाव चळवळ** [ Quit India Movement, 1942]

**(अ) प्रास्ताविक**

चले जाव, छोडो भारत या अतिशय साध्या पण आवेशपूर्ण घोषणेने एका ऐतिहासिक संघर्षाची सुरुवात झाली की जी ऑगस्ट क्रांती म्हणूनही इतिहासाला परिचित आहे. १९४२ ची चले जाव, छोडो भारत ही चळवळ भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या अंतीम पर्वातील एक दैदिप्यमान पर्व म्हणून ओळखले जाते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारताची राजकीय परिस्थिती अधिक गंभीर बनली. भारतीय राजकारणाची कोंडी फोडण्यासाठी ब्रिटिशांनी पाठविलेली क्रिप्स योजना सर्वच पक्षानी फेटाळली होती. गांधीजीही भारतीय राजकारणात पुन्हा सक्रीय झाले होते. इंग्लंड दुसऱ्या महायुद्धात गुंतल्यामुळे नजीकच्या काळात त्यांच्याकडून भारताला काहीच मिळणार नाही ही भारतीय नेत्यांची खात्री होऊ लागली. वैयक्तिक सत्याग्रहाचा फारसा उपयोग झाला नाही. त्यामुळे चळवळीची तीव्रता प्रखर केली पाहिजे असे काँग्रेसला वाटू लागले. महायुद्धाच्या झळा भारतीयांनाही बसू लागल्या होत्या. त्यातच जपानची विजयी घौडदौड इंग्लंड विरुद्ध भारताच्या दिशेने चालू होती. गांधीजींसारखे शांततावादी नेतेही निकराची भाषा बोलू लागले. त्यांनी आपल्या 'हरिजन' पत्रातून ब्रिटिशांच्या धोरणावर प्रखर टीका सुरू केली. नेताजींच्या आझाद हिंद फौजेच्या लढ्याचे आकर्षणही वाढू लागले होते. अशा सर्व परिस्थितीत गांधीजीनी एका नव्या चळवळीचा कार्यक्रम भारतीय जनतेला दिला तो म्हणजेच 'चले जाव'ची चळवळ.

**(ब) चले जाव चळवळीची कारणे**

**१. भारताचा दुसऱ्या महायुद्धात एकतर्फी सहभाग** : ब्रिटिशांनी भारतीय नेत्यांना न विचारतच भारतास या युद्धात गोवले. गव्हर्नर जनरलने दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडच्या बाजूने भारताचा सहभाग जाहीर केला. काँग्रेसने या कृतीचा तीव्र शब्दात निषेध केला. या साम्राज्यवादी युद्धाशी भारताचा काहीही संबंध नाही असे जाहीर करून काँग्रेसने असहकाराचे धोरण स्वीकारले. भारतात सरकारच्या एकतर्फी निर्णयाविरुद्ध असंतोषाची लाट उसळली.

**२. सरकारचे आडमुठे धोरण** : सरकारच्या युद्धसहभागाच्या एकतर्फी निर्णयानंतरही काँग्रेस नेते ब्रिटिशांना सहकार्य करण्यास तयार होते. मात्र ब्रिटिशांनी भारताबाबतचे आपले धोरण स्पष्ट करून संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करावी अशी मागणी केली. परंतु सरकारने कोणतेही ठोस आश्वासन न देता भारताबाबतचा घटनात्मक विचार युद्धसमाप्तीनंतर घेतला जाईल अशी संदिग्धतेची भूमिका घेतली. सरकारच्या या आडमुठ्या धोरणामुळे काँग्रेसला 'चले जाव' आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला.

**३. जनतेचा वाढता असंतोष** : १९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाले होते. युद्धाच्या अप्रत्यक्ष परिणामांची झळ भारतालाही बसू लागली. जिवनावश्यक वस्तूंच्या किमतीत भाव वाढ झाली. वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला. सरकारने पैसा उभा करण्यासाठी कर वाढविले. लष्कराच्या उपयोगासाठी लोकांची घरे, जमिनी बळजबरीने हिरावून घेतल्या. परिणामी जनता हैराण झाली. ब्रिटिश राजवटीबद्दल असंतोष वाढू लागला व चले जाव आंदोलनास अनुकूल वातावरण निर्माण झाले.

**४. जपानच्या आक्रमणाचा धोका** : दुसऱ्या महायुद्धात जपान जर्मनीच्या बाजूने इंग्लंडच्या विरोधात लढत होता. भारत ही ब्रिटिशांची वसाहत असल्याने जपानने आग्नेय आशियातील सिंगापूर, मलाया, रंगून जिंकून

भारताच्या सरहद्दीवर धडक मारण्याच्या प्रयत्नात होता. सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद फौजेने जपनाच्या सहकार्याने अंदमान, निकोबार बेटेही जिंकून घेतली होती. अशातच ब्रिटिशांची वसाहत म्हणून जपानने भारतावर हल्ला केली तर ब्रिटिश भारताचे संरक्षण करू शकणार नाहीत असे गांधीजीना वाटू लागले. ब्रिटिश भारत सोडून गेले तर जपान भारतावर आक्रमण करणार नाही. त्यामुळे ब्रिटिशांनी लवकरात लवकर भारत सोडून जाण्यासाठी ठोस चळवळीची गरज भासत होती.

५. **क्रिप्स कमिशनचे अपयश** : भारताच्या स्वराज्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ब्रिटिश सरकारने भारतात क्रिप्स मिशन पाठविले पण भारताच्या प्रश्नावर समाधानकारक तोडगा काढण्यात क्रिप्स कमिशनला अपयश आले. या अपयशाचे खापर क्रिप्सनी काँग्रेसवर फोडले. त्यामुळे काँग्रेसचे नेते संतप्त झाले. चळवळीशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही याची खात्री झाली.

६. **सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद सेनेचा प्रभाव** : काँग्रेसमधून बाहेर पडून सुभाषचंद्र बोस यांनी 'फॉरवर्ड ब्लाक' या पक्षाची स्थापना केली व ब्रिटिशांच्या विरोधात चळवळ उभी केली. त्यांची आक्रमक वृत्ती सरकारला माहीत होती. त्यामुळे त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले. परंतु नजरकैदेतून यशस्वी पलायन करून रशिया, जर्मनीमार्गे ते जपानला पोहोचले. जपानमध्ये त्यांच्याकडे रासबिहारी बोस यांनी स्थापन केलेल्या आझाद हिंद फौजेचे नेतृत्व आले. जपानच्या मदतीने त्यांनी भारतावर आक्रमण करण्याची तयारी केली व अंदमान, निकोबार बेटे जिंकून घेतली. भारतात त्यांची लोकप्रियता वाढू लागली. परिणामी त्यांची वाढती लोकप्रियता रोखण्यासाठी काँग्रेसला चळवळीची गरज वाटू लागली.

### (क) 'चले जाव'चा ८ ऑगस्टचा ठराव

काँग्रेस कार्यकारिणीने वर्ध्याच्या बैठकीत संभाव्य राष्ट्रीय आंदोलनाचे सर्व अधिकार गांधीजींना दिले. त्यांचा 'छोडो भारत' चा प्रस्ताव १४ जुलै, १९४२ रोजी पारित केला. ब्रिटिशांनी भारताच्या स्वातंत्र्यास तात्काळ मान्यता द्यावी. भारतात ब्रिटिशांची राजवट चालू राहणे भारताच्या हिताचे नाही. संयुक्त राष्ट्र संघटनाच्या उद्दिष्टांच्या हितासाठीही ते योग्य नाही. कारण या प्रश्नावरच युद्धाचे भवितव्य व स्वातंत्र्य आणि लोकशाहीचे यश अवलंबून आहे म्हणून ब्रिटिशांनी भारत सोडून जावे अशा आशयाचा ठराव काँग्रेसने पास केला. ८ ऑगस्ट, १९४२ च्या मुंबईतील काँग्रेस अधिवेशनात हा ठराव स्वीकारला गेला. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टँक मैदानात भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात 'छोडो भारत'चा ऐतिहासिक ठराव प्रचंड बहुमताने संमत झाला. त्यावेळी प्रचंड जनसमुदायासमोर गांधीजीनी सांगितले ''मी स्वातंत्र्यासाठी आता अधिक काळ वाट पाहू शकत नाही. मी आणखी वेळ घालवला तर मला जगाचा अंत होईपर्यंत थांबावे लागेल. त्यासाठी मी संघर्ष करण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्या जीवनातील हा शेवटचा संघर्ष असेल. आम्ही आता अधिक काळ ब्रिटिशांच्या गुलामगिरीत राहू शकत नाही, त्यासाठी सर्व शक्तीनिशी सरकारशी लढा द्या. गांधीजींनी जनतेला 'करा' अथवा 'मरा' (Do or Die) हा संदेश दिला व 'ब्रिटिशांनो तात्काळ भारत सोडून निघून जा' अशी घोषणा केली.

### (ड) 'चले जाव' चळवळीस प्रारंभ

८ ऑगस्ट रोजी गांधीजीनी 'चले जाव'ची घोषणा केली व ९ ऑगस्ट पासून आंदोलनास सुरुवात होणार होती. पण ८ ऑगस्टच्या रात्रीच सरकारने म. गांधींसह काँग्रेसच्या महत्त्वाच्या नेत्यांना अटक केली व अनेक तुरुंगात त्यांना कैद केले. काँग्रेसला बेकायदेशीर घोषित करून काँग्रेसची बँकेतील खाती गोठविण्यात आली. काँग्रेसशी संलग्न संघटनांवरही बंदी घालण्यात आली.

काँग्रेसच्या नेत्यांना तुरुंगात टाकल्यानंतर चळवळ थंडावेल असे सरकारला वाटत होते. पण सरकारचा अंदाज चुकला. कारण जनतेनेच नेत्यांच्या मार्गदर्शनाशिवाय उत्स्फूर्तपणे ज्याना जसे सुचेल, जमेल व झेपेल असा मार्ग स्वीकारून ह्या चळवळीस प्रारंभ केला. जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, सुचेला कृपलानी इ. अनेक दुय्यम नेत्यांनी भूमीगत राहून लढा चालू ठेवला. अनेक ठिकाणी खेड्यापाड्यात जनतेने उघडपणे चळवळी सुरू केल्या. पोलीस ठाणे, रेल्वे, सरकारी कार्यालये, पोस्ट ऑफीसे इ. वर लोकांनी हल्ले चढविले. अनेक पोलीस ठाणी, पोस्ट कार्यालये पेटविण्यात आली. अनेक ठिकाणी तारायंत्रे तोडण्यात आली. सरकारी मालमत्तेचे नुकसान करण्यात आले. दळणवळण, रेल्वेरूळ बंद करण्यात आले. महाराष्ट्रात सातारा जिलह्यात क्रांतसिंह नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली अपूर्व असा लढा उभारला गेला. त्यांनी सातारा जिल्ह्यात प्रतिन्यायव्यवस्था व प्रतिसरकार स्थापन केले. देशात मिदनापूर (बंगाल) उत्तरप्रदेशातील बालिया, बिहारमध्ये भागलपूर येथेही प्रतिसरकारने स्थापन झाली.

या काळात देशात हजारो ठिकाणी तारायंत्रे तोडण्यात आली. खेड्यापाड्यात या आंदोलनाचे पडसाद उमटले. देशात अनेक ठिकाणी हिंसात्मक आंदोलने झाली. तरुण विद्यार्थी, कामगार, महिला या सर्व वर्गांनी या लढ्यात भाग घेतला. कामगारांनी संप पुकारले. अनेक ठिकाणी प्रभात फेऱ्या, मोर्चे निघाले. महाराष्ट्रात मुंबई येथे क्रांतिकारकाना मार्गदर्शन करण्यासाठी गुप्त रेडिओ सुरू करण्यात आला. मुंबई, पुणे, सातारा, अहमदनगर, सोलापूर, नाशिक येथेही चळवळ मोठ्या प्रमाणात झाले. चले जाव आंदोलन देशव्यापी होते. अनेक ठिकाणी हिंसा घडून आली.

### (इ) सरकारची दडपशाही

८ ऑगस्टच्या काँग्रेस अधिवेशनाचा उत्साह पाहून सरकारने काँग्रेसच्या नेत्यांना अटक केली. सुरुवातीला अहिंसात्मक मार्गाने चाललेल्या या आंदोलनावर सरकारने दडपशाही चालविली. त्यामुळे अनेक ठिकाणी हिंसक आंदोलने झाली. सरकारने पाशवी बळाचा वापर करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला. अनेक ठिकाणी लाठीमार, गोळीबार व सामूहिक दंड, फटक्यांच्या शिक्षा देण्यात आल्या. पोलीस व लष्कराने निशस्त्र लोकांवर अत्याचार केले. स्त्रियांची विटंबना केली. या आंदोलनात सुमारे १०,००० लोक ठार झाले. ६०,००० हून अधिकांना अटक झाली. त्यातील २६,००० लोकांना कठोर शिक्षा झाल्या. १८ हजाराहून अधिकांना स्थानबद्ध करण्यात आले.

पाटणा, नाडिया, बंगलोर इ. ठिकाणी बॉम्ब हल्ले झाले. ६० ठिकाणी लष्कराला पाचारण करण्यात आले. सरकारच्या दडपशाहीचा निषेध म्हणून अनेक भारतीयांनी आपल्या सन्मानदर्शक पदव्यांचा त्याग केला. १९४२ च्या अखेरपर्यंत चळवळ जोमात सुरू होती. परंतु सरकारच्या दडपशाहीमुळे पूढे चळवळीचा जोर ओसरला. त्यातच व्हाईसरॉय लॉर्ड व्हेव्हेलच्या जागी लॉर्ड लिनलिथगो आल्यामुळे भारताच्या राजकीय परिस्थितीत बदल झाला व ही चळवळ थंडावली.

**(ई) चळवळीचे मूल्यमापन**

या चळवळीला आधुनिक भारताच्या इतिहासात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कोणतेही पूर्वनियोजन नसताना मोठ्या नेत्यांच्या अभावी जनतेचा उत्स्फूर्त सहभाग, त्यांची निष्ठा महत्त्वाची होती. लोकांनी स्वतःहून जसी रुचेल, पटेल तशी चळवळ चालविली. सर्वसामान्य लोकांचा, विद्यार्थी, कामगार, तरुण, स्त्रिया यांचा सहभाग लक्षणीय होता. त्यामुळे ही चळवळ म्हणजे मोठे जन आंदोलन होते. तथापी सरकारची दडपशाही, गोळीबार, वाढती महागाई, उपासमार, सरकारी नोकरांनी सरकारवर दाखविलेली निष्टा यामुळे चळवळीला मोठ्या प्रमाणात यश मिळू शकले नाही.

या चळवळीने देशाला स्वातंत्र्य मिळाले नसले तरी ही चळवळ म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अखेरचा टप्पा होता. अनेक ठिकाणी या चळवळीने सरकारी यंत्रणा खिळखिळी केली. जनतेचा आत्मविश्वास वाढला. लोकांनी निर्भयपणे सरकारी अत्याचाराला तोंड दिले. तुरुंगवासाची भीती उरली नाही. त्यामुळे ब्रिटिशांनाही आपल्या सत्तेचा शेवट आल्याची जाणीव झाली. शिवाय चीन, अमेरिकेने भारताला स्वातंत्र्य देण्यासाठी ब्रिटनवर दडपण आणले.

एकंदरीतच 'चले जाव' चळवळीने भारतीय स्वातंत्र्याचा पाया भक्कम केला. आधुनिक भारताच्या इतिहासात ही चळवळ अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यामुळेच जगातल्या अनेक राज्यक्रांत्याप्रमाणे 'चले जाव' चळवळीला एक महत्त्वाची 'ऑगस्ट क्रांती' मानली जाते.

## स्वयं अध्ययन प्रश्न ४

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. दुसरे जागतिक महायुद्ध ............. साली सुरू झाले.

(अ) १९३९ (ब) १९४० (क) १९३८ (ड) १९४२

२. वर्ध्याच्या कॉंग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत संभाव्य १९४२ च्या आंदोलनाचे सर्वाधिकार ............. यांचेकडे सोपविले.

(अ) पं. नेहरू (ब) म. गांधी (क) लो. टिळक (ड) पं. मदनमोहन मालवीय

३. ८ ऑगस्ट, १९४२ रोजी ............. येथे कॉंग्रेसचे अधिवेशन भरले

(अ) दिल्ली (ब) मद्रास (क) मुंबई (ड) कलकत्ता

४. ८ ऑगस्ट च्या अधिवेशनात गांधीजीनी जनतेला ............ संदेश दिला.

(अ) चलेजाव (ब) छोडो भारत

(क) स्वराज्य (ड) करा अथवा मरा (Do or Die)

५. महाराष्ट्रात ............ येथे प्रतिसरकारची स्थापना करण्यात आली.

(अ) सातारा (ब) कोल्हापूर (क) पुणे (ड) नागपूर

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. 'चले जाव' चळवळ भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील कोणते पर्व होते ?

२. ब्रिटिशांनी भारतीय नेत्यांना न विचारताच भारतास कोणत्या युद्धात गोवले ?

३. दुसऱ्या महायुद्धात जपान कोणाच्या बाजूने लढत होता ?

४. सुभाषचंद्र बोस यांनी कोणत्या पक्षाची स्थापना केली ?

५. रास बिहारी बोस यांनी कोणत्या फौजेची स्थापना केली ?

## ३.३ पारिभाषिक शब्द : शब्दार्थ

**१. हिंद स्वराज्य** : धर्म, प्रदेशवाचक शब्द नव्हे तर स्वतःवर स्वतः राज्य करणे

**२. सभ्यता** : संस्कृती, जीवनशैली

**३. ग्रामराज्य** : खेड्यांचे ग्रामशासन

**४. सत्याग्रह** : सत्याचा आग्रह, अन्यायाविरोधी विरोधी पक्षाचे आत्मक्लेशाने परिवर्तन करणे

**५. अहिंसा** : कोणत्याही प्राणिमात्राला, वस्तूला विचार, शब्द व कृतीने होणारी दुखापत टाळणे

**६. निशस्त्र प्रतिकार** : शस्त्राशिवाय शांततेच्या मार्गाने करावयाचा विरोध

**७. संपूर्ण जबाबदार शासनपद्धती** : या पद्धतीत मंत्रिमंडळ आपल्या कारभाराबाबत कायदेमंडळास जबाबदार असते व कायदेमंडळाचा विश्वास असेपर्यंत ते सत्तेवर राहू शकते.

**८. विभक्त मतदार संघ** : विशिष्ट जाती-धर्मासाठी राखून ठेवलेला मतदार संघ. अशा मतदार संघात विशिष्ट जातीधर्माच्या मतदारानाच मतदान करता येते व त्यानाच फक्त उमेदवार म्हणून निवडणूक लढवता येते.

## ३.४ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

### स्वयंअध्ययन प्रश्न १

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. इंडियन ओपिनियन

२. स्वराज्य म्हणजे स्वतःवरचे राज्य

३. म. गांधी

४. लॉर्ड कर्झन

५. म. गांधीजीनी

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. अ – १९०८ साली

२. ब – सुटका

३. क – रस्किन

४. ड – गाय

५. अ – ग्रामराज्य

### स्वयंअध्ययन प्रश्न २

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. महात्मा गांधी

२. ‘सर’

३. दिल्ली

४. लो. टिळक

५. १ कोटी

६. जर्मनी

७. स्वराज्य

८. सुभाषचंद्र बोस

९. गोरखपूर

१०. स्वराज्य

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. हंटर कमिशन

२. रौलट कायदा

३. अमृतसर

४. खलिफा

५. अलि बंधू

६. १९१९

७. म. गांधी

८. दागदागिने

९. कैसर–ए–हिंद

१०. प्रिन्स ऑफ वेल्स

**स्वयंअध्ययन प्रश्न ३**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. १२ मार्च १९३०

२. मिठाचा

३. खुदा-ई-खिदमतगार

४. सोलापूर

५. करबंदी

६. १९३१

७. लॉर्ड विलिंग्डन

८. १६ ऑगस्ट, १९३२

९. म. गांधी

१०. पाटणा

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. काँग्रेस पक्षात

२. लाहोर

३. साबरमती आश्रम

४. रत्नागिरी

५. सरहद्द गांधी

६. मार्शल लॉ

७. बाबू गेणू

८. बिळाशी

९. लंडन

१०. रॅम्से मॅकडोनाल्ड

**स्वयंअध्ययन प्रश्न ४**

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. १९३९

२. म. गांधी

३. मुंबई

४. करा अथवा मरा (Do or Die)

५. सातारा

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. अंतिम पर्व

२. दुसऱ्या महायुद्धात

३. जर्मनीच्या

४. फॉरवर्ड ब्लॉक

५. आझाद हिंद फौज

## ३.५ सारांश

भारतीय राजकारणात महात्मा गांधीजींचा झालेला उदय ही एक महत्त्वाची घटना होती. त्यांचे असामान्य नेतृत्व आणि हिंद-स्वराज्याचे तत्त्वज्ञान, त्यांनी स्वातंत्र्य लढ्यासाठी अवलंबिलेले अभिनव मार्ग यामुळे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे स्वरूप बदलून गेले व तिला लोकलढ्याचे, जन आंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. सर्वसामान्य भारतीयांच्यात राजकीय जागृती होऊन ब्रिटिशविरोधी असंतोष वाढीस लागला. कमीत कमी धोक्याचा पण जास्ती जास्त लोकांना सहभागी होता येईल असा शांततामय सत्याग्रहाचा मार्ग त्यांनी जनतेला दिला. त्यामुळे जनता निर्भय झाली. समाजातील सर्वच घटक उदा. शेतकरी, कामगार, स्त्रिया, विद्यार्थी, सुशिक्षितांचा पाठिंबा त्यांच्या लोकलढ्याला मिळाला. गांधीजीनी पाश्चात्य साम्राज्यवादी, भोगवादी सभ्यता नाकारून हिंद स्वराज्याच्या माध्यमातून एका नव्या नैसर्गिक सभ्यतेचा पुरस्कार केला. सरकारने दडपशाहीचा, वचनभंगाचा मार्ग अवलंबिल्यामुळे, जालियनवाला बाग हत्याकांड, काँग्रेस-खिलाफत चळवळ घटना घडल्या. म. गांधीजीनी ब्रिटिश विरोधासाठी हिंदू-मुस्लीम भावनांचा कौशल्याने वापर करून घेतला. त्यातूनच पुढे असहकार, सविनय कायदेभंग, चलेजाव सारखी जन आंदोलने सुरू केली. या सर्व आंदोलनातून भारतीयांच्यात राजकीय जागृती मोठ्या प्रमाणात घडून आली. त्यांच्या अहिंसात्मक तत्त्वज्ञानामुळे, सत्याग्रहामुळे जनता निर्भय बनली व भारतीय स्वातंत्र्याची पार्श्वभूमी तयार झाली.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) दीर्घोत्तरी प्रश

१. महात्मा गांधीजींच्या हिंद-स्वराज्याच्या तत्त्वज्ञानाचे मूल्यमापन करा.

२. महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीचे विवेचन करा.

३. सविनय कायदेभंग चळवळीची कारणे व स्वरूप स्पष्ट करा.

### (ब) टीपा लिहा.

१. हिंद-स्वराज्य म्हणजे काय ?

२. स्वराज्य गांधीजींची आदर्श राज्यपद्धती

३. जालियनवाला बाग हत्याकांड

४. काँग्रेस-खिलाफत चळवळ

५. दांडी यात्रा

६. चले जाव चळवळ / भारत छोडो आंदोलन

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


- महात्मा गांधी : हिंद स्वराज्य
- पांढरीपाडे सु. श्री. : महात्मा गांधींचे हिंद-स्वराज्य आणि नवे मन्वंतर
- गोखले द. न. : गांधीजी - मानव नि महामानव
- डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण : आधुनिक भारतातील राजकीय विचार
- बिपन चंद्र : मॉडर्न इंडिया
- सरकार सुमित : मॉडर्न इंडिया
- केतकर कुमार : कथा स्वातंत्र्याची
- दिक्षित नी. सी., भोसले अरुण : आधुनिक भारताचा इतिहास - राष्ट्रीय चळवळ
- डॉ. बी. एन. सरदेसाई, डॉ. विजय नलावडे : आधुनिक भारताचा इतिहास
- पाटील अ. आ., गायकवाड रा. ज्ञा.: आधुनिक भारत.

## घटक – ४

# स्वातंत्र्य चळवळीतील इतर प्रवाह

## (अ) क्रांतिकारी चळवळी : बंगाल, महाराष्ट्र व पंजाब
## (ब) किसान सभा चळवळ
## (क) डाव्या चळवळी
## (ड) नेताजी सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेना


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ क्रांतिकारी चळवळ – बंगाल, महाराष्ट्र, पंजाब

 ४.२.२ किसान सभा आंदोलन

 ४.२.३ डाव्या चळवळ

 ४.२.४ सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद फौज

४.३ स्वयं अध्ययन प्रश्न

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ पारिभाषिक शब्द

४.६ सारांश

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ संदर्भग्रंथ सूची


### ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

- भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील इतर प्रवाहाची माहिती मिळेल.

- भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिकारी चळवळीचे योगदानाची माहिती मिळेल.
- भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील किसान चळवळीच्या कार्याची माहिती मिळेल.
- भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील डाव्या चळवळीच्या भूमिकेची माहिती मिळेल.
- भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेना यांचे कार्य स्पष्ट होईल.

## ४.१ प्रस्तावना

भारतीय राष्ट्रीय चळवळ ही एक व्यापक अशी लोकचळवळ होती. या चळवळीमध्ये विभिन्न राजकीय विचारप्रणालीचे प्रवाह सामावलेले होते. प्रत्येक विचारप्रवाह आपल्याच विचारप्रणालीचे वर्चस्व कसे राहील यासाठी प्रयत्नशील होता. तरीही विविध प्रवाह असले तरी सर्वांचे लक्ष्य एकच होते ते म्हणजे भारत भूमीला पारतंत्र्यातून मुक्त करणे. फक्त त्यांची विचारधारा आणि स्वातंत्र्यप्राप्तीचे मार्ग वेगळे होते. या आपल्या उदात्त ध्येयप्राप्तीसाठी सर्वजण एकत्र येत असत. थोडक्यात या स्वातंत्र्य चळवळीत विविध विचारप्रवाह असले तरी ती एक सर्वसमावेशक चळवळ होती. तसेच या चळवळीला व्यापक आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनही होता. तिचा दृष्टीकोन संकुचित नव्हता.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ क्रांतिकारी चळवळ : बंगाल, महाराष्ट्र, पंजाब

**प्रस्तावना**

भारताला स्वातंत्र्य प्राप्तीसाठी राष्ट्रीय सभा आणि त्यांनी केलेल्या चळवळी यांचे जेवढे योगदान महत्त्वपूर्ण आहे. क्रांतिकारी चळवळ हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. लॉर्ड कर्झनने १९०५ मध्ये बंगालच्या फाळणीची घोषणा केली. परिणामी उग्र राष्ट्रवादाचा उदय होऊन त्याने क्रांतिकारी चळवळींना जन्म दिला.

क्रांतिकारी चळवळीचा अध्ययनाच्या दृष्टीकोनातून तीन टप्प्यात विभागणी केली जाते.

**(अ) प्रथम कालखंड (१९०६–१९१९)**

या कालखंडात क्रांतिकारी चळवळी बंगाल प्रांतामध्ये आघाडीवर होत्या. या काळातील वीरेंद्रकुमार घोष, भूपेंद्रनाथ दत्त, सावरकर बंधू (वि. दा. सावरकर व गणेश सावरकर) लाला हरदयाळ, मॅडम कामा आणि मदनलाल धिंग्रा इ. प्रमुख क्रांतिकारक होते.

**(ब) द्वितीय कालखंड (१९१९–१९३९)**

या काळात क्रांतिकारकांनी म. गांधीनी असहकार आंदोलन सुरू केल्यावर या आंदोलनात सहभाग घेतला. परंतु असहकार आंदोलन मागे घेताच क्रांतकिारकांनी पुन्हा आपला मार्ग स्वीकारला. या काळात काकोरी केस, सरदार भगतसिंह, चंद्रशेखर आझाद, राजगुरू, सूर्यसेन आणि चितगांव विद्रोह यासारखे महत्त्वपूर्ण क्रांतिकारकांचे कार्य ब्रिटीश सत्तेविरुद्ध लढत होते.

**(क) तृतीय कालखंड (१९३९–१९४६)**

या कालखंडामध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद फौज यांच्या कार्याचा समावेश होतो.

भारतीय क्रांतकिारकांच्या वळवळीची व्याप्ती भारतात आणि भारताबाहेर होती. भारतात सर्वच प्रांतात क्रांतिकारी चळवळ सुरू होती. परंतु बंगाल, महाराष्ट्र आणि पंजाब या प्रांतात क्रांतिकारी चळवळीचा जोर फार मोठा होता. बंगाल, महाराष्ट्र व पंजाब या प्रांतातील क्रांतिकारी चळवळी पुढीलप्रमाणे :

**१. बंगाल : क्रांतिकारकांची जन्मभूमी**

बंगालची भूमी ही क्रांतिकारी दहशतवादाची जननी आहे. १९०५ च्या बंगालच्या फाळणीनंतर बंगालमध्ये क्रांतिकारी दहशतवादी घटनांची मालिकाच सुरू झाली. अरविंद घोष, वीरेंद्रकुमार घोष, भूपेंद्रनाथ दत्त, खुदीराम बोस, रासबिहारी बोस, सूर्यसेन इत्यादींनी बंगालमधील क्रांतिकारी चळवळीचे नेतृत्व केले. त्यांनी 'युगांतर, 'संध्या', 'वंदे मातरम', 'न्यू इंडिया' इ. वर्तमानपत्रांच्या माध्यमातून सरकारवर टीका केली. त्यांनी अनेक गुप्त संघटना स्थापना केल्या. त्यामार्फत आपल्या सशस्त्र क्रांतीचा लढा सुरू ठेवला. या क्रांतिकारकांचे कार्य पुढीलप्रमाणे :

* **युगांतर समिती : १९०६**

अरविंद घोष, भूपेंद्रनाथ दत्त, अश्विनी दत्त यांनी १९०६ मध्ये 'युगांतर' समितीची स्थापना केली. वीरेंद्रकुमार घोष आणि भूपेंद्रनाथ दत्त यांनी सशस्त्र क्रांतीचा प्रचार करण्यासाठी 'युगांतर' हे वर्तमानपत्र सुरू केले. त्यांच्या समोर रशियातील क्रांतिकारकांचा आदर्श होता.

* **अनुशील समिती :**

अनुशील समिती ही बंगालमधील पहिली क्रांतिकारी संस्था होती. बंगालमध्ये ही संस्था अतिशय लोकप्रिय होती. फक्त एका ढाका या शहरात या संघटनेच्या ५०० शाखा उघडण्यात आल्या होत्या.

**उद्दिष्टे** : १. तरुणांमध्ये स्वातंत्र्यप्रेम निर्माण करून त्यांना संघटित करणे.

२. तरुणांना शस्त्रास्त्र वापर करण्याचे प्रशिक्षण देणे.

३. जुलमी ब्रिटीश अधिकाऱ्यांचे खून करणे.

पुढे क्रांतीच्या मार्गावरून क्रांतिकारकांमध्ये मतभेद होऊन पुलीनदास यांचा एक गट, पी मित्रा यांचा एक स्वतंत्र गट आणि रासबिहारी बोस यांचा एक गट असे तीन गट निर्माण झाले. परिणामी संघटनेची ताकद कमी झाली.

**खुदीराम बोस व प्रफुल्लकुमार चाकी :**

कलकत्त्याचा मॅजिस्ट्रेट (न्यायाधीश) किंग्जफोर्ड यांच्या हत्येचा प्रयत्न खुदीराम बोस यांनी केला. ३० एप्रिल, १९०८ रोजी किंग्जफोर्डच्या बंगल्यामधून गाडी येत असताना ती गाडी किंग्जफोर्डची समजून त्या गाडीवर बॉम्ब फेकण्यात आला. परंतु त्या गाडीमध्ये किंग्जफोर्ड ऐवजी दोन इंग्रज स्त्रिया ठार झाल्या. प्रफुल्लकुमार यानी स्वतःवर गोळ्या झाडून आत्महत्त्या केली तर खुदीराम बोस या १५ वर्षाच्या युवकाला फाशी देण्यात आली.

**मास्तरदां सूर्यसेन**

सूर्यसेन चितगावमधील एका शाळेत मास्तर होते. त्यामुळे 'मास्तरदां' या नावानेच ते विशेष प्रसिद्ध होते. क्रांतिकारी कारवायांसाठी त्यांना अटक करून १९२६-२८ या दोन वर्षांसाठी तुरुंगात ठेवण्यात आले होते. त्यानंतरही ते काँग्रेसचे कार्य करीत राहिले. १९२९ मध्ये सूर्यसेन चितगाव जिल्हा काँग्रेस समितीचे बनले.

**क्रांतिकारी सरकारची स्थापना**

सूर्यसेन यांनी चितगावच्या सरकारी शस्त्रागारावर हल्ला करून तो ताब्यात घेण्याची योजना आखली. या योजनेत अजय घोष, तारकेश्वर दस्तिदार इत्यादी ६५ क्रांतिकारकांनी भाग घेऊन १८ एप्रिल, १९३० रोजी चितगाव शस्त्रागारावर हल्ला करून तेथील शस्त्रे ताब्यात घेतली. यावेळी सूर्यसेन यांनी 'क्रांतिकारी सरकार' स्थापन झाल्याची घोषणा केली.

**चितगाव कट खटला :**

चितगाव कटातील क्रांतिकारकांची सरकारने धरपकड करून त्यांच्यावर खटले दाखल केले आणि हेच खटले 'चितगाव कट खटला' म्हणून प्रसिद्ध आहे. १६ फेब्रुवारी १९३३ रोजी सेन यांना अटक करण्यात आली. १२ जानेवारी, १९३४ रोजी त्यांना फाशी देण्यात आली.

**स्त्रियांचा सहभाग :**

बंगालमधील क्रांतिकारी चळवळीमध्ये महिलांचाही सहभाग होता. महिलांचा सहभाग हे बंगालमधील क्रांतिकारी चळवळीचे उल्लेखनीय वैशिष्ट्ये होते.

**कल्पना दत्त : १९१३-१९७८**

बंगालमधील प्रसिद्ध क्रांतकिारी महिला कल्पना जोशी (दत्त) 'चितगांव रिपब्लिक आर्मी' मध्ये सहभागी होत्या. एवढेच नव्हे तर त्या शस्त्रागारावर हल्ला करण्याच्या वेळी आघाडीवर होत्या. ब्रिटीश सरकारने त्यांना पकडून काळ्या पाण्याची शिक्षा करून अंदमान-निकोबार बेटावर पाठवण्यात आले होते. १९३६ मध्ये त्यांना सोडण्यात आल्यावर कम्युनिस्ट पार्टीच्या त्या सक्रीय सदस्या बनल्या.

शांती घोष, सुनीती चौधरी, अंबिका चक्रवर्ती, बीना दास यासारख्या अनेक महिला क्रांतकिारी चळवळीत आघाडीवर होत्या. शांती घोष व सुनिती चौधरी यांनी कोमितलाच्या जिल्हा मॅजिस्ट्रेटची हत्या केली. बीना दासने कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात पदवी प्रमाणापत्र घेत असताना गव्हर्नररवर गोळ्या झाल्या. प्रीतिलता वड्डेदार यानी चितगावच्या रेल्वे इन्स्टिट्यूटवरील हल्ल्यात सहभाग घेतला होता. त्याप्रसंगी झालेल्या चकमकीत तिचा मृत्यू झाला.

## २. महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळ

क्रांतिकारी आंदोलन बंगालच्या अगोदर महाराष्ट्रात प्रथम सुरू झाले. श्यामजी कृष्ण वर्मा आणि सावरकर बंधू (विनायक दामोदर सावरकर आणि गणेश सावरकर) हे प्रमुख नेते होते. त्यांचे 'प्राण देण्याच्या अगोदर प्राण घ्या' असे त्यांचे मत होते. रॅण्डच्या हत्येमध्ये श्यामकृष्ण वर्मा याचा हात होता असे मानले जाते. या हत्येनंतर ते लंडनला गेला.

महाराष्ट्रात क्रांतिकारी आंदोलनाचा उदय १८९७ मध्ये २२ जून १८९७ रोजी व्हिक्टोरिया याणीच्या राज्यारोहणाच्या हीरकमहोत्सवाच्या कार्यक्रमाहून परत निघालेल्या चार्ल्स  आर्यस्ट व वॉल्टर रॅंड याच्यावर गणेश खिंडीजवळ, पुणे येथे दामोदर चाफेकर व बाळकृष्ण चाफेकर (चाफेकर बंधू) यांनी गोळ्या झाडून ठार मारले आणि महाराष्ट्रात क्रांतिकारी आंदोलनाला गती प्राप्त झाली.

### विनायक दामोदर सावरकर

विनायक दामोदर सावरकर हे क्रांतिकारी चळवळीचे मेरूमणी होते. त्यांनी १८९९ मध्ये त्र्यंबकराव म्हसकर व रावजी कृष्ण यांच्या मदतीने नासिक येथे 'राष्ट्रभक्त समूह' ही संस्था स्थापन केली. पुढे इ.स. १९०० मध्ये नाशिक येथे 'मित्र मेळा' ही संस्था स्थापन केली. या संस्थेमधून निर्भय व धाडसी राष्ट्रभक्त तरुणांची निवड करून १९०४ मध्ये नाशिक येथे 'अभिनव भारत' या सशस्त्र गुप्त क्रांतिकारी संघटनेची स्थापना केली. या संघटनेच्या मुंबई, ठाणे, पुणे, सोलापूर, नाशिक, खानदेश या प्रांतात एकूण ३९ शाखा होत्या.

पंडित श्यामजी कृष्ण वर्मा यांनी हिंदी विद्यार्थ्यांसाठी शिवाजी शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात केली. ही शिष्यवृत्ती वि. दा. सावरकर यांना मिळाली. त्यामुळे २६ मे, १९०६ रोजी सावरकर बॅरिस्टर होण्यासाठी लंडनला गेले. तेथे त्यांनी हिंदी तरुणांचे संघटन करण्यास सुरुवात केली. सेनापती पांडुरंग महादेव बापट व हेमचंद्र दास यांना बॉम्ब तयार करण्याचं प्रशिक्षण घेण्यासाठी पॅरिसला पाठविले.

### न्यायाधिश आर्थर जॅक्सनचा खून - १९०९

ब्रिटीश सरकारने १९०८ मध्ये सावरकरांच्या घराची झडती घेऊन गणेश सावरकरांना अटक करून जन्मठेपेची शिक्षा दिली. याचा सूड म्हणून अभिनव भारत संघटनेने जॅक्सनचा खून करण्याचा कट केला. अनंत लक्ष्मण कान्हेरे या १८ वर्षांच्या तरुणाने २१ डिसेंबर, १९०९ रोजी जॅक्सनचा गोळ्या झाडून खून केला.

### नाशिक खटला - १९१९

जॅक्सनच्या खुनानंतर सरकारने १९१० मध्ये ३८ क्रांतिकारकांना अटक केली. त्यापैकी अनंत कान्हेरे, विनायक देशपांडे व कृष्णाजी पंत यांना फाशी शिक्षा देण्यात आली. हा खटला नाशिक खटला म्हणून इतिहासप्रसिद्ध आहे. सरकारने जॅक्सनच्या वधाचा संबंध वि. दा. सावरकरांशी जोडून लंडन येथे त्यांना अटक केली. त्यांना लंडनहून मोदिया बोटीने भारतात आणताना बोट फ्रान्समध्ये मार्सेलिस बंदराजवळ थांबली असता बोटीमधून उडी मारून

सुटकेचा अयशस्वी प्रयत्न त्यांनी केला. त्यांना नाशिक येथे आणून ५० वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा देण्यात आली व त्यांना अंदमानला पाठविण्यात आले.

**सेनापती बापट : १८८०–१९६७**

सेनापती बापटांचे पूर्ण नाव पांडुरंग महादेव बापट असून गांधीयुगात ते 'सेनापती' म्हणून ओळखले जाऊ लागले. ते अभिनव भारतचे सदस्य होते. परदेशात जाऊन बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्नही त्यांनी केला होता. माणिक तोळा प्रकरणातील ते एक आरोपी होते. पुढे ते क्रांतिकारी कार्यापासून फारकत घेऊन कामगार वर्गाच्या प्रश्नांकडे वळले. त्यांनी मुंबईमध्ये 'झाडू कामगार मित्र मंडळ' स्थापन करून मुंबईत कामगारांचे संप घडवून आणले.

**विष्णू गणेश पिंगळे :**

मेकॅनिकल इंजिनियरचे शिक्षण घेण्यासाठी १९११ मध्ये अमेरिकेला गेल्यानंतर त्यांचा संबंध लाला हरदयाळ यांच्याशी आल्याने ते सशस्त्र क्रांतिकडे वळले. पुणे जिल्ह्यातील गदर पक्षाचे ते प्रमुख कार्यकर्ते होते. त्यांनी हिंदी सैनिकी छावणीत उठाव करण्याची योजना आखली. पण ती यशस्वी होऊ शकली नाही. सरकारने त्यांना १९१५ मध्ये पकडले. रौलेट अहवालानुसार लाहोर कटात त्यांचा सहभाग होता. त्यांच्यावर लाहोर कटाचा खटला चालवून १५ नोव्हेंबर, १९१५ रोजी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आली.

**शिवराम हरी राजगुरू : १९०८–१९३१**

चंद्रशेख आझाद, सरदार भगतसिंग, सुखदेव, जयगोपाल यांच्या सहवासात आल्याने ते क्रांतिकार्याकडे वळले. १९२८ मध्ये भारतात सायमन कमिशन आल्यावर त्याच्या निषेधार्थ लाहोर येथे लाला लजपतराय यांनी मोर्चा काढला होता. या मोर्चावर सँडर्स इंग्रज अधिकाऱ्याने लाठीहल्ला केल्याने लाला लजपतराय यांचा मृत्यू झाला. १७ फेब्रुवारी, १९२८ रोजी चंद्रशेखर आझाद, शिवराम, राजगुरू व सरदार भगतसिंग यांनी सँडर्सला गोळ्या झाडून ठार मारले. सरकारने राजगुरूला पकडून २३ मार्च, १९३१ रोजी फासावर लटकावले.

## ३. पंजाबमधील क्रांतिकारी चळवळ

सुरुवातीला महाराष्ट्र आणि बंगाल सारख्या क्रांतिकारी गुप्त संघटना पंजाबमध्ये अस्तित्वात नव्हत्या. परंतु सरकारच्या महसुलविषयक धोरणामुळे पंजाबमधील जनतेमध्ये असंतोष निर्माण होऊन क्रांतिकारी चळवळीचा उदय झाला. १९०७ मध्ये सरदार अजितसिंह, भाई परमानंद आणि लाला हरदयाल यांनी पंजाबमधील क्रांतिकारकांचे संगठन केले. सरदार अजितसिंह आणि सुफी अंबाप्रसाद यांनी 'भारतमाता सोसायटी' या संघटनेची स्थापना केली. या काळात पंजाबमधील होणाऱ्या प्रत्येक सभेमध्ये बाँकेदयालजी ''पगडी संभाल ओ जट्टा, पगडी संभाल ओ'' हे गीत म्हणत असे. बंगालमध्ये वंदे मातरम हे गीत जेवढे लोकप्रिय बनले तेवढेच लोकप्रिय हे गीत पंजाबमध्ये बनले.

### कुका आंदोलन

पंजाबमधील ब्रिटीश सरकारला आव्हान देण्यासाठी गुरू रामसिंग यांनी नामधारी शीख चळवळ / कुका चळवळ सुरू केली. स्वदेशी, पंचायतराज, स्वदेशी न्यायव्यवस्था याआधारे रामसिंग यांनी जणू प्रतिसरकारच निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी आपली स्वतंत्र कारभार यंत्रणा निर्माण केली. ब्रिटिशांनी ही चळवळ दडपून टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रांचा वापर केला. अनेक आंदोलकांना पकडून तोफेच्या तोंडी दिले. गुरू रामसिंगना पकडून ब्रह्मदेशात तुरुंगात टाकले. तेथेच त्यांचा १८८५ मध्ये मृत्यू झाला.

### लॉर्ड हार्डिंग्जवर हल्ला : १९१३ (दिल्ली गुप्त कट)

ब्रिटिश सरकारला धडा शिकवण्यासाठी २३ डिसेंबर, १९१३ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिग्जवर दिल्ली शहरात प्रवेश करीत असताना त्याच्यावर बॉम्ब टाकण्यात आला. सरकारने चौकशी करून मास्टर अमीरचंद, अवधबिहारी, वसंतकुमार विश्‍वास व बालमुकुंद यांना फाशीची शिक्षा दिली व तर लाला हरदयाळ व रासबिहारी बोस यांनाही या कटात गोवले गेले. बोस सरकारच्या हातावर तुरी देऊन निसटले.

### काकोरी केस

१९२० मध्ये तुरुंगातून सुटल्यावर सचीन्द्र संन्यालनी क्रांतिकारकांना संघटीत करून 'हिंदुस्थान प्रजातांत्रिक संघ' स्थापन केला. त्यांनी देशात सशस्त्र क्रांती घडवून आणण्याची योजना आखली. त्यासाठी त्यांना पैसा लागणार होता. तेव्हा त्यांनी रेल्वे लखनऊ जवळील काकोरी येथे थांबेल तेव्हा गाडीमधील खजिना लुटण्याची योजना आखली. ९ ऑगस्ट, १९२५ रोजी काकोरी येथे रेल्वे थांबवून खजिना लुटला. पोलीस आणि गुप्तचर विभागाने दिवस-रात्र एक करून ४० व्यक्तींना कैद केले. आणि त्यांच्यावर खटला भरला. ही केस 'काकोरी षडयंत्र केस' म्हणून ओळखली जाते. या खटल्याचे नायक पंडित रामप्रसाद बिस्मिल होते. रामप्रसाद बिस्मिल, अशपाक उल्लाह, रोशन लाल (सिंह) व राजेंद्र लाहिरी यांना फाशीची शिक्षा देण्यात आली.

### हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन (HSRA) व चंद्रशेखर आझाद

भारतात ज्या क्रांतिकारी संघटना अस्तित्वात होत्या त्यापैकी सर्वात महत्त्वाची हि. सो. रि. असोसिएशन' ही संघटना होती. या संघटनेची स्थापना सचिंद्रनाथ संन्याल, योगेशचंद्र चटर्जी, रामप्रसाद बिस्मिल आणि चंद्रशेखर आझाद यांनी कानपूर येथे केली.

### संघटनेची उद्दिष्टे

१. सशस्त्र क्रांतिद्वारा संघराज्यात्मक प्रजासत्ताक स्थापन करणे.
(Federal Republic of United states of India)

२. क्रांतिकारी चळवळीसाठी राजकीय खून व दरोडे घालून पैसा जमा करणे.

३. असोसिएशनचे अनेक विभाग करून राजकीय कामकाज सुरू करणे.

**कार्य** : १. काकोरी दरोडा प्रकरण-१९२५

२. साँडर्सचा खून - १९२५

**३. चंद्रशेखर आझाद यांचे हौतात्म्य**

आझादांनी ९ ऑक्टोबर, १९२८ रोजी हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनचे पुनरुज्जीवन करून सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व स्वतःकडे घेतले. त्यांनी भगत सिंगाना तुरुंगातून सोडविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यांनी २३ डिसेंबर, १९२९ रोजी व्हाईसरॉय आयर्विन रेल्वेमधून दिल्लीकडे येत असताना दिल्ली रेल्वे स्टेशनजवळ रेल्वे उलथून पाडली परंतु व्हाईसरॉय त्यामधून वाचले. आझादांना पकडून देण्यासाठी १०,००० रुपयांचे बक्षीस घोषित केले. २७ फेब्रुवारी, १९३१ रोजी आझाद, यशपालसिंग आणि सुरेंद्र पांडे अलाहाबादमधील अल्फ्रेड पार्कमध्ये रशियातून शस्त्रे कशी आणून आपला लढा सुरू ठेवायचा यावर योजना आखणार होते. तेव्हा सरकारला याची आधीच कल्पना येऊन ब्रिटीश सरकार आणि चंद्रशेखर आझाद यांच्यात चकमक सुरू झाली. आपल्याकडील गोळ्या संपत आहे हे लक्षात आल्यावर त्यांनी शेवटी स्वतःवर गोळी झाडली.

**सरदार भगतसिंग आणि नौजवान सभा**

**नौजवान सभा : १९२६**

भगतसिंग, छबीलदास आणि यशपाल यांनी १९२६ मध्ये 'नौजवान सभेची' स्थापना केली.

**राजनैतिक उद्देश**

या सभेचे राजनैतिक उद्देश पुढीलप्रमाणे होते.

१. संपूर्ण भारतात मजदूर आणि किसान यांचे राज्य स्थापन करणे.

२. भारताला संघटित राष्ट्र बनविण्यासाठी युवकांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण करणे.

३. कामगार आणि शेतकरी यांनी संघटित करणे.

या सभेने आपल्या उद्देश्यप्राप्तीसाठी अनेक प्रकारच्या क्रांतिकारी कारवाया केल्या. त्यांनी 'रशिया सोबत मैत्री आठवडा व काकोरी दिवस' साजरा केला. २० ऑक्टोबर, १९२८ रोजी लाहोर येथे सायमन कमिशनच्या विरोधी मोर्चा काढला.

**सॉडर्सची हत्या**

३० ऑक्टोबर १९२८ रोजी लाहोर येथे सायमन आयोगाच्या विरोधातील मोर्चावर सॉडर्सने निर्घृण लाठी हल्ला केला. या हल्ला शेर-ए-पंजाब म्हणून ओळखले जाणारे लाला लजपतराय मरण पावले. परिणामी, १७ डिसेंबर, १९२८ रोजी भगतसिंग, चंद्रशेखर आझाद व राजगुरू यांनी लाहोर येथे सॉडर्सची हत्या केली.

### कायदेमंडळात बॉम्बस्फोट

केंद्रीय मंत्रिमंडळात 'पब्लिक सेफ्टी बिल' व 'ट्रेड डिस्प्यूट बिल' ही दोन विधेयके मंजूर करण्याची प्रक्रिया सुरू असताना भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी ८ एप्रिल, १९२९ रोजी कायदेमंडळात बॉम्ब टाकला. या प्रसंगी कायदेमंडळात टाकण्यात आलेल्या पत्रकांमध्ये 'बहिऱ्यांच्या कानावर आपली मागणी घालण्याच्या उद्देशाने' असा उल्लेख करण्यात आला होता. खरं तर भगतसिंगांना स्वतःला अटक करवून घ्यावयाची होती आणि या खटल्याचा आपल्या उद्दिष्टांच्या प्रचारासाठी वापर करावयाचा होता.

### भगतसिंग, दत्त यांच्यावर खटला

भगतसिंग, बटुकेश्वर दत्त, राजगुरू, सुखदेव यांच्यावर खटले भरण्यात आले. दररोज न्यायालयात येताना ते 'इन्कलाब जिंदाबाद', 'साम्राज्यवाद हाय हाय', 'कामगार अमर रहे' या घोषणा देत. तसेच 'सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है ।' 'मेरा रंग दे बसंती चोला' ही गीते म्हणत असत यांनी न्यायालयाचा उपयोग आपल्या विचारांच्या प्रसारासाठी एक व्यासपीठ म्हणूनच केला.

### जतीन दास यांचे उपोषण व मृत्यू :

तुरुंगातील भयानक परिस्थितीच्या विरोधात व आपल्याला एक गुन्हेगार म्हणून नव्हे तर राजकीय कैदी म्हणून वागणूक मिळावी यासाठी जतीन दास यांनी उपोषण केले. उपोषणाच्या चौसष्टाव्या दिवशी हा तरुण क्रांतिकारक मरण पावला. त्यांचा मृतदेह कोलकता येथे नेला जात असताना 'लाहोर ते कोलकता' या रेल्वे मार्गावरील प्रत्येक स्थानकावर त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी हजारो नागरिक गर्दी करत. कोलकता येथे त्यांच्या अंत्ययात्रेत सहा लाख लोक जमा झाले होते.

### भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांना हौतात्म्य

भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांना फाशीची शिक्षा फर्मावण्यात येऊन २३ मार्च, १९३१ रोजी फाशी देण्यात आली. फासावर जात असताना ते म्हणत होते –

''दिल से निकलेगी न मर कर भी वतन की उल्फत,
मेरी मिट्टी से भी खुशबू-ए-वतन आयेगी ।''

अशाप्रकारे बंगाल, महाराष्ट्र आणि पंजाब येथे क्रांतिकारी चळवळींनी भारतीय स्वातंत्र्यलढा गतिमान करण्याचा प्रयत्न केला.

### क्रांतिकारी विचारधारा

क्रांतिकारी चळवळीची विचारधारा कोणती होती ? त्यांच्या क्रांती लढ्याची उद्दिष्टे कोणती होती हे पाहणे खूप आवश्यक आहे. लेनिनची एक प्रसिद्ध वाक्य आहे – 'क्रांतिकारी तत्त्वज्ञानाशिवाय क्रांती अशक्य आहे.' भारतीय क्रांतिकारकांजवळ एक क्रांतिकारी तत्त्वज्ञान, विचारसरणी होती. सुरुवातीच्या क्रांतिकारकांकडे एक निश्चित

ध्येय, उद्दिष्ट नव्हते. परंतु पुढे १९१७ साली रशियन राज्यक्रांतीनंतर भारतीय क्रांतिकारकांना एक निश्चित ध्येय प्राप्त झाले. त्यांनी क्रांतीला एक नवा अर्थ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. भगतसिंग क्रांती म्हणजे काय ? हे सांगताना न्यायालयात सांगतात – रक्तरंजित संघर्ष म्हणजे क्रांती नव्हे; क्रांतीमध्ये व्यक्तिगत सुडाला वाव असत नाही.' बॉम्ब आणि पिस्तुलावर भरवसा ठेवून वाटचाल करणे म्हणजे क्रांती नव्हे. उघड आणि प्रच्छन्न अन्यायावर आधारित असलेली प्रचलित व्यवस्था बदलणे म्हणजे क्रांती'' असा त्यांनी क्रांतीला मार्क्सवादी अर्थ लावला. पुढे तुरुंगातून पाठविलेल्या एका पत्रात ते लिहितात, 'फक्त परकियांच्या जोखडातूनच नव्हे, तर जमीनदार व भांडवलदार यांच्या जोखडातूनही शेतकऱ्यांनी आपली सुटका करून घेतली पाहिजे.'' थोडक्यात या क्रांतिकारकांना देशाची फक्त पारतंत्र्यातून मुक्तता करावयाची नव्हती तर त्यासोबत त्यांना जमीनदार–भांडवलदार यांच्यापासून मुक्त देश हवा होता. त्यांना अशी एक व्यवस्था निर्माण करावयाची होती ज्या व्यवस्थेत अन्याय अत्याचाराला स्थान असणार नाही.

क्रांतिकारी चळवळ हे कट्टर राष्ट्रवादाचे एक उपांग होते. क्रांतिकारी चळवळीचा उदय भारताला स्वातंत्र्य–प्राप्तीसाठी झाला होता परंतु पुढे भारताला स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच भारतात समाजवादी क्रांती घडवून आणणे ही विचारसरणी क्रांतिकारकांची निर्माण झाली. त्यांना स्वतंत्र भारताबरोबरच शोषणमुक्त समाजवादी समाज अभिप्रेत होता.

### ४.२.२ किसान सभा आंदोलन

वसाहतवादी अर्थव्यवस्थेचा सर्वात जास्त तडाखा शेतकऱ्यांना सोसावा लागला. वसाहतवादी अर्थव्यवस्थेने त्यांचे शोषण मोठ्या प्रमाणावर केले. ब्रिटिशांच्या या अन्यायी, अत्याचारी व्यवस्थेविरोधी शेतकऱ्यांनी उठाव केले. दुर्दैवाने शेतकऱ्यांनी केलेल्या उठावांचा, प्रतिकाराचा तपशील फारसा उपलब्ध नाही. त्यांच्या उठावांकडे, चळवळीकडे इतिहासकारांनीसुद्धा पाठ फिरवली आहे. या उठावांचे पुरावे आजही सरकारी पुराभिलेखागारांमध्ये धूळ खात पडले आहेत. तसेच सरकारी कागदपत्रांमध्ये त्यांनी केलेल्या उठावाच्या नोंदी 'पुंडाई', 'डाके' अशा शब्दात केल्या आहेत. अलीकडील काळात मात्र मार्क्सवादी इतिहासकारांनी किसानांच्या असंख्य बंडाची माहिती प्रकाशझोतात आणली आहे.

#### नील विद्रोह : १८५९–६०

१८५९–६० मधील बंगालमधील नीळ कामगारांची चळवळ ही आधुनिक युगातील किसान चळवळीमध्ये एक सर्वात मोठी चळवळ मानली जाते. निळीच्या लागवडीवर युरोपियांनी मक्तेदारी होती. बंगालमधील नीळ शेतकऱ्यांची प्रमुख समस्या ही होती की, एकदा जमिनीतून नीळीचे पीक घेतले की, ती जमीन नापीक होत असे. तरीही व्यापारी विविध मार्गांचा वापर करून शेतकऱ्यांना निळ उत्पादन घेण्यास प्रवृत्त करीत. शेतकऱ्यांचे अपहरण करणे, गोदामात डांबून ठेवणे, फटके मारणे, त्यांच्या बायका–मुलांना त्रास देणे, त्यांची गुरे पळविणे, त्यांची घरे पाडणे किंवा जाळणे उभ्या पिकांची नासाडी करणे आदी मार्गांचा वापर सर्रास मळेवाले करत. नीळ शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायावर आळा घालण्यासाठी जे. बी. ग्रांट यांची बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नरपदी नियुक्ती करण्यात आली. नील विद्रोहाविषयी जे. बी. ग्रांट म्हणतो, ''योग्य किंमत न देता शेतकऱ्यांवर निळीच्या उत्पादनाची सक्ती करण्यामधेच या समस्येचे मूळ आहे.''

### उठावास सुरुवात

१७ ऑगस्ट १८५९ रोजी हेमचंद्रकार याने स्थानिक पोलिकांना उद्देशून हुकूमनामा वाचला. त्यामध्ये असे सांगण्यात आले होते की, ''निळीच्या शेतकऱ्यांच्या सर्व तंट्यामध्ये जमिनीची मालकी शेतकऱ्यांकडे राहील.'' या जमिनीत पाहिजे ते पीक घेण्याची त्यांना मुभा असेल. मळेवाले किंवा अन्य कोणी याबाबत हस्तक्षेप करणार नाहीत याची पोलिसांनी काळजी घ्यावी.'' ही बातमी सर्वत्र होऊन ठिक-ठिकाणी मळेवाल्यांना विरोध करण्यास सुरुवात झाली. दिगंबर व विष्णू विश्वास यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी निळीची लागवड करण्यास विरोध केला. शेतकऱ्यांचा संघटित प्रतिकार मळेवाल्यांना मोडता आला नाही. हळू-हळू निळीचे कारखाने बंद करण्यास सुरुवात होऊन १८६० पर्यंत बंगाल प्रांतातील निळीच्या लागवडीचे उच्चाटन झाले.

### वर्तमानपत्रे व बद्धिजीवी वर्गाचा उठावास पाठिंबा

निळीवाल्यांच्या उठावास बुद्धिवादी लोकांचा पाठिंबा हे या चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. या बुद्धिजीवी लोकांनी आपला पाठिंबा देण्यासाठी वर्तमानपत्रातून प्रचार, सार्वजनिक सभा घेणे, शेतकऱ्यांचे खटले लढणे यासारख्या मार्गांचा उपयोग केला. हरिशचंद्र मुखर्जी हे 'हिंदु पेट्रियट' या वर्तमानपत्राचे संपादक होते. या वर्तमानपत्रात त्यांनी या संदर्भात महत्त्वपूर्ण भूमिका मांडली. तसेच मळेवाल्यांच्या अत्याचारांचे यथार्थ वर्णन दीनबंधू मित्र यांनी 'नीलदर्पण' या नाटकात केले आहे.

### सरकारची प्रतिक्रिया

सरकारने या उठाववाल्यांविरोधी कठोर धोरण न आखता संयम राखला. त्यांनी निळ उत्पादनाच्या समस्येची सखोल चौकशी करण्यासाठी एक आयोग नेमला. या आयोगाच्या अहवालानुसार सरकारने नोव्हेंबर, १८६० मध्ये एक हुकूम काढून शेतकऱ्यांवर नीळ लागवडीची सक्ती करता येणार नाही असे सांगितले. पण तत्पूर्वीच मळेवाल्यांनी आपले कारखाने बंद केले होते.

### पावना येथील शेतकऱ्यांचा उठाव

पूर्व बंगालमधील पावना जिल्ह्यामध्ये १८७० च्या दशकात शेतकऱ्यांनी उठाव केला. हा उठाव करण्यामागे दोन महत्त्वपूर्ण कारणे होती - (१) कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जमीनदार अधिक महसूल वसूल करीत. (२) १८५९ चा क्रमांक १० कायदा (Rent Act X) नुसार शेतकऱ्यांना मिळणारा वहिवाटीचा हक्क हिरावून घेण्याचा जमिनदारांनी केलेला प्रयत्न.

शेतकऱ्यांनी जमिनदारांच्या अत्याचाराचा विरोध करण्यासाठी १८७३ मध्ये पावना जिल्ह्यातील युसुफशाही परगण्यात 'अग्रेरियन लीग' या संघटनेची स्थापना केली. या संघटनेच्या ढाका, मैमनसिंह, त्रिपुरा, ठाकरगंज, फरीदपूर, बोगरा आणि राजशाही येथे शाखा उघडण्यात आल्या. शेतकऱ्यांनी विरोधासाठी कायदेशीर मार्गांचा वापर केला. अगदी मोजक्याच ठिकाणी हिंसा घडून आली. शेतकऱ्यांचा असंतोष १८८५ पर्यंत धुमसत राहिला. शेतकऱ्यांमधील असंतोष कमी करण्यासाठी 'बंगाल कुळकायदा-१८८५' (Bengal Tenancy Bill) अंमलात आणला.

**दख्खन दंगे – १८७५**

१८७५ च्या उन्हाळ्यात महाराष्ट्रात शेतकऱ्यांचा उठाव झाला. ब्रिटीश काळात जुन्या संस्थांची जागा नव्या संकल्पनानी–संस्थांनी घेतली. रयतवारी पद्धत, नोकरशाही, नवे कायदे व मुक्त व्यापाराचे तत्त्व यामुळे एक नवीन चौकट निर्माण होऊन शेतकऱ्यांच्या शोषणात सुरुवात ाली.

**१८७५ च्या उठावाची कारणे**

या उठावाच्या कारणांची चर्चा विविध विद्वानांनी केली आहे. तसेच या उठावाच्या कारणांची चौकशी करण्यासाठी सरकारने 'डेक्कन रॉयट्स कमिशन' नेमले. त्यांची पुढील कारणे सांगितली –

१. सरकारने मोठ्या प्रमाणावर महसूल वाढवून त्याची आकारणी एकदम लागू केली.

२. नवीन महसूल व्यवस्था रयतेला समजली नाही.

३. जमाबंदी जास्त होती.

४. जमाबंदी अन्यायकारक व असमानपणे आकारली होती.

या शिवाय विद्वानांनी पुढील कारणे सांगितली आहेत –

१. शेतकरी–सावकार संबंध पूर्वीप्रमाणे राहिले नाहीत.

२. पिढ्यान्‌पिढ्या कर्ज सहजा–सहजी न फिटणे

३. नव्या कायद्याने सावकारांना मिळालेले संरक्षण

४. १८५९ सालचा Limitations Act (मुदतीचा कायदा)

५. अमेरिकन यादवी युद्धामुळे निर्माण झालेली क्षणिक आर्थिक सुलभता

६. दिवसेदिवस शेतीचे उत्पन्न कमी येऊ लागले.

**उठावाचा प्रसार**

१२ मे, १८७५ रोजी सुपे येथे शेतकऱ्यांनी पहिला उठाव केला. सुरुवातीस पुणे नंतर अहमदनगर, सातारा, सोलापूर, रत्नागिरी, अहमदाबाद जिल्ह्यात उठाव पसरला. सावकरांची मालमत्ता लुटणे, गहाण खते जाळून टाकणे, सावकारांवर सामाजिक बहिष्कार टाकणे या मार्गांचा शेतकरी वापर करीत. उठाव साधारणपणे दोन महिने चालला. या उठावानंतर सरकारने 'Deccan Riots Commission' नेमले. यामध्ये चार सभासद होते. कमिशनच्या अहवालावर मुंबई सरकारच्या दरबारात चर्चा होऊन ग्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांनी १८७९ मध्ये 'The Deccan Agriculturists Relief Act' पास केला. पुढे मुंबई सरकारने १९०१ मध्ये Land Revenue Code अंमलात आणून शेतकऱ्यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केला.

## उत्तर प्रदेशमधील शेतकरी चळवळ

### किसान सभा

१९१८ साली गौरीशंकर मिश्र व इंद्रनारायण द्विवेदी यांनी उत्तर प्रदेशात किसान सभेची स्थापना केली. उत्तर प्रदेशातील किसान सभा एवढी कार्यशील होती की १९१९ पर्यंत या सभेच्या ४५० शाखा स्थापन करण्यात आल्या.

### एका चळवळ

कागदोपत्रानुसार नमूद केलेल्या दरापेक्षा पन्नास टक्के जास्त दराने खंडाची वसुली तसेच खंड जमा करणाऱ्या ठेकेदारांचे अत्याचार आणि खंड वाटपाची पद्धत या सारख्या कारणांमुळे हरदोई, बहराईच व सीतापूर या जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस व खिलाफतच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांची चळवळ सुरू झाली. नंतर ती 'एका' किंवा 'ऐक्य' या नावाने ओळखली जाऊ लागली. या चळवळीचे नेतृत्व तळागाळातील व सर्वसामान्यांच्या हाती गेले. चळवळीच्या अहिंसात्मक मार्गावरून चळवळीचा व राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचा असलेला संबंध तुटून तिने स्वतंत्र मार्ग अंगिकारला. या चळवळीत कुळांबरोबर अनेक छोटे जमीनदारही सहभागी झाले होते. १९२२ साली अधिकाऱ्यांच्या निर्घृण दडपशाहीमुळे 'एका' चळवळ मृतवत झाली.

### मलबारमधील मोपलांचा उठाव

केरळमधील मलबार प्रांतात १९२१ मध्ये शेतकऱ्यांनी उठाव केला. तेथील मोपला मुसलमान कुळांनी उठाव केला.

### मोपलांच्या तक्रारी

मोपलांच्या तक्रारी पुढीलप्रमाणे होत्या - (१) मुदतीच्या शाश्वतीचा अभाव (२) नूतनीकरणाचे शुल्क, (३) खंडाचे वाढते प्रमाण (४) जमीनदारांच्या अन्य अन्यायी पद्धती.

### जमीनदार व सरकारी अधिकारी लक्ष्य

हिंदु जमीनदार, सरकारी अधिकाराच्या प्रतिक असलेल्या इमारती, पोलीस ठाणी, सरकारी खजिने, कचेऱ्या आणि ब्रिटीश मळेवाले यांच्यावर बंडखोरांनी हल्ले केले.

### मोपला उठावास जातीय वळण

सुरुवातीस जी चळवळ सरकार व जमीनदार यांच्या विरोधी होती तिला नंतर वेगळे वळण लागले. अनेक हिंदु दबावाखाली किंवा स्वखुशीने सरकारी अधिकाऱ्यांना मदत केल्याने मोपलांची हिंदुविरोधी भावना अधिकच वाढली. परिणामी हिंदूंचे सक्तीने धर्मांतर, त्यांच्या हत्या, आणि त्यांच्यावरील हल्ले यांचे प्रमाण वाढते गेले.

### उठावाचा शेवट

मोपलांच्या हिंसक कारवायांमुळे आणि जातीयतेने पछाडलेले मोपला एकाकी पडले. परिणामी ब्रिटिशांनी दडपशाहीच्या मार्गाने १९२१ पर्यंत त्यांचा उठाव मोडून काढला.

**बार्डोलीची करबंद चळवळ**

सुरत जिल्ह्यातील बार्डोली येथे १९२८ मध्ये करबंदीची चळवळ सुरू झाली. ही चळवळ असहकार चळवळीची अपत्य होते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. बार्डोली तालुक्यातील जमीन महसुलाची नव्याने आकारणी करण्याचे काम जयकर या अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आले होते. त्याने प्रचलित महसुलात ३० टक्के वाढ सुचविल्याचे राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नेत्यांच्या कानी पडताच त्यांनी आपली स्वतंत्र व 'बार्डोली चौकशी समिती' १९२६ मध्ये नेमली.

**सरदार वल्लभभाई पटेल यांचे नेतृत्व**

शेतकऱ्यांनी उठावाचे नेतृत्व पटेलांनी स्वीकारावे अशी विनंती केली. त्यांनी त्यांच्या विनंतीचा स्वीकार करून आंदोलन संवेधानिक मार्गाने करण्याचा आपला विचार मांडला. पटेलांनी एक व्यूहनीती आखली. त्यांनी तालुक्याचे तेरा भाग पाडून प्रत्येक भागाची जबाबदारी एका अनुभवी नेत्यावर सोपवली. 'सत्याग्रह पत्रिका' हे दैनिक प्रकाशित करून त्यामध्ये आंदोलनाची माहिती, नेत्यांची भाषणे व अन्य बातम्या दिल्या जात असे. तसेच एक हेर खाते निर्माण करून ते शेतकऱ्यांवर बारीक लक्ष देऊन होते. शेतकऱ्यांनी महसूल भरू नये म्हणून रात्रंदिवस त्यांच्यावर नजर ठेवली जाई. शेतकऱ्यांनी कर देण्यास विरोध केल्याने तसेच काही केले तरी आंदोलन मागे घेत नाहीत हे दिसताच सरकारनेच माघार घेतली व सरकारने त्यासंदर्भात एक चौकशी समिती नेमली. चौकशीअंती महसुलातील वाढ असमर्थनीय असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला.

**अखिल भारतीय किसान परिषद**

कॉंग्रेस पक्षात डाव्या विचारसरणीचा प्रभाव वाडल्याने तसेच किसान चळवळीत समन्वय साधण्यासाठी एक अखिल भारतीय संघटनेच्या स्थापनेची आवश्यकता भासू लागली. परिणामी १९३६ मध्ये लखनऊ येथे अखिल भारतीय किसान परिषदेची स्थापना करण्यात आली. पुढे तिचे 'अखिल भारतीय किसान सभा' असे नामांतर करण्यात आले. या सभेचे अध्यक्ष स्वामी सहजानंद सरस्वती तर सरचिटणीस म्हणून एन. जी. रंगा यांची निवड करण्यात आली.

**जाहीरनामा**

मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय किसान समितीच्या बैठकीत किसान जाहीरनाम्याला अंतिम स्वरूप देण्यात आले. त्यामध्ये (१) जमीन महसूल व खंडाचे प्रमाण ५० टक्क्याने कमी करणे. (२) कर्जे स्थगित करण्यात यावी. (३) सरंजामी पट्ट्या नष्ट कराव्यात. (४) कुळांची जमीनधारणा संरक्षित असावी. (५) शेतमजुरांना पुरेसे वेतन मिळावे. (६) किसान संघटनांना अधिकृत मान्यता मिळावी. या मागण्यांचा समावेश होता.

**बिहार प्रांतिक किसान सभा**

बिहार प्रांतिक किसान सभेची स्थापना १९२९ साली स्वामी सहजानंद सरस्वती यांनी केली. किसान सभेचा कार्यक्रम लोकप्रिय करण्यासाठी या सभेने शेतकऱ्यांच्या सभा, परिषदा, मेळावे भरले. १९३५ मध्ये किसान सभेने जमीनदार नष्ट करण्याची घोषणा केली.

**मागण्या**

किसान सभेच्या मागण्या पुढीलप्रमाणे होत्या – (१) बेकायदेशीर पट्ट्या रद्द कराव्यात. (२) कुळांना त्यांच्या जमिनीवरून हुसकावून लावण्यात येऊ नये. (२) बकाश्त जमिनी जमिनदाधकांना परत कराव्यात. यासारख्या अनेक मागण्या होत्या.

**किसान सभेतील फूट**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात शेतकरी आंदोलनाला मोठा फटका बसला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने दुसरे महायुद्ध हे 'लोकयुद्ध' म्हणून दावा केला व आपल्या कार्यकर्त्यांना 'छोडो भारत चळवळी'पासून दूर राहण्यास सांगितले. कम्युनिस्ट पक्षाच्या या भूमिकेमुळे सहजानंद सरस्वती व इंदूलाल याज्ञिक संघटनेतून बाहेर पडले.

**बंगालमधील तेभागा आंदोलन**

१९४६ साली बंगालमधील बटाईदारांनी असे ठरविले की, 'बटाईच्या हिश्श्यापोटी आपल्या पिकाच्या निम्म्या भागाऐवजी एक तृतीयांश भाग जमीनदारांना देतील. हिश्श्याचे वाटप होईपर्यंत धान्य जमीनदाराच्या गोदामात न ठेवता आपल्या गोदाम ठेवतील. बंगाल प्रांतिक किसान सभेच्या नेतृत्वाखाली 'तेभागा' चळवळीने जमीनदार विरुद्ध कुळे असे स्वरूप धारण केले. जमीनदारांनी सरकारकडे मदत मागितली. पोलिसांनी उठाव दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. शेतकरी–सरकार संघर्ष १९४७ पर्यंत सुरूच होता. १९४७ च्या दरम्यान ही चळवळ मृतप्राय झाली होती.

### ४.२.३ डावी चळवळ

१९१७ साली रशियामध्ये समाजवादी क्रांती झाली. या क्रांतीचा परिणाम भारतीय समाजावरही झाला. भारतीय समाजव्यवस्थेत, राजकारणात डावे व उजवे या दोन संज्ञांचा प्रयोग सुरू झाला. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये समाजवादी विचारसरणीचा उदय झाला.

**भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना**

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या नेतृत्वाखाली १९२० साली ताश्कंद येथे 'भारतीय कम्युनिस्ट पक्षा'ची स्थापना कली. भारतात १९२० नंतर अनेक डावे गट व संघटना उदयास आल्या होत्या. १९२५ मध्ये त्यांच्यापैकी अनेक गटांनी कानपूर येथे जमून 'भारतीय कम्युनिस्ट पक्ष' (Communist Party of India : CPI) या नावाची एक अखिल भारतीय संघटना स्थापन केली.

साम्यवादी चळवळीचा इतिहास अध्ययनाच्या दृष्टीकोनातून पाच अवस्थांमध्ये विभाजित केला जातो.

**(अ) पहिली अवस्था : तीन कटांच्या खटल्याचा कालखंड**

मॉस्कोमध्ये साम्यवादाचे प्रशिक्षण घेऊन आल्यानंतर इंग्लंडमधील साम्यवादी पक्षाने भारतीय साम्यवादी पक्षाला प्रशिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यासाठी त्यांनी आपला प्रतिनिधी म्हणून फिलिप स्प्रॅट यांना भारतात पाठवले. त्यांनी येथे अनेक संघटना तयार केल्या.

ह्या काळात पेशावर कट खटला (१९२२-२३) कानपूर कट खटलका (१९२४) आणि मिरत कट खटला (१९२९-३३) या तीन खटल्यांनी सर्वाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले.

**दुसरी अवस्था : राजकीय एकटेपणाचा कालखंड**

या काळात म. गांधींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चळवळ वेगाने जनचळवळ बनत चालली होती. परंतु साम्यवाद्यांनी महात्मा गांधींना साम्राज्यवादी शक्तीच्या हातातील खेळणे व भांडवलदारांची हस्तक म्हणजे काँग्रेस अशी टीका केल्याने साम्यवादी पक्ष राष्ट्रीय प्रवाहातून बाजूला पडला.

**तिसरी अवस्था : साम्राज्यविरोधी संयुक्त मोर्चा योजना**

१९३६ मध्ये रजनी पाम दत्त आणि बेन ब्रॅडले यांनी 'भारतात साम्राज्यवाद विरोधी जनमोर्चा' या निबंधात 'साम्यवाद्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करून काँग्रेसमधील डाव्या गटाला मजबूत करून प्रतिक्रियावादी उजव्यांना बाहेर काढावे तसेच एक जनमोर्चा बनविण्याचे आव्हान करण्यात आले. परंतु त्यामध्ये यश आले नाही.

**चौथी अवस्था : द्वितीय महायुद्ध आणि साम्यवादी चळवळ**

काँग्रेसने द्वितीय महायुद्ध साम्राज्यवादी युद्ध म्हणून घोषित केले. त्याला साम्यवाद्यांनी पाठिंबा दिला. परंतु जून १९४१ मध्ये हिटलरने रशियावर आक्रमण केल्यावर रशिया युद्धात ओढला गेला व साम्यवाद्यांनी या युद्धाला 'लोक युद्ध' (People's War) म्हणून घोषित केले. याचवेळी काँग्रेसने 'छोडो भारत चळवळ' सुरू केली. या चळवळीविरोधी सरकारला साम्यवाद्यांनी मदत केली.

**पाचवी अवस्था : सत्तांतराच्या वाटाघाटी आणि साम्यवाद्यांची बहु-राष्ट्र योजना**

१९४२ मध्ये साम्यवाद्यांनी भारत हे बहुराष्ट्रवादी राज्य आहे असे जाहीर केले. १९४६ मध्ये साम्यवादी पक्षाने मंत्रीमंडळ समितीसमोर बाल्कन प्रदेशाप्रमाणे किंवा रशियन सोव्हिएट संघाप्रमाणे भारताला १७ स्वतंत्र सार्वभौम राज्यात विभाजीत केले जावे असा प्रस्ताव मांडला. त्यांच्या या धोरणामुळे त्यांच्या टीका मोठ्या प्रमाणात करण्यात आली.

**काँग्रेस समाजवादी पक्ष**

१९३०-३१ व १९३२-३४ या काळात तुरुंगात असलेल्या काँग्रेसच्या तरुण सभासदांनी तुरुंगात मार्क्सवाद व समाजवाद या संकल्पनांचा अभ्यास केला. त्यांची गांधीप्रणित विचारप्रणालीने भ्रमनिराशा केली होती तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राजकीय धोरण त्यांना मान्य नव्हते. त्यांनी एक वेगळा नवीन पर्याय शोधला. १९३५ मध्ये मुंबई येथे जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव व मिनु मसानी यांच्या नेतृत्वाखाली 'काँग्रेस-समाजवादी पक्षाची' स्थापना केली.

**मूलभूत सिद्धांत** : या पक्षाचे चार मूलभूत सिद्धांत होते.

१. स्वातंत्र्यप्राप्ती हे राष्ट्रीय चळवळीचे प्रथम उद्दिष्ट असून राष्ट्रीयता ही समाजवादाकडे जाण्याची पहिली पायरी आहे.

२. समाजवाद्यांनी काँग्रेस अंतर्गतच कार्य केले पाहिजे.

३. समाजवाद्यांनी काँग्रेसला आणि राष्ट्रीय चळवळीला समाजवादाकडे जाण्यासाठी मार्गदर्शन केले पाहिजे.

४. समाजवादाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी कामगार व शेतकरी यांचे संघटन केले पाहिजे.

**अनेक डावे पक्ष**

**१. फॉरवर्ड ब्लॉक** : गांधीजींशी मतभेद झाल्यानंतर १९३९ मध्ये सुभाषचंद्र बोस यांनी 'फॉरवर्ड ब्लॉक' या पक्षाची स्थापना केली.

**२. रॅडिकल डेमॉक्रॅटीक पार्टी** : मानवेंद्रनाथ रॉय हे भारतातील कम्युनिस्ट पक्षाचे प्रवर्तक होते. परंतु कम्युनिस्टांशी मतभेद झाल्यानंतर त्यांनी १९४० मध्ये रॅडिकल डेमॉक्रटिक पार्टीची स्थापना केली. या पक्षाचे अनुयायी 'रॉयिस्ट' म्हणून ओळखले जात होते.

१९३९ मध्ये एन. दत्त मुजूमदार यांनी 'बोल्शेविक पार्टी ऑफ इंडिया' तर इंद्रसेन व अजित रॉय यांनी 'बोल्शेविक-लेनिनिस्ट पार्टी' तसेच १९४२ साली सौम्येंद्रनाथ टागोर यांनी 'रिव्होल्यूशनरी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' इत्यादी डावे पक्ष स्थापन करण्यात आले.

### ४.२.४ नेताजी सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेना

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेना (Indian National Army - INA) यांचा इतिहास म्हणजे एक सोनेरी पान आहे. नेताजीनी दिलेल्या सशस्त्र लढ्याने भारतीय स्वातंत्र्य चळवळीला एक नवी झळाळी दिली.

**स्वातंत्र्यलढ्यात प्रवेश**

नेताजींनी आय.सी.एस.चा राजीनामा देऊन स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. त्यांनी १९२१ रोजी प्रिन्स ऑफ वेल्सच्या आगमनाविरोधी मोर्चा काढला. त्यांना व चित्तरंजनदास यांना अटक करून ६ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा दिली.

**स्वातंत्र्यलढ्यातील कार्य :**

१९२३ मध्ये नेताजीनी 'ऑल बंगाल युथ लीग'ची स्थापना केली. ते बंगाल काँग्रेसचे सचिव बनले. त्यांनी काँग्रेस अंतर्गत इंडिपेडन्स लीगची स्थापना केली. १९२८ साली आलेल्या सायमन कमिशनच्या विरोधी मोर्चे काढले. कमिशनला उत्तर देण्यासाठी काँग्रेसने पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. तिचे नेताजी सदस्य होते.

**हरिपुरा काँग्रेसचे अध्यक्ष व 'फॉरवर्ड ब्लॉक'ची स्थापना**

१९३८ सालच्या हरिपुरा येथील काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात सुभाषचंद्रांची एकमताने अध्यक्षपदी निवड झाली. या काळात त्यांनी जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली योजना आयोग स्थापन केला. त्यांनी बंगलोर

येथे प्रसिद्ध वैज्ञानिक सर विश्वेश्वरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली एक विज्ञान परिषद भरविली. सुभाषबाबू काँग्रेसचे अध्यक्ष असले तरी गांधीजींना त्यांची कार्यपद्धती पसंत नव्हती. गांधीजीनी त्यांना विरोध केला. काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी सुभाषबाबू इच्छुक होते तर गांधीनी त्यांना विरोध करून अध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून पट्टाभिसितारामैय्या यांची निवड केली. गांधीची विरोध करूनही सुभाषबाबू निवडून आले. परंतु नेताजींना हवा तसा कारभार करता येत नसल्याने त्यांनी काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन १९३९ मध्ये फॉरवर्ड ब्लॉक पक्षाची स्थापना केली.

**सुभाषबाबूंना अटक व त्यांचे देशाबाहेर प्रयाण**

१९४० मध्ये सरकारने भारत सुरक्षा कायद्याअंतर्गत त्यांना अटक केली. याविरोधात त्यांनी आमरण उपोषण केले. तेव्हा सरकारने त्यांची तुरुंगातून सुटका करून त्यांना त्यांच्या घरी नजरकैदेत ठेवले.

**सुभाषबाबू जर्मनीमध्ये**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याला रशियाची मदत घेण्यासाठी ते रशियात गेले. पण जर्मनीने रशियावर आक्रमण केल्याने रशिया इंग्लंडकडे गेला. परिणामी ते रशियावरून जर्मनीकडे गेले. तेथे त्यांनी हिटलरकडे स्वातंत्र्य संघर्षासाठी मदत मागितली पण त्यामध्ये त्यांना यश आले नाही. तेथून ते जपानमध्ये आले.

**टोकियो संमेलन**

रासबिहारी बोस पहिल्या महायुद्धाच्या काळात जपानमध्ये येऊन स्थायिक झाले होते. त्यांनी टोकियो येथे २८-३० मार्च १९४२ मध्ये एक संमेलन बोलविले होते. या संमेलनात भारतीय सेना संघटित करण्याचा प्रस्ताव पास करण्यात आला.

**बँकॉक संमेलन**

हे संमेलन २३ जून, १९४२ मध्ये झाले. त्याचे अध्यक्ष रासबिहारी बोस होते. या संमेलनात सुभाषचंद्र बोस यांना पूर्व आशियात बोलविण्याचे ठरविण्यात आले.

**आझाद हिंद सेनेची स्थापना**

जपानला मलाया, सिंगापूर, ब्रह्मदेश येथील इंग्रजांच्या हिंदी फौजा शरण आल्या होत्या. जपानने जिंकलेल्या प्रदेशातील हिंदी लोकांना संघटित करून रासबिहारी बोस यांनी 'इंडियन इंडिपेंडन्स लीग' स्थापन केले. त्यातून 'इंडियन नॅशनल आर्मी' हे सेनादल जे पुढे 'आझाद हिंद फौज' या नावाने प्रसिद्ध आहे स्थापन करून त्याच्या कमांडर-इन-चीफ पदी कॅ. मोहनसिंगाची नियुक्ती केली.

**नेताजी आझाद हिंद फौजेचे सरसेनापती**

रासबिहारींचे निमंत्रण मिळताच नेताजी बोटेतून टोकियोला १३ जून १९४३ ला पोहोचले. त्यांनी पंतप्रधान टोजो यांना भेटले. रासबिहारी यांनी फौजेचे नेतृत्व नेताजींकडे सोपविले. त्याचवेळी त्यांनी सेनेस 'चलो दिल्ली' अशी घोषणा दिली.

**हंगामी सरकारची घोषणा**

नेताजींनी २१ ऑक्टोबर, १९४३ रोजी सिंगापूरला स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन केले. त्यांनी हिंदी स्वातंत्र्यासाठी इंग्लंड, अमेरिका यांच्या विरोधात लढा पुकारत आहोत असे जाहीर केले.

**ब्रह्मदेशात विजय**

नेताजींनी सैन्याच्या गांधी ब्रिगेड, आझाद ब्रिगेड व नेहरू बिग्रेट अशा तीन ब्रिगेड निर्माण करून स्त्रियांच्यासाठी कॅप्टन कुमारी लक्ष्मी स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली 'झाशीची राणी पलटण' स्थापन केली. नेताजींनी 'तुम मुझे खून दो, मै तुम्हे आजादी दूँगा ।' अशी हाक दिली. नेताजीनी ब्रह्मदेशातील इंग्रज फौजांचा मोठा पराभव केला.

**अंदमान (शहीद) व निकोबार (स्वराज्य)**

नेताजींनी अंदमान व निकोबार बेट जिंकून घेऊन त्यांना अनुक्रेम शहीद व स्वराज्य अशी नावे दिली.

**आसाम काबीज**

आझाद हिंद सेनेने हिंदुस्थानकडे आगेकूच करून आसाममधील मोराई, कोहिमा, मणिपूर, विष्णूपूर इत्यादी ठाणी जिंकून इंफाळला वेढा दिला.

**सिंगापूर रेडिओ स्टेशन व नॅशनल बँक ऑफ आझादची स्थापना**

सिंगापूर रेडिओ स्टेशन सुरू करून त्यांनी देशवासियांना 'चलो दिल्ली' असा रेडिओवरून संदेश दिला. त्यांनी १९४४ मध्ये रंगून येथे 'नॅशनल बँक ऑफ आझाद हिंद' ही सरकारची राष्ट्रीय बँक स्थापन केली.

**आझाद हिंद सेनेवर मुकद्मा**

आझाद हिंद सेना शरण आपल्यानंतर ब्रिटीश सरकारने राजद्रोहाच्या आरोपाखाली सेनेवर खटला भरला. मुख्य आरोपी म्हणून कॅ. शहानवाझखान, गुरुदयालसिंग धिल्लन, कॅ. प्रेम सहगल आदी वरिष्ठ सेनाधिकारी होते. सेनेच्या बचावासाठी तेजबहादूर सप्रू, कैलासनाथ काटजू, भुलाभाई देसाई आणि पंडित नेहरू हे वकील म्हणून न्यायालयात उभे राहिले. न्यायालयाने आझाद हिंद सेनेला दोषी ठरविले. परंतु ब्रिटीश सरकारने लोकदबावाखाली सेनेला मुक्त केले.

**नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा मृत्यू ?**

सेनेने शरणागती पत्करल्यानंतर नेताजी सिंगापूरहून टोकिओला विमानातून परत येत असताना विमानाला १८ ऑगस्ट, १९४५ रोजी अपघात होऊन त्यात त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाचे अधिकृत वृत्त कोणालाच कळले नसल्याने त्यांच्या मृत्यूबद्दलचे अजूनही गूढच आहे. सरकारने विविध समित्या स्थापन केल्या परंतु कोणत्याही समितीला नेताजींच्या मृत्यूबद्दलचे सत्य उजेडात आणता आले नाही.

## ४.३ स्वयं अध्ययन प्रश्न

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ............. यांनी मित्रमेळा नावाचे मंडळ स्थापन केले होते.

(अ) वि. दा. सावरकर (ब) पां. म. बापट

(क) नारायणराव सावरकर (ड) अनंत लक्ष्मण कान्होरे

२. ............. हे चितगांव कटाचे नेते होते.

(अ) खुदीराम बोस (ब) प्रफुल्लकुमार चाकी

(क) भूपेंद्र दत्त (ड) सूर्यसेन

३. ............. यांनी 'दास कॅपिटल' ग्रंथ लिहिला.

(अ) दादाभाई नौरोजी (ब) रूसो

(क) कार्ल मार्क्स (ड) मानवेंद्रनाथ रॉय

४. १९३० मध्ये ............. या शहराचे महापौर म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांची निवड झाली.

(अ) कानपूर (ब) कलकत्ता (क) मुंबई (ड) कटक

५. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ......... रेडिओ स्टेशन सुरू करून 'चलो दिल्ली'चा संदेश दिला.

(अ) टोकिओ (ब) इंफार (क) सिंगापूर (ड) अंदमान निकोबार

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. अभिनव भारत संघटनेची स्थापना कोणी केली ?

२. काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना कोणी केली ?

३. उत्तर देशात किसान सभेची स्थापना कोणी केली ?

४. आझाद हिंद सेनेची स्थापना कोणी केली ?

५. बार्डोली करबंदी चळवळीचे नेतृत्व कोणी केली ?

## ४.४ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. वि. दा. सावरकर

२. (ड) सुर्यसेन

३. (क) कार्ल मार्क्स

४. (ब) कलकत्ता

५. (क) सिंगापूर

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. विनायक दामोदर सावरकर

२. जयप्रकाश नारायण व आचार्य नरेंद्र देव

३. गौरी शंकर मिश्र व इंद्रनारायण द्विवेदी

४. रासबिहारी बोस

५. सरदार वल्लभभाई पटेल

## ४.५ पारिभाषिक शब्द

**१. साम्राज्यवाद :** एका देशाने दुसऱ्या देशाचा प्रदेश जिंकून घेऊन, त्यावर आपले राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या वर्चस्व निर्माण करणे म्हणजे साम्राज्यवाद.

**२. समाजवाद :** समाजवाद ही अशी व्याख्या आहे की ज्यामध्ये सर्व व्यक्तींना आर्थिक स्रोत, ज्ञान आणि राजकीय सत्तेसंबंध समान संधी उपलब्ध आहे आणि एका व्यक्ती वा गटाचे इतरांवर न्यूनतम वर्चस्व आहे.

## ४.६ सारांश

भारतीय राष्ट्रीय चळवळ ही आधुनिक कालखंडातील सर्वात मोठी लोकचळवळ होती. या चळवळीमध्ये समाजातील सर्वच विचारसरणीच्या व वर्गाच्या लोकांनी सहभाग घेऊन ब्रिटीश सत्तेला आपल्यापुढे गुडघे टेकायला भाग पाडले. भारतीय स्वातंत्र्यलढ्याला विविध पैलू आहेत. गांधीप्रणीत लोकचळवळ, डाव्या चळवळी, किसान आंदोलने आणि शेवटी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि आझाद हिंद फौज ही भारतीय स्वातंत्र्यलढ्याची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

स्वातंत्र्यलढ्यात मवाळवादी व जहालवादी यांच्या मार्गाने गेले तर बराच कालावधी लागेल. आपल्याला जर पूर्ण स्वातंत्र्य हवेल असेल तर दहशतवादी आणि क्रांतिकारी कारवाया याशिवाय तरणोपाय नाही असे क्रांतिकारांना वाटून त्यांनी दहशतवादी कृत्यांची एक शृंखलाच तयार केली. या क्रांतिकारी चळवळीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या क्रांतिकारकांना फक्त ब्रिटीश सत्ता उखडून फेकावयाची नव्हती तर त्यांना भारतीय समाजव्यवस्थेमध्ये राजकीय आणि आर्थिक क्रांती करून आर्थिक क्षमता प्रस्थापित करावयाची होती. हे क्रांतिकारक समाजवादी विचारसरणीकडे झुकलेले होते.

वसाहतवादी अर्थव्यवस्थेचा सर्वात जास्त तडाखा जर कोणाला बसला असेल तर तो किसानांना ब्रिटीश सत्तेला सर्वात प्रथम यांनीच विरोध केला. शेतकऱ्यांनी आपल्या संघटना स्थापन करून आंदोलने करून सरकारला विरोध केला. शेतकऱ्यांची प्रारंभिक आंदोलने ही ब्रिटीश सत्तेविरोधी नव्हती उलट ते 'ब्रिटिश राणीचा विजय असो' आम्ही ब्रिटीश सरकार विरोधी नाही' अशा घोषणा देत त्यांच्या विरोधाचे केंद्र फक्त सावकार व जमिनदार हेच होते. परंतु पुढे विसाव्या शतकामध्ये त्यांच्या विरोधाचे केंद्र ब्रिटीश सरकार बनले. त्यांनी सरकार विरोधी आंदोलने करून स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला. या काळात झालेल्या काही शेतकरी चळवळीला काही ठिकाणी जातीय रंग चढला पण तो तात्पुरता होता.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यावर आंतरराष्ट्रीय घटनांचाही प्रभाव पडत होता. १९१७ साली रशियामध्ये साम्यवादी क्रांती होऊन त्याचा प्रभाव भारतीय तरुण युवकांवर होऊन ते समाजवादी विचारसरणीने प्रभावित होऊन भारतातही समाजवादी क्रांती घडवून आणणाऱ्या विचारसरणीचा एक तरुण वर्ग निर्माण होऊन भारतात डाव्या विचारसरणीचा उदय झाला. डाव्या विचारसरणीच्या विचारवंतांनी अनेक डावे पक्ष व संघटना स्थापन करून शेतकरी व कामगार यांना एकत्र आणून भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये आपले योगदान दिले. भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये त्यांनी घेतलेली भूमिकांमुळे त्यांना जनमत प्राप्त होऊ शकले नाही.

दुसरे महायुद्ध सुरू होताच भारतीय स्वातंत्र्य लढ्याला एक नवचैतन्य प्राप्त झाले. या काळातील दोन चळवळींनी संपूर्ण जगाचे लक्ष आपल्याकडे वळविले. (१) गांधीप्रणित – चले जाव (छोडो भारत) चळवळ, (२) सुभाषचंद्र बोस आणि त्यांची आझाद हिंद फौज. नेताजींचे या काळातील कामगिरी ही स्वप्नवत असल्यासारखीच होती. त्यांनी सैन्याच्या आधारे भारत भूमीला पारतंत्र्यातून मुक्त करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीचे अंतर मात्र त्यांनी खूपच कमी केले. अशा प्रकारे भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही अनेक विचारप्रवाहांनी आणि विचारसरणीनी युक्त अशी संमिश्र चळवळ आहे.

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

१. महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीचा थोडक्यात आढावा घ्या.

२. भारतातील डाव्या चळवळीच्या कार्याचे मूल्यमापन करा.

३. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील नेताजी सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेनेची कामगिरी स्पष्ट करा.

**(ब) टीपा लिहा.**

१. किसान सभा आंदोलन

२. पंजाबमधील क्रांतिकारी चळवळ

३. नेताजी सुभाषचंद्र बोस

४. दख्खद दंगे – १८७५

५. डावी चळवळ

## ४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. बिपिनचंद्र, इंडियाज् स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स, केसागर, पुणे २००३.

२. य. ना. कदम, आधुनिक भारत, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००५.

३. पी. एन. शिंदे व ए. जी. थोरात, भारताचा स्वातंत्र्यलढा, फडके प्रकाशन, कोल्हापूर २०१४.

४. कुमार केतकर, कथा स्वातंत्र्याची, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

५. अभयसिंह प्रसाद, भारत में राष्ट्रवाद, ओरिएंट ब्लैकस्वॉन, नई दिल्ली, २०१४.

६. सत्या एम. राय, भारत में उपनिवेशवाद और राष्ट्रवाद, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, २००९.